॥ श्रीराम ॥ माया दिसे परी नासे । वस्तु न दिसे परी न नासे । माया सत्य वाटे परी मिथ्या असे । निरंतर ॥ १ ॥ करंटा पडोनी उताणा । करी नानापरी कल्पना । परी तें कांहींच घडेना । तैसी माया ॥ २ ॥ द्रव्यदारेचें स्वप्नवैभव । नाना विळासें हावभाव । क्षणीक वाटे परी माव । तैसी माया ॥ ३ ॥ गगनीं गंधर्वनगरें । दिसताती नाना प्रकारें । नानारूपें नाना विकारें । तैसी माया ॥ ४ ॥ लक्षुमी रायविनोदाची । बोलतां वाटे साची । मिथ्या प्रचीत तेथीची । तैसी माया ॥ ५ ॥ दसऱ्याचे सुवर्णाचे लाटे । लोक म्हणती परी ते कांटे । परी सर्वत्र राहाटे । तैसी माया ॥ ६ ॥ मेल्याचा महोत्साव करणें । सतीचें वैभव वाढवणें । मसणीं जाउनी रुदन करणें । तैसी माया ॥ ७ ॥ राखेसी म्हणती लक्षुमी । दुसरी भारदोरी लक्षुमी । तिसरी नाममात्र लक्षुमी । तैसी माया ॥ ८ ॥ मुळीं बाळविधवा नारी । तिचें नांव जन्मसावित्री । कुबेर हिंडे घरोघरीं । तैसी माया ॥ ९ ॥ दशअवतारांतील कृष्णा । उपजे जीर्ण वस्त्रांची तृष्णा । नदी नामें पीयुष्णा । तैसी माया ॥ १० ॥ बहुरूपांतील रामदेवराव । ग्रामस्थांपुढें दाखवी हावभाव । कां महाराज म्हणोनी लाघव । तैसी माया ॥ ११ ॥ देव्हारां असे अन्नपूर्णा । आणी गृहीं अन्नचि मिळेना । नामें सरस्वती सिकेना । शुभावळु ॥ १२ ॥ सुण्यास व्याघ्र नाम ठेविलें । पुत्रास इंद्रनामें पाचारिलें । कुरूप-

---

माया दिसते पण नाशिवंत आहे व ब्रह्म दिसत नाहीं पण अविनाशी आहे. माया सत्य वाटते पण ती सर्वथा मिथ्या आहे. एखादा भिकारी उताणा पडून मनोराज्यें बांधीत असतो, पण त्याच्या हातून कांहींच होत नाहीं. तशी माया (कल्पनारूप) आहे. स्वप्नांत उत्तम स्त्री व अफाट द्रव्य मिळालें व नाना प्रकारचे विलासवैभव भोगल्याचें वाटलें, पण जागृतींत आल्यावर तें सारें क्षणिक व मिथ्या आहे असें कळतें, त्याप्रमाणें स्वरूपजागृति झाल्याबरोबर सारी दृश्य सृष्टि मिथ्या हें कळून येतें. आकाशांत नाना आकृतींचे ढग (गंधर्वनगरें) दिसतात, त्याप्रमाणें अनेक रूपें व अनेक विकार दाखविणारी मायाही (मिथ्याच) होय. बहुरूप्याची (रायविनोदी, राजाची करमणूक करणारा) लक्ष्मी (वैभव) तो बोलतांना खरी वाटते, पण (तो दिडक्या मागण्यासाठीं नरोटी पुढें करितो तेव्हां) तिचें मिथ्यात्व प्रचीतोस येतें. तसेंच स्वरूपजागृतिकाळीं इहलोकींचें ऐश्वर्य मिथ्या आहे हें कळून येतें. दसऱ्याच्या सोन्याच्या लकडीला लोक सोनें म्हणतात व लोकांत त्याची देवघेव करितात. पण ते कांटे हाताला बोंचतात. तशीच मिथ्या मायेंतील संपत्ति होय. मेलेल्यांच्या पुण्यतिथींचे उत्सव, सती जाऊं लागणाऱ्या स्त्रीचें वैभव, मसणांत जाऊन मृतासाठीं रडत बसणें (शोकरसप्रधान काव्यें गाणें), ठेवलेल्या रखेला लक्ष्मी म्हणून संबोधणें, गर्भपात न व्हावा म्हणून स्त्रिया भारलेली दोरी (भार दोरी) कंबरेला बांधतात तिला लक्ष्मी म्हणणें, किंवा एखाद्या शतदरिद्री पुरुषाच्या स्त्रीचें लक्ष्मी हें नांव ठेवणें, बाल विधवेला जन्मसावित्री म्हणणें, घरोघर भिक्षा मागत हिंडणाऱ्या पुरुषाला कुबेर या नांवानें (हें आडनांव असतें) हांक मारणें, दशावताराच्या खेळांतील फाटक्या चिंध्यांची भिक्षा मागणाऱ्या पात्राचें नांव कृष्ण (किंवा कृष्णा म्ह० द्रौपदी) ठेवणें, पाण्याचा थेंब नसणाऱ्या नदीला पयोष्णा म्ह० अमृतसरिता किंवा दुग्धसरिता म्हणणें, ग्रामस्थांपुढें हावभाव दाखविणाऱ्या पोटबाबू बहुरूप्याला रामदेवरावाचें नांव देणें, पाणक्याला किंवा शागीर्दाला महाराज म्हणून संबोधणें (उत्तर हिंदुस्थानांत ही चाल आहे), देव्हाऱ्यांत अन्नपूर्णा (मूर्ति) असून घरांत खायला नसणें, एखाद्या गोवऱ्या थापणाऱ्या (शुभावळु) बाईला सरस्वती म्हणून पाचारणें, कुत्र्याला ‘ वाघोबा, ’ मुलाला ‘ इंद्र, ’ कुरूप स्त्रीला

परी आळविलें । सुंदरा म्हणउनी ॥ १३ ॥ मूर्ख नामें सकळकळा । रासभी नामें कोकिळा । ना तरी डोळसेचा डोळा । फुटका जैसा ॥ १४ ॥ मातंगीचें नाम तुळसी । चर्मकीचें नाम कासी । बोलती अतिशूद्रिणीसी । भागीरथी ऐसें ॥१५॥ साउली आणी अंधकार । येक होतां तेथीचा विचार । उगाचि दिसे भासमात्र । तैसी माया ॥ १६ ॥ श्रवण बोटें संधी करतळ । रविरश्मैं दिसती इंगळ । रम्य आरक्तरंगकल्होळ । तैसी माया ॥ १७ ॥ भगवें वस्त्र देखतां मनाला । वाटे अग्नचि लागला । विवंचितां प्रत्ययो आला । तैसी माया ॥ १८ ॥ जळीं चरणकरांगुळें । आंखुड लांबें किरकोळें । विपरीत काण दिसती जळें । तैसी माया ॥१९॥ भोवंडीनें पृथ्वी कलथली । कामीणीनें पिवळी जाली । सन्निपातस्थां अनुभवली । तैसी माया ॥२०॥ कोणीयेक पदार्थविकार । उगाचि दिसे भासमात्र । अनन्याचा अन्य प्रकार । तैसी माया ॥ २१ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे मायानिरूपणनाम समास दशम ॥ १० ॥

'सुंदरी,' मूर्खाला 'कळावंत,' गाढवीला 'कोकिळा,' अंधेला 'डोळसा,' मांगिणीला 'तुळशी,' चांभारणीला 'काशी,' महाराणीला 'भागीरथी' इ० नांवानें हांका मारणें जसें व्यर्थ होय, त्याप्रमाणें मिथ्या मायेला मोठमोठीं नांवें ठेवून तिचा बडेजाव गाणें फुकट होय (१–१५). सावली आणि अंधार एक झालीं म्हणजे जो प्रकार तशी माया भासमात्र आहे. कान, बोटांचे संधि किंवा नखें, व तळहात हे सूर्यप्रकाशांत निखाऱ्यासारखे लालभडक दिसतात, भगवें वस्त्र पाहतां दुरून आग लागल्यासारखी दिसते, किंवा पाण्यांत हातापायाचीं बोटें धरिलीं असतां आंखूड, लांबट, किरकोळ, विपरीत, वांकडीं (काण) वाटेल तशीं दिसतात तशी माया आहे. भोंवळ आली कीं पृथ्वी फिरलीशी वाटते, कांवीळ झाली कीं सारें पिवळें दिसतें, सन्निपातज्वर अंगांत भरला कीं सारें गरगर फिरतेसें वाटतें तशी माया आहे. एखाद्या पदार्थाला विकार कांहीं झाला कीं तो जसा असतो एक व दिसतो भलताच तशी माया सर्वथा असत्य असून सत्य आहे अशी भासते (१६–२१). [द० १४, स० १०]

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ सार्थ श्रीदासबोध ॥

॥ आत्मदशक नाम पंधरावा ॥ १५ ॥

॥ श्रीराम ॥ अस्थिमांसांचीं शरीरें। त्यांत राहिजे जीवेश्वरें। नाना विकारी विकारें। प्रवीण होइजे ॥ १ ॥ घनघट पोंचट स्वभावें। विवरोन जाणिजे जीवें। व्हावें न व्हावें आघवें। जीव जाणे ॥ २ ॥ येकीं मागमागों घेणें। येकां न मागतांच देणें। प्रचीतीनें सुलक्षणें। वोळखावीं ॥ ३ ॥ जीव जीवांत घालावा। आत्मा आत्म्यांत मिसळावा। राहराहों शोध घ्यावा। परांतराचा ॥ ४ ॥ जानवें हेंवडकारें जालें। ढिलेपणें हेवड आलें। नेमस्तपणें शोभलें। दृष्टीपुढें ॥ ५ ॥ तैसेंचि हें मनास मन। विवेकें जावें मिळोन। ढिलेपणें अनुमान। होत आहे ॥ ६ ॥ अनुमानें अनुमान वाढतो। भिडेनें कार्यभाग नासतो। याकारणें प्रत्यय तो। आधीं पाहावा ॥ ७ ॥ दुसऱ्याचे जीवीचें कळेना। परांतर तें जाणवेना। वश्य होती लोक नाना। कोण्याप्रकारें ॥ ८ ॥ आकल सांडून परती। लोक वशीकरण करिती। अपूर्णपणें हलु पळती। ठाईं ठाईं ॥ ९ ॥ जगदीश आहे जगदंतरीं। चेटकें करावीं कोणावरी। जो कोणी विवेकें विवरी। तोचि श्रेष्ठ ॥ १० ॥ श्रेष्ठ कार्यें करी श्रेष्ठ। कृत्रिम करी तो कनिष्ठ। कर्मानुसार प्राणी नष्ट। अथवा भले ॥ ११ ॥ राजे जाती राजपंथें। चोर जाती चोरपंथें।

शरीरें हीं अस्थिमांसांचीं असून त्यांत अनेक जीव राहतात व मनोविकारांनीं युक्त होऊन त्यांत वावरतात. घट्ट पातळ, स्थूळ सूक्ष्म हें जीव जाणतो, पाहिजे नको हें त्याला कळतें. एकाला भिक्षा मागून मिळते, दुसऱ्याला न मागतांच लोक मागें लागून देतात; सभाग्यांचीं लक्षणें अनुभवानें जाणावीं. दुसऱ्याच्या जीवांत जीव घालावा, आत्मा आत्म्यांत मिसळावा, वारंवार इतरांचें मनोगत जाणावें. गबाळपणें वागल्यानें गळ्यांतले जानव्यांची गुंतागुंत होते, व्यवस्थित राहिल्यानें तें सुशोभित दिसतें, त्याप्रमाणें विवेकानें पराच्या अंतरांत मिळून जावें, ढिलेपणानें संशय वाढतात व ऐक्यभाव होत नाहीं. संशयानें संशय वाढतात, ते भिडेमुळें काढून न टाकले तर गैरसमज वाढून कार्याची हानि होते, म्हणून अनुमानानें चालूं नये – प्रत्ययानें चालावें, दुसऱ्यांच्या मनांतले भाव व विचार कळले नाहींत तर लोक कोणत्या प्रकारें वश होतील? विचारानें व अकलेनें न चालतां जे वशीकरण प्रयोग करितात, ते कच्चेपणामुळें—मन व्यापक व विशाल नसल्यामुळें (अपूर्णपणें) – जागोजाग हलके पडतात. जगदीश जगाचे अंतरीं भरला असल्यामुळें चेटकें कोणावर करणार? विवेकबळानें पाहील तोच पुरुष श्रेष्ठ होय (१–१०). श्रेष्ठत्व कर्मानें येतें. श्रेष्ठ कार्य मनोभावें करील तो श्रेष्ठ, चुकारपणें करील तो कनिष्ठ. कर्माप्रमाणें नष्ट किंवा भले समजले जातात. राजे उजळ माथ्यानें रस्त्यानें जातात, चोरांना

वेडें ठकलें अल्पस्वार्थें । मूर्खपणें ॥ १२ ॥ मूर्खास वाटे मी शाहाणा ।
परी तो वेडा दैन्यवाणा । नाना चातुर्याच्या खुणा । चतुर जाणे
॥ १३ ॥ जो जगदंतरें मिळाला । तो जगदंतरचि जाला । अरत्रीं परत्रीं
तयाला । काय उणें ॥ १४ ॥ बुद्धि देणें भगवंताचें । बुद्धीवीण माणुस
कांचें । राज्य सांडून फुकाचें । भीक मागे ॥ १५ ॥ जें जें जेथें निर्माण
जालें । तें तें तयास मानलें । अभिमान देऊन गोविलें । ठाईं ठाईं ॥ १६ ॥
अवघेच म्हणती आम्ही थोर । अवघेचि म्हणती आम्ही सुंदर । अवघेचि
म्हणती आम्ही चतुर । भूमंडळीं ॥ १७ ॥ ऐसा विचार आणितां मना ।
कोणीच लाहान म्हणवीना । जाणते आणिती अनुमाना । सकळ कांहीं
॥ १८ ॥ आपुलाल्या साभिमानें । लोक चालिले अनुमानें । परंतु हें
विवेकानें । पाहिलें पाहिजे ॥ १९ ॥ लटिक्याचा साभिमान घेणें । सत्य
अवघेंच सोडणें । मूर्खपणाचीं लक्षणें । तीं हीं ऐसीं ॥ २० ॥ सत्याचा जो
साभिमान । तो जाणावा निरभिमान । न्याय अन्याय समान । कदापि
नव्हे ॥ २१ ॥ न्याय म्हणिजे तो शाश्वत । अन्याय म्हणिजे तो अशाश्वत ।
बाष्कळ आणि नेमस्त । येक कैसा ॥ २२ ॥ येक उघड भाग्य भोगिती ।
येक तस्कर पळोन जाती । येकांची प्रगट महंती । येकांची कानकोंडी ॥२३॥
आचारविचारेंवीण । जें जें करणें तो तो सीण । धूर्त आणि विचक्षण ।
तेचि शोधावे ॥ २४ ॥ उदंड बाजारी मिळाले । परी ते धूर्तीचि आळिले ।
धूर्तांपासीं कांहीं न चले । बाजाऱ्यांचें ॥ २५ ॥ याकारणें मुख्य मुख्य ।

चोरवाटा शोधाव्या लागतात. मूर्ख लहान होऊन अल्पस्वार्थ पाहतात व म्हणून फसतात. मूर्ख स्वतःलाच शाहणा समजत असतो, पण तो दीन पामर होय ; चातुर्याचीं लक्षणें चतुरच जाणतो. जो जगाच्या अंतरीं मिळून गेला तो जगाचें अंतर (हृदय) झाला, त्याला इहपरलोकीं कांहींच कमी नाहीं. बुद्धि हें देवाचें देणें. बुद्धि नाहीं तर मनुष्य कच्चें (ढिलें) होय, तें असलेलें राज्य व्यर्थ गमावून बसतें. जें जें जेथें देवानें उत्पन्न केलें आहे, ज्याला ज्याला जो जो गुणस्वभाव मिळाला आहे, त्याच्या त्याच्याशीं बुद्धीवान् मनुष्य मिळून जातो, व त्या त्या मनुष्याचा स्वाभिमान जागृत करून किंवा त्याचा गौरव करून त्याला उशी देऊन हळू हळू कार्याला लावतो (११–१६). या पृथ्वीवर प्रत्येकजण आपल्याला थोर, सुंदर व चतुर समजत असतो, पाहिलें तर कोणीच स्वतःकडे कमीपणा घ्यायला तयार नसतो, पण जाणते पुरुष सर्व कांहीं (खरा कोण, खोटा कोण हें) समजून जाणतात. लोक अभिमानाला वश होऊन अनुमानानें चालतात, पण विवेकानें शहाण्याला पाहावें लागतें. खोट्याचा अभिमान (पक्ष) घ्यावा आणि खरें सर्वस्वी टाकावें हें मूर्खांचें लक्षण होय. सत्याचा अभिमान किंवा कैवार घेणें हेंच खरोखर निरभिमानाचें लक्षण होय ; न्याय आणि अन्याय सारख्याच मापानें जोखूं नयेत. न्याय शाश्वत व अन्याय अशाश्वत (कांहीं काळानें उडून जाणारा) असतो. बाष्कळ (नियमरहित) आणि नेमक (नियमानें चालणारा) एक कसा म्हणावा ? एक उघड भाग्यश्री भोगतो व चोर प्रकाशाला भिऊन पळतो, एकाची महती राजरोसपणें जाहीर असते व एकाची कोपऱ्यांत लपलेली, सातपांच शिष्यांपुरती चोरटी (कानकोंडी) असते. आचार व विचार दोन्ही झळझळीत पाहिजेत, त्यांवांचून सारी खटखट होते. म्हणून धूर्त आणि चतुर कोण ते पाहावेत (१७–२४). धूर्त म्ह. दूरदर्शी चतुर पुरुष साऱ्या बाजाऱ्यांना आपल्या कंपूंत घेतो, त्यापुढें त्यांचें कांहीं चालत नाहीं. धूर्ताधूर्तांचें सख्य होतें ; वेडे कार्यसिद्धीचें वर्म न

तयांसीं करावें सख्य। येणेंकरितां असंख्य। बाजारी मिळती ॥ २६ ॥
धूर्तासि धूर्तचि आवडे। धूर्त धूर्तांच पवाडे। उगेचि हिंडती वेडे।
कार्येंविण ॥ २७ ॥ धूर्तासि धूर्तपण कळलें। तेणें मनास मन मिळालें।
परी हें गुप्तरूपें केलें। पाहिजे सर्वें ॥ २८ ॥ समर्थाचें राखतां मन। तेथें
येती उदंड जन। जन आणि सज्जन। आर्जव करिती ॥ २९ ॥ वोळखीनें
वोळखी साधावी। बुद्धीनें बुद्धि बोधावी। नीतिन्यायें वाट रोधावी। पाषांडाची
॥ ३० ॥ वेष धरावा बावळा। अंतरीं असाव्या नाना कळा। सगट
लोकांचा जिव्हाळा। मोडूं नये ॥ ३१ ॥ निस्पृह आणि नित्य नूतन।
प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान। प्रगट जाणता सज्जन। दुर्लभ जगीं ॥ ३२ ॥ नाना
जिनसपाठांतरें। निवती सकळांचीं अंतरें। चंचळपणें तदनंतरें। सकळां
ठाईं ॥ ३३ ॥ येके ठाईं बैसोन राहिला। तरी मग व्यापचि बुडाला।
सावधपणें ज्याला त्याला। भेटी द्यावी ॥ ३४ ॥ भेटभेटों उरी राखणें।
हीं चातुर्याचीं लक्षणें। मनुष्यमात्र उत्तम गुणें। समाधान पावे ॥ ३५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चातुर्यलक्षणनाम समास प्रथम ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥ पृथ्वीमध्यें मानवी शरीरें। उदंड दाटलीं लाहानथोरें।
पालटती मनोविकारें। क्षणक्षणा ॥ १ ॥ जितुक्या मूर्ती तितुक्या प्रकृती।
सारिख्या नसती आदिअंतीं। नेमचि नाहीं पाहावें किती। काय म्हणोनी
॥ २ ॥ कित्येक म्लेंच्छ होऊन गेले। कित्येक फिरंगणांत आटले। देशभाषानें

जाणतां उगाच भटकत असतात. एका धूर्तास दुसऱ्याचें धूर्तपण कळतें व म्हणून दोघांचें चटपटून जातें, पण हें सारें गुपचूप (गाजावाजा न करितां) केलें पाहिजे. म्होरक्या वश केला कीं त्याचे सारे अनुयायी वश होतात; याप्रमाणें सज्जन व सामान्यजन दोन्ही आपलेसे होतात. एका ओळखीनें दुसऱ्याची ओळख साधावी, आपल्या बुद्धीनें दुसऱ्याची बुद्धि चेतवावी, आणि (असे अनेक म्होरके म्ह० गुरु किंवा पुढारी व त्यांचे शिष्य किंवा अनुयायी एक करून सर्वांच्या एकवट प्रयत्नानें) नीतिन्यायाचा पुरस्कार करून पाखांडाला (पाखांड म्ह० वेदशास्त्रविरुद्ध मत) समाजांत पसरूं न देतां त्याला अडवावें–त्याचा मार्ग खुंटवावा. वेष मात्र बावळा असावा, अंतरीं अनेक युक्ति प्रयुक्ति असाव्यात, सर्व लोकांचा प्रेमभाव अगदीं मोडूं नये. स्वतः निस्पृह म्ह. निरपेक्ष कार्यकर्ता आणि नित्यनूतन (माणसांना वश करून कामाला लावण्यासाठीं) हिंडणारा असून त्यापाशीं अनुभवाचें ब्रह्मज्ञान पाहिजे; सर्व स्पष्ट निःसंदेह जाणणारा असून सौजन्याची तो मूर्ति असावा–असा पुरुष परम दुर्लभ होय. त्याचें पाठपाठांतर अपार असलें कीं सर्वांचीं अंतरें प्रसन्न होऊन लोक वेधले जातात. तो सर्वत्र सदा संचार करणारा पाहिजे. तो एके ठिकाणींच बसून राहील तर मोठा व्याप बंद राहील. म्हणून सावधपणें ज्याला त्याला भेटी देत त्यानें फिरलें पाहिजे. वारंवार भेटून त्यानें इतरांची पुन्हां भेटण्याची इच्छा कायम राखली पाहिजे (२५–३५). [द० १५, स० १]

ह्या पृथ्वीच्या पाठीवर लहानमोठीं कोट्यावधि माणसें आहेत. त्यांच्या मनोवृत्ति वारंवार पालटत असतात. मूर्ति तितक्या प्रकृति आणि त्या प्रकृतिही सतत एकसारख्या राहत नाहींत, नेहमीं पालटत असतात. त्या कोठवर सांगाव्या? कित्येक मुसलमानी धर्म स्वीकारून (समाजाच्या बाहेर) गेले आहेत, कित्येक बाटून पोर्तुगीज मुलखांत (ख्रिस्ती होऊन)

रुधिले। कितीयेक ॥ ३ ॥ मऱ्हाष्टदेश थोडा उरला। राजकारणें लोक रुधिला। अवकाश नाहीं जेवायाला। उदंड कामें ॥ ४ ॥ कित्येक युद्धप्रसंगीं गुंतले। तेणें गुणें उन्मत्त जाले। रात्रंदिवस करूं लागले। युद्धचर्चा ॥ ५ ॥ उदिम्यास व्यासंग लागला। अवकाश नाहींसा जाला। अवघा पोटधंदाच लागला। निरंतर ॥ ६ ॥ षड्दर्शनें नाना मतें। पाषांडें वाढलीं बहुतें। पृथ्वीमध्यें जेथतेथें। उपदेसिती ॥ ७ ॥ स्मार्थीं आणि वैष्णवीं। उरलीं सुरलीं नेलीं आघवीं। ऐसी पाहातां गोवी। उदंड जाली ॥ ८ ॥ कित्येक कामनेचे भक्त। ठाईं ठाईं जाले आसक्त। युक्त अथवा अयुक्त। पाहातो कोण ॥ ९ ॥ या गल्बल्यामध्यें गल्बला। कोणी कोणी वाढविला। त्यास देखों सकेनासा जाला। वैदिक लोक ॥ १० ॥ त्याहीमध्यें हरिकीर्तन। तेथें वोढले कित्येक जन। प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान। कोण पाहे ॥ ११ ॥ याकारणें ज्ञान दुर्लभ। पुण्यें घडे अलभ्य लाभ। विचारवंता सुलभ। सकळ कांहीं ॥ १२ ॥ विचार कळला सांगतां नये। उदंड येती अंतराय। उपाय योजितां अपाय। आडवे येती ॥ १३ ॥ त्याहीमध्यें जी तीक्ष्ण। रिकामा जाऊं नेदी क्षण। धूर्त तार्किक विचक्षण। सकळां माने ॥ १४ ॥ नाना जिनस उदंड पाठ। वदों लागला घडघडाट। अव्हाटची केली वाट। सामर्थ्यबळें ॥ १५ ॥ प्रबोध शक्तीचीं अनंत द्वारें। जाणे सकळांचीं अंतरें। निरूपणें तदनंतरें।

गेले आहेत, कित्येक भिन्न भिन्न देशभाषांनीं निरनिराळ्या प्रांतांत (कर्नाटक, गुजराथ, बंगाल इ०) अडकून पडले आहेत. (सर्व भारतीयांची एक भाषा नसल्यामुळें सर्वांची संघटनात्मक शक्ति एकवटून कार्य करायला अडचण झाली आहे. या सर्व अडचणींमुळें कार्यक्षेत्र संकुचित होऊन) महाराष्ट्र देश तेवढा कार्यास मोकळा उरलेला दिसतो. तेथें राजकारणानें लोक रोधिले असून इतकीं कामें त्यांच्यामागें आहेत कीं त्यांना जेवायलाही फुरसत होत नाहीं. कित्येक युद्धप्रसंगांत गुंतले असून युद्धाच्या गोष्टीशिवाय त्यांना कांहींच सुचत नाहीं, व्यापारधंद्याचे लोक आपल्या पोटाच्या पाठीमागेंच लागले आहेत. षड्दर्शनें, अनेक मतें, व याशिवाय कित्येक पाखांडें पृथ्वीवर वाढलीं असून जेथें तेथें उपदेशाचें काम चालू आहे. उरलीं सुरलीं स्मार्त–वैष्णव या पंथांत गुरफटलीं आहेत. असा सर्वत्र गोंधळ माजला आहे. कित्येक कामना धरून केवळ सकाम व्रतें आचरीत आहेत. योग्यायोग्य तारतम्य पाहतो कोण? या मतामतांच्या गलबल्यांत आणखी कांहीं गलबले उठले आहेत व त्यांच्याशीं वैदिकांचा झगडा चालला आहे, त्यांत आणि कित्येक हरिकीर्तनांतच मग्न झाले आहेत. प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान कोण पाहतो ? म्हणून ज्ञान अत्यंत दुर्लभ झालें आहे; थोर पुण्याशिवाय ज्ञानाकडे कोणी पाहत नाहीं. विचार करणाराला सर्व कांहीं सुलभ आहे. ज्ञानविचार सर्वांना सांगतां येत नाहीं. अनेक विघ्नें आडवीं येतात, उपाय म्हणून करूं जावें तोच अपाय होतो (१–१३). प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान ज्यापाशीं आहे असा विचारवंत पुरुष कसा वागतो तें सांगतों. त्याची बुद्धि अत्यंत तीक्ष्ण असते व तो विचाराशिवाय एक क्षणही फुकट दवडीत नाहीं; धूर्त, तर्कशुद्ध चालणारा, विचक्षण आणि सर्वमान्य, ग्रंथावलोकन दांडगें, पाठपाठांतर अतिशय. आपल्या प्रबोधशक्तीनें आडवाटा बंद करून सरळ मार्ग घालून देतो. सर्वांचीं अंतःकरणें वश करून घेतो. प्रबोधशक्तीचीं अनंत द्वारें त्याला माहीत आहेत, यामुळें त्याचें निरूपण एकवार ऐकलें कीं पुन्हां पुन्हां ऐकावें असा तो लोकांना चटका लावून जातो. स्वानुभवाचे बोल बोलून मतमतांतरें पार

चटक लागे ॥ १६ ॥ मतें मतांतरें सगट। प्रत्यय बोलोन करी सपाट। दंडक सांडून नीट। वेधी जना ॥ १७ ॥ नेमकें भेदकें वचनें। अखंड पाहे प्रसंगमानें। उदास वृत्तीच्या गुमानें। उठोन जातो ॥ १८ ॥ प्रत्यय बोलोन उठोन गेला। चटक लागली लोकांला। नाना मार्ग सांडून त्याला। शरण येती ॥ १९ ॥ परी तो कोठें आडळेना। कोणे स्थळीं सांपडेना। वेष पाहातां हीनदीना–। सारिखा दिसे ॥ २० ॥ उदंड करी गुप्तरूपें। भिकाऱ्यासारिखा स्वरूपें। तेथें यशकीर्तिप्रतापें। सीमा सांडिली ॥ २१ ॥ ठाईं ठाईं भजन लावी। आपण तेथून चुकावी। मत्सर-मतांची गोंवी। लागोंच नेदी ॥ २२ ॥ खनाळामध्यें जाऊन राहे। तेथें कोणीच न पाहे। सर्वत्रांची चिंता वाहे। सर्वकाळ ॥ २३ ॥ अवघड स्थळीं कठीण लोक। तेथें राहणें नेमक। सृष्टीमध्यें सकळ लोक। धुंडीत येती ॥ २४ ॥ तेथें कोणाचें चालेना। अनुमात्र अनुमानेना। कट्ट घालून राजकारणा। लोक लावी ॥ २५ ॥ लोकीं लोक वाढविले। तेणें अमर्याद जाले। भूमंडळीं सत्ता चाले। गुप्तरूपें ॥ २६ ॥ ठाईं ठाईं उदंड ताबे। मनुष्यमात्र तितुके झोंबे। चहुंकडे उदंड लांबे। परमार्थबुद्धी ॥ २७ ॥ उपासनेचा गजर। स्थळोस्थळीं थोर थोर। प्रत्ययानें प्राणिमात्र। सोडविले ॥ २८ ॥ ऐसे कैवाड उदंड जाणे। तेणें लोक होती शाहाणे। जेथें तेथें प्रत्यय बाणे। प्राणिमात्रांसी ॥ २९ ॥ ऐसी कीर्ति करून जावें। तरीच

जागच्या जागीं बसवितो, व लोकांचे अज्ञानाचे मार्ग त्यांना सोडायला लावून आपल्या सरळ मार्गावर आणून सोडतो. तो प्रसंगमान पाहून नेमके भेदक वचन बोलतो आणि वेध लावून निस्पृहपणाच्या डौलानें (गुमानें) निघून जातो. स्वानुभवाचे दोन नेमके शब्द बोलून एकदम गेला कीं लोकांना अधिकच चटक लागते व आपले मार्ग सोडून त्याला शरण येतात. त्याला लोक धुंडतात पण तो कोठें सांपडत नाहीं, तो एका स्थळीं राहत नाहीं, वेष पाहाल तर तोही धड नाहीं. मोठमोठालीं कामें गुप्तरूपानें करितो पण वेष बावळा व दरिद्री. अशा पुरुषाला यशकीर्तिप्रताप शोभीत येतात. जागोजाग लोकांना भजनाला लावतो, आपण त्यांच्या उपाधींत अडकून पडत नाहीं, व यामुळें कोणाचा मत्सर–हेवादेवा यापासून तो मुक्त असतो. दुर्घट अशा दऱ्याखोऱ्यांत (खनाळ) कोठें तरी जाऊन राहतो, कोणालाही सांगत नाहीं व सर्वांची तेथें सर्वकाळ चिंता करितो. लोकांना जाण्यायेण्याला कठिण अशा अवघड स्थळीं तो राहतो, व अशा पुरुषावांचून आपला उद्धार कोणीही करायला समर्थ नाहीं असा स्वसामर्थ्याचा चटका लोकांना लावल्यामुळें लोक त्याला तेथें धुंडीत जातात. त्याच्यापुढें कोणाचें चालत नाहीं, त्याचें कोणालाच कांहीं अनुमानानें कळत नाहीं. तो सर्वांचें ऐक्य करून (कट्ट घालून) लोकांना राजकारणाला लावतो. शिष्यानें शिष्य असा अफाट समुदाय वाढवतो व गुप्तपणें त्याची सत्ता उदंड चालते जागोजाग त्याचीं मंडळें पसरलेलीं असतात, सारीं माणसें त्याच्या मार्गाला लागतात. चहूंकडे परमार्थबुद्धि वाढवून सर्वत्र लोकांकडून उपासनेचा जयजयकार करवितो. प्रत्ययाच्या ज्ञानबळावर लोक विविध बंधांपासून मुक्त करितो. असे अनेक प्रकार करून लोकांना तो शाहणे करितो. प्रत्ययानें पाहणारे व वागणारे हजारों लोक तो जागोजाग तयार करितो

संसारास यावें । दास म्हणे हें स्वभावें । संकेतें बोलिलें ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे निस्पृहव्यापलक्षणनाम समास द्वितीय ॥ २ ॥

॥ श्रीराम ॥ मूळापासून सैरावैरा । अवघा पंचीकरणपसारा । त्यांत साक्षित्वाचा दोरा । तोहि तत्वरूप ॥ १ ॥ दुरस्ता दाटल्या फौजा । उंच सिंहासनीं राजा । याचा विचार समजा । अंतर्यामीं ॥ २ ॥ देहमात्र अस्थिमांसाचें । तैसेंचि जाणावें नृपतीचें । मूळापासून सृष्टीचें । तत्वरूप ॥ ३ ॥ रायाचे सत्तेनें चालतें । परंतु अवघीं पंचभूतें । मूळीं आधिक जाणीवेचें तें । अधिष्ठान आहे ॥ ४ ॥ विवेकें बहुत पैसावले । म्हणोन अवतारी बोलिले । मनु चक्रवती जाले । येणेंचि न्यायें ॥ ५ ॥ जेथें उदंड जाणीव । तेचि तितुकें सदेव । थोडे जाणीवेनें निर्देव । होती लोक ॥ ६ ॥ व्याप आटोप करिती । धके चपेटे सोसिती । तेणें प्राणी सदेव होती । देखतदेखतां ॥ ७ ॥ ऐसें हें आतां वर्ततें । मूर्ख लोकांस कळेना तें । विवेकी मनुष्य समजतें । सकळ कांहीं ॥ ८ ॥ थोर लहान बुद्धीपासीं । सगट कळेना लोकांसी । आधीं उपजलें तयासी । थोर म्हणती ॥ ९ ॥ वयें धाकुटा नृपती । वृद्ध तयास नमस्कार करिती । विचित्र विवेकाची गती । कळली पाहिजे ॥ १० ॥ सामान्य लोकांचें ज्ञान । तो अवघाच अनुमान । दीक्षादंडकाचें लक्षण । येणेंचि पाडें ॥ ११ ॥ नव्हे कोणांसी म्हणावें । सामान्यास काय ठावें । कोणकोणास म्हणावें । किती म्हणोनी ॥ १२ ॥ धाकुटा भाग्यास

(१४–२९). या किर्त्याप्रमाणें वागून उदंड कीर्ति करून जावें तरच जन्म घेतल्याचें सार्थक. प्रसंग आला म्हणून हें थोडक्यांत सांगितलें आहे (३०). [द० १५, स० २].

मूळमायेपासून सारा पंचतत्वांचा कर्दम होऊन हा जो पिंडब्रह्मांडात्मक विविध पसारा अस्ताव्यस्त पसरलेला आहे, त्यांत साक्षित्वाचा (अंतरात्मा) जो ओतप्रोत दोरा भरलेला आहे तोही तत्वरूपच आहे. दुतर्फा दाट फौजा उभ्या राहिल्या असून मध्यें उंच सिंहासनावर राजा बसला आहे हें ध्यानांत आणा म्हणजे हें सर्व समजेल. सारेच देह अस्थिमांसांचे आहेत, राजाचाही देह तसाच; त्याप्रमाणें भूतभौतिक सृष्टि व तिचा साक्षी जाणीवरूप अंतरात्मा हे दोन्ही तत्वरूपच आहेत. राजाच्या सत्तेनें फौज चालते किंवा अंतरात्म्याच्या सत्तेनें सृष्टि चालते पण हे सारे तत्वांतले आहेत, त्यांत भेद फक्त जाणीवेचा आहे. विवेकानें (जाणीव) मोठे झाले म्हणून थोरांला अवतारी म्हणतात, मन्वादि यामुळें श्रेष्ठ मानले जातात (१–५). जाणीव अधिक म्हणून भाग्यवंत, जाणीव कमी म्हणून करंटे. मोठे श्रम साहस करितात, धक्के चपेटे सोसतात तेच लोक भाग्याला चढतात हें आपण पाहतों. हें मूर्खांना कळत नाहीं, विवेकी उमजतात. जाणीव किंवा बुद्धि कमी जास्त म्हणून लहान थोर हा भेद होतो, आधीं जन्मले त्यांस थोर म्हणतात हा लौकिकी प्रकार. राजा बाल असला तरी वृद्ध त्यापुढें नमतात. विवेकाची गोष्ट समजली पाहिजे. सामान्य लोकांचें ज्ञान सारें अनुमानाचें. दीक्षा (संप्रदाय) किंवा दंडक (लोकरूढी) याच प्रकारच्या. वयानें वृद्ध तो श्रेष्ठ असल्या सामान्यांच्या समजुतीनें काय म्हणावें ? कोणाचीं तोंडें धरावींत ? वयानें धाकटा असून एखादा भाग्यानें थोर निघाला तर सलगीचीं माणसें त्याला

चढला। तरी तुच्छ करिती तयाला। याकारणें सलगीच्या लोकांला। दुरी धरावें ॥ १३ ॥ नेमस्त कळेना वचन। नेमस्त नये राजकारण। उगेचि धरिती थोरपण। मूर्खपणें ॥ १४ ॥ नेमस्त कांहींच कळेना। नेमस्त कोणीच मानीना। आधीं उपजलें त्या थोरपणा। कोण पुसे ॥ १५ ॥ वडिलां वडिलपणे नाहीं। धाकुट्यां धाकुटपण नाहीं। ऐसें बोलती त्यांस नाहीं। शाहाणपण ॥ १६ ॥ गुणेंविण वडिलपण। हें तों आवघेंच अप्रमाण। त्याची प्रचीत प्रमाण। थोरपणीं ॥ १७ ॥ तथापि वडिलांस मानावें। वडिलें वडिलपण जाणावें। नेणतां पुढें कष्टावें। थोरपणीं ॥ १८ ॥ तस्मात् वाडिल अंतरात्मा। जेथें चेतला तेथें महिमा। हें तों प्रगटचि आहे आम्हां। शब्द नाहीं ॥ १९ ॥ याकारणें कोणीयेकें। शाहाणपण सिकावें विवेकें। विवेक न सिकतां तुकें। तुटोन जाती ॥ २० ॥ तुक तुटलें म्हणिजे गेलें। जन्मा येऊन काय केलें। बळेंचि सांदीस घातलें। आपणासी ॥ २१ ॥ सगट बायका सिव्या देती। सांदीस पडिला ऐसें म्हणती। मूर्खपणाची प्राप्ती। ठाकून आली ॥ २२ ॥ ऐसें कोणीयेकें न करावें। सर्व सार्थकचि करावें। कळेना तरी विवरावें। ग्रन्थांतरीं ॥ २३ ॥ शाहाण्यास कोणीतरी बाहती। मूर्खास लोक दवडून देती। जीवास आवडे संपत्ति। तरी शाहाणे व्हावें ॥ २४ ॥ अहो या शाहाणपणाकारणें। बहुतांचे कष्ट करणें। परंतु शाहाणपण सिकणें। हें उत्तमोत्तम ॥ २५ ॥ जो बहुतांस मानला। तो जाणावा शाहाणा जाला। जनीं शाहाण्या मनुष्याला। काय उणें ॥ २६ ॥ आपलें हित न करी लोकिकीं। तो जाणावा

तुच्छ करितात. म्हणून सलगीच्या लोकांना दूर ठेवावें. व्यवस्थितपणा किंवा शिस्तवचनपरिपालनांत किंवा राजकारणांत किंवा कशांतच माहीत नसून कित्येक मूर्खपणानें स्वतःस थोर समजतात, पण केवळ आधीं जन्मले एवढ्यावरच थोरपणा कोण द्यायला बसलें आहे ? वडिलांना वडिलपण उरलें नाहीं व धाकट्यांना धाकटेपण उरलें नाहीं असें कोणी वयोवृद्ध म्हणूं लागेल व धाकट्या पण ज्ञानवान् मनुष्याचा अपमान करूं लागेल तर या वृद्धालाच शहाणपण नाहीं असें आम्हीं म्हणूं. गुणांवांचून वडिलपणाला कोण पुसतो ? तथापि धाकट्यांनीं वडिलांस मानावें व वडिलांनीं खरें वडिलपण वयांत नसून ज्ञानांत आहे हें जाणावें, असें ते न करितील तर वृद्धपणीं त्यांना दुःख भोगावें लागेल. म्हणून सर्वांत वडिल असा अंतरात्मा ज्या ठिकाणीं प्रगट झाला तेथें मोठेपण आहे. हें उघड असल्यामुळें आम्हीं वर जें म्हटलें त्याबद्दल आमच्याकडे दोष येऊं शकणार नाहीं (६–१९). यास्तव विवेकानें शहाणपण शिकावें, न शिकल्यास महत्त्व टिकणार नाहीं. महत्त्व घालविलें तर जन्मास येऊन मिळविलें काय ? आपणांस बळेंच कोपऱ्यांत घालणें शहाणपणाचें आहे काय ? साऱ्या बायकाही त्याला मूर्ख म्हणतील – म्हणून असें न करितां मुख्य शहाणपण तें शिकावें म्हणजे सार्थक होतें, हें नीट न कळलें तर ग्रंथांत पाहावें. शहाण्यास लोक सत्कारानें बोलावतात व मूर्खास घालवून देतात. ज्याला भाग्य पाहिजे असेल त्यानें शहाणपण शिकावें. अहो ! शहाणपण शिकण्यासाठीं अनेकांचे कष्ट करणें भाग झालें तरी कष्ट करावे पण शहाणपण शिकावें हें उत्तमोत्तम. जो बहुतांना मान्य झाला तो शहाणा. शहाण्याला या जगांत काय कमी आहे ? लौकिकांत राहून जो स्वहित साधीत नाहीं त्याला आत्मघातकी म्हणावें, त्याच्याइतका पापी कोण आहे ? स्वतः संसारांत क्लेश भोगावे, आणि

आत्मघातकी । या मूर्खायेवढा पातकी । आणिक नाहीं ॥ २७ ॥ आपण संसारीं कष्टतो । लोकांकरवीं रागेजोन घेतो । जनांमध्यें शाहाणा तो । ऐसें न करी ॥ २८ ॥ साधकां सिकविलें स्वभावें । मानेल तरी सुखें घ्यावें । मानेना तरी सांडावें । येकीकडे ॥ २९ ॥ तुम्ही श्रोते परम दक्ष । अलक्षास लावितां लक्ष । हें तों सामान्य प्रत्यक्ष । जाणतसां ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्य-संवादे श्रेष्ठअंतरात्मानिरूपणनाम समास तृतीय ॥ ३ ॥

॥ श्रीराम ॥ पृथ्वीपासून जालीं झाडें । झाडापासून होती लांकडें । लांकडें भस्मोन पुढें । पृथ्वीच होय ॥ १ ॥ पृथ्वीपासून वेल होती । नाना जिनस फांपावती । वाळोन कुजोन मागुती । पृथ्वीच होय ॥ २ ॥ नाना धान्यांचीं नाना अन्नें । मनुष्यें करिती भोजनें । नाना विष्ठा नाना वमनें । पृथ्वीच होय ॥ ३ ॥ नाना पक्ष्यादिकीं भक्षिलें । तरी पुढें तैसेंचि जालें । वाळोन भस्म होऊन गेलें । पुन्हां पृथ्वी ॥ ४ ॥ मनुष्यें मरतांच ऐका । कृमि भस्म कां मृत्तिका । ऐशा काया पडती अनेका । पुढें पृथ्वी ॥ ५ ॥ नाना तृणें पदार्थ कुजती । पुढें त्याची होय माती । नाना किडे मरोन जाती । पुढें पृथ्वी ॥ ६ ॥ पदार्थ दाटले अपार । किती सांगावा विस्तार । पृथ्वीवांचून थार । कोणास आहे ॥ ७ ॥ झाड पाले आणि तृण । पशु भक्षितां होतें सेण । खात मूत भस्म मिळोन । पुन्हां पृथ्वी ॥ ८ ॥ उत्पत्तिस्थितिसंव्हारतें । तें तें पृथ्वीस मिळोन जातें । जितुकें होतें आणि जातें । पुन्हां पृथ्वी ॥ ९ ॥ नाना बीजांचिया रासी । विरुढोन लागती गगनासी । पुढें सेवटीं पृथ्वीसी । मिळोन जाती ॥ १० ॥ लोक नाना धातु पुरिती । बहुतां दिवसां होय माती । सुवर्णपाषाणाची गती । तैसीच आहे ॥ ११ ॥ मातीचें होतें सुवर्ण । आणी

लोकांनीं वर मूर्ख समजून रागवावें—असें शहाणा कधीं वागायचा नाहीं. हें साधकांना शिकविलेलें त्यांनीं हवें तर घ्यावें, नाहींतर सोडावें—यांत आमचें कांहीं जात नाहीं. तुम्ही श्रोते चतुर आहांत, अलक्ष्य अशा परमात्म वस्तूला ओळखणारे आहांत—येथें सांगितलेली सामान्य गोष्ट तर तुम्हांला माहीत आहेच (२०–३०). [द० १५, स० ३]

पृथ्वीपासून झाडें व झाडांपासून लांकडें होतात आणि लांकडें जळून भस्मून पुन्हां पृथ्वीच होतात. पृथ्वीपासून वेल होऊन वाढतात, व ते वाळून कुजून पुन्हां पृथ्वीच होतात. नाना धान्यें व अन्नें माणसें खातात, व विष्टावमनादिरूपानें पुन्हां पृथ्वीपणालाच येतात; पशुपक्ष्यादिकांच्या आहारांची तीच गत होते. मनुष्यें मेल्यावर त्यांच्या शवांचीं कृमि, भस्म किंवा माती अशीं रूपें होतात, चार खाणींच्या अनंत प्राण्यांचे देह असेच पृथ्वीत्वाला पुन्हां येतात. तृणपदार्थ कुजतात, किडे वगैरे मरून जातात. सर्व पृथ्वीपासून झालेले पदार्थ पुन्हां पृथ्वीपणालाच पावतात. पृथ्वीवांचून आधार कोणता आहे? झाडपाले, गवत, पशूंचें शेण, खात, मूत, भस्म, इ. सर्व पृथ्वीत्वालाच येतात. उत्पत्ति, स्थिति आणि संहार ज्यांच्या त्यांच्या मागें आहे जें जें होतें आणि जातें तें तें सारें फिरून पृथ्वीस मिळतें. लक्षावधि वृक्षादि बीजें अंकुरतात, वाढत वाढत गगनभेदी उंच वृक्ष होतात आणि शेवटीं पृथ्वीस मिळून जातात. अनेक धातु, सुवर्ण, पाषाण शेवटीं पृथ्वीच

मृत्तिकाची होती पाषाण । महा अग्निसंगें भस्मोन । पृथ्वीच होय ॥ १२ ॥ सुवर्णाचें जर होतें । जर सेवटीं कुजोन जातें । रस होऊन वितुळतें । पुन्हां पृथ्वी ॥ १३ ॥ पृथ्वीपासून धातु निपजती । अग्निसंगें रस होती । तया रसाची होय जगती । कठिणरूपें ॥ १४ ॥ नाना जळासी गंधी सुटे । तेथें पृथ्वीचें रूप प्रगटे । दिवसेंदिवस जळ आटे । पुढें पृथ्वी ॥ १५ ॥ पत्रें पुष्पें फळें येती । नाना जीव खाऊन जाती । ते जीव मरतां जगती । नेमस्त होय ॥ १६ ॥ जितुका कांहीं जाला आकार । तितुक्यास पृथ्वीचा आधार । होती जाती प्राणिमात्र । सेवट पृथ्वी ॥ १७ ॥ हें किती म्हणोनी सांगावें । विवेकें अवघेंचि जाणावें । खांजणीभांजणीचें समजावें । मूळ तैसें ॥ १८ ॥ आप आळोन पृथ्वी जाली । पुन्हां आपींच विराली । अग्नियोगें भस्म जाली । म्हणोनियां ॥ १९ ॥ आप जालें तेजापासुनी । पुढें तेजें घेतलें सोखुनी । तें तेज जालें वायोचेनि । पुढें वायो झडपी ॥ २० ॥ वायो गगनीं निर्माण जाला । पुढें गगनींच विराला । ऐसें खांजणी-भांजणीला । बरें पाहा ॥ २१ ॥ जें जें जेथें निर्माण होतें । तें तें तेथें लया जातें । येणें रितीं पंचभूतें । नाश पावती ॥ २२ ॥ भूत म्हणिजे निर्माण जालें । पुन्हां मागुतें निमालें । पुढें शाश्वत उरलें । परब्रह्म तें ॥ २३ ॥ तें परब्रह्म जों कळेना । तों जन्ममृत्य चुकेना । चत्वार खाणी जीव नाना । होणें लागे ॥ २४ ॥ जडाचें मूळ तें चंचळ । चंचळाचें मूळ तें निश्चळ । निश्चळासी नाहीं मूळ । बरें पाहा ॥ २५ ॥ पूर्वपक्ष म्हणिजे जालें । सिद्धांत म्हणिजे निमालें । पक्षातीत जें संचलें । परब्रह्म तें ॥ २६ ॥ हें

होतात. मातीचेंच सोनें व पाषाण वगैरे होऊन अग्नीची भयंकर आंच लागली कीं त्यांचीही गति तीच होते. सोन्याचा जर होऊन कुजतो. पृथ्वीपासून होणाऱ्या अनेक धातूंचा अग्निसंगें रस होतो व रसांत काठिण्य येऊन पुन्हां त्याची पृथ्वी होते. उदकांचा गंध हें पृथ्वीचेंच रूप आहे. जळ आटून पृथ्वीरूप होतें. पत्रपुष्पफळें जीव खातात आणि जीव मरतां पृथ्वीरूपच होतात. जो जो आकार, प्राण्याचें होणें जाणें सर्वांचा शेवट पृथ्वी. हें कोठवर सांगावें ! *उभारणी आणि संहारणी* किंवा उत्पत्ति आणि नाश यांचें बीज हेंच आहे (१–१८). पाणी आळून त्याची पृथ्वी होते व ती पुन्हा पाण्यांतच विरून जाते ; आप तेजापासून होऊन शेवटीं त्याला तेजच शोषून घेतें ; तेज वायूपासून होतें आणि अखेर वायूच त्याला झडपून आपल्यांत घेतो ; वायु आकाशाच्या पोटीं निर्माण होऊन आकाशांतच विरून जातो. याला *उभारणी संहारणी किंवा खांजणी भांजणी* म्हणतात. जें जें जेथें उत्पन्न होतें तें तें तेथेंच लय पावतें. याप्रमाणें पंचभूतांचा नाश आहे. भूत याचा अर्थच मुळीं उत्पन्न झालेलें (भू–होणें). उत्पत्ति आहे तेथें नाश आहेच. याहून वेगळें म्ह० उत्पत्ति-नाशरहित व म्हणून शाश्वत असें परब्रह्म आहे (१९–२३). तें परब्रह्म कळत नाहीं तोंवर जन्ममरण टळत नाहीं. चार खाणींच्या यच्चावत् जीवांना होणें जाणें आहे. जडाचें (भूतभौतिकाचें) मूळ चंचळ (अंतरात्मा) व चंचळाचें मूळ निश्चळ आणि निश्चळाला म्ह० ब्रह्माला मात्र मूळ नाहीं (तें अनादि आहे व अनंत आहे). जग झालें आहे व सत्य आहे हा पूर्वपक्ष, तें मिथ्या आहे हा सिद्धांत व या उभय पक्षापलीकडचें परब्रह्म, हें अनुभवानें पाहावें. विचारानें खुणेस पावावें

प्रचीतीनें जाणावें । विचारें खुणेसी बाणावें । विचारेंविण सिणावें । तेंचि मूर्खपण ॥ २७ ॥ ज्ञानी भिडेनें दडपला । निश्चळ परब्रह्म कैचें त्याला । उगाच करितो गल्बला । मायेमध्यें ॥ २८ ॥ माया निःशेष नासली । पुढें स्थिति कैसी उरली । विचक्षणें विवरिली । पाहिजे स्वयें ॥ २९ ॥ निशेष मायेचें निरसन । होतां आत्मनिवेदन । वाच्यांश नाहीं विज्ञान । कैसें जाणावें ॥ ३० ॥ लोकांचे बोलीं जो लागला । तो अनुमानेंच बुडाला । याकारणें प्रत्ययाला । पाहिलेंच पाहावें ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्य-संवादे शाश्वतब्रह्मनिरूपणनाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

॥ श्रीराम ॥ दोघां ऐसीं तीन चालती । अगुणी अष्टधा प्रकृती । अधोर्ध्व सांडून वर्तती । इंद्रफणी ऐसीं ॥ १ ॥ पणतोंडें भक्षितो पणजा ।

विचार सोडून व्यर्थ शिणावें हें मूर्खपण होय. जडचंचळांच्या म्हणजे मायेच्या भिडेनें दडपेल तर तो ज्ञानी असला तरी त्याला निश्चळ पदप्राप्ति होणार नाहीं. मग तो मायेंत खूप बडबडला तरी व्यर्थच. माया निःशेष (मूळमाया किंवा अंतरात्मा त्यासुद्धां) निसरल्यावर पुढें स्थिति कशी असते याचा सूज्ञानें विचार केला पाहिजे. माया निःशेष निसरली कीं खरें आत्मनिवेदन झालें. तेथें वाच्यांश नाहीं मग विज्ञान (स्वस्वरूपस्थिति) जाणावी कशी ? जो लोकांच्या नादीं लागला तो त्याबद्दल अनुमानांतच बुडून राहील, म्हणून विचार करीत करीत स्वानुभव पाहावा (२४--३१). [द० १५, स० ४]

दोघांऐसे तीन चालतात व अगुणी अष्टधा प्रकृति अधोर्ध्व म्ह० अध व ऊर्ध्व सांडून इंद्रफणी ऐसी वर्तते. दोन म्ह० वायुरूप प्रकृति व जाणीवरूप पुरुष, म्ह० मूळमाया निश्चळ व निर्मळ ब्रह्माच्या ठिकाणीं कर्तृत्व नाहीं पण तेथें निर्विकार आकाशांत सहज वातोर्मि उठते तशी 'एकोहं' ही मूळमाया स्फुरली. प्रकृतिपुरुष, शिवशक्ति, अर्धनारी नटेश्वर सारींही हिच्यापासून कर्तृत्वास आरंभ. प्रकृतिपुरुषांत सामरस्य पूर्ण. एकपण मोडूं न देतां दोनपणा दाखवितात. या दोघांऐसे म्ह० मूळमायेच्या मतानें तीन चालतात. तीन म्ह० त्रिगुण त्रिदेव. जाणीव सत्वगुण विष्णु, जाणीव नेणीव मिश्रित रजोगुण ब्रह्मदेव व नेणीव तमोगुण शंकर ही गुणमाया. मूळमायेला अनुसरून गुणमाया चालते. तेथून अगुणी अष्टधाप्रकृति म्ह० त्रिगुणपंचभूतात्मक सृष्टि अध आणि ऊर्ध्व – अध म्ह० जड व ऊर्ध्व म्ह० निश्चळ – दोनी सांडून वर्तते. सत्व, रज, तम हे तीन गुण व आकाश, वायु, अग्नि, आप, पृथ्वी हीं पंचभूतें मिळून अष्टधाप्रकृति ही अगुणी, सूक्ष्म म्हणजे निर्गुणाला जवळ असणारी (स्थूल प्रकृति नव्हे) अध आणि ऊर्ध्व म्ह० जड व निश्चळ सांडून मध्यें (अंतरिक्षांत म्ह० आकाशांत) इंद्रफणीसारखा–इंद्र म्ह० मार्जार व फणी म्ह० सर्प यांच्या खेळासारखा–खेळ खेळते. वायु – अग्नि–आप–पृथ्वी यांत वायु पणजा, अग्नि आजा, आप बाप व पृथ्वी मूल म्ह० वायूचें पतवंड ! आतां पणजा पणतोंडें भक्षितो, पणजा जो वायु तो आपल्या पतवंडाला खाऊन टाकतो अर्थात पृथ्वी वायूंत लीन होते, व पुन्हां वायुपासून अग्नि – आप याक्रमानें पृथ्वी उत्पन्न होते. तात्पर्य, हीं चारही भूतें वायूपासून पृथ्वीपर्यंत एकेकापासून उत्पन्न होतात व एकेकांत उलट क्रमानें लीन होतात. हा त्यांचा खेळ इंद्र व फणी यांच्यासारखा नित्य चालला आहे. 'मूल बापास मारी वोजा' म्ह. आपल्या तेजानें, पराक्रमानें. शुद्ध सत्वापासून सत्वगुण, सत्वापासून रजोगुण, रजापासून तमोगुण झाले व उलट क्रमानें पाहतां मूल बापाला खाऊन टाकतें. तमोगुण रजोगुणाला मारतो, खातो म्ह० निर्बळ करितो, रजोगुण सत्वगुणाला व शबलसत्व शुद्ध सत्वाला खातो, निस्तेज करितो. तीन गुण अनुक्रमानें एकेकाला प्रसवतात व तेच उलट क्रमानें एकेकाला खातात ; पुन्हां उत्पन्न करितात, पुन्हां लीन होतात. असा हा खेळ नित्य चालला आहे. *याप्रमाणें पणतोंडाला (पृथ्वीला) पणजा (वायु) खातो* यांत चार भूतांचा खेळ व मूल बापाला मारतें यांत त्रिगुणांचा खेळ उलट सुलट क्रमानें कसा चालला आहे हें सांगितलें आहे. हा खेळ मांजर व सर्प यांच्या खेळासारखा सूक्ष्म प्रकृतींत नित्य चालला आहे. आतां वाय्वादि चार भूतें हा आपसांत खेळ खेळत आहेत खरा पण या धांगडधिंग्यांत चौघां (वायु, अग्नि, आप, पृथ्वी) जणांचा राजा (अधिष्ठान, मूळ आधार) जो अंतरात्मा (आकाश) तो कांहीं आढळत नाहीं. अंतरात्म्याच्या अधिष्ठानावर चार भूतें व त्रिगुण यांचा

मूल बापास मारी वोजा। चुकान्या गेला राजा। चौघां जणांचा ॥ २ ॥ देव देवालयामध्यें लपाला। देऊळ पूजितां पावे त्याला। सृष्टीमध्यें ज्याला त्याला। ऐसेंचि आहे ॥ ३ ॥ दोनी नामें येकास पडिलीं। लोकीं नेमस्त कल्पिलीं। विवेकें प्रत्ययें पाहिलीं। तों येकचि नाळ ॥ ४ ॥ नाहीं पुरुष ना वनिता। लोकीं कल्पिलें तत्वता। त्याचा बरा शोध घेतां। कांहींच नाहीं ॥ ५ ॥ स्त्री नदी पुरुष खळाळ। ऐसें बोलती सकळ। विचार पाहातां निवळ। देह नाहीं ॥ ६ ॥ आपण आपणासी कळेना। पाहों जातां आकळेना। कशास कांहींच मिळेना। उदंडपणें ॥ ७ ॥ येकलाचि उदंड जाला। उदंडचि येकला पडिला। आपणासि आपला गल्बला। सोसवेना ॥ ८ ॥ येक असोन फुटी जाली। फुटी असोन स्थिति येकली। विचित्र कळा पैसावली। प्राणिमात्रीं ॥ ९ ॥ वल्लीमध्यें जळ संचरे। कोरडेपणें हें वावरे। वोलेवांचून न थिरे। कांहीं केल्या ॥ १० ॥ झाडांमध्यें केलीं आळीं। झाडें धांवती निराळीं। कित्येक झाडें अंतराळीं। उडोन जाती ॥ ११ ॥ भूमीपासून वेगळीं जालीं। परी तीं नाहींत वाळलीं। निराळींच बळावलीं। जेथतेथें ॥ १२ ॥ देवाकरितां चालती झाडें। देव नस्तां होती लांकडें। नीटचि आहे कुवाडें। सर्वथा नव्हे ॥ १३ ॥ झाडापासून झाडें होती। तींही अंतरिक्षीं जाती। मुळानें भेदिली जगती। कदापि नाहीं ॥ १४ ॥ झाडासी झाडें

खेळ चालला असून तोच तेवढा गुप्त झाल्यासारखा दिसत आहे (१–२). देव (अंतरात्मा) देवालयामध्यें अष्टधाप्रकृतिरूप सृष्टीमध्यें (ब्रह्मांडदृष्टीनें) किंवा देहामध्यें (पिंडदृष्टीनें) लपला आहे, गुप्त झाला आहे. उघड दिसत नाहीं (म्हणून याला पूर्वीं 'आकाशमार्गी गुप्त पंथ' असें म्हटलें आहे). देवालयाची पूजा केली म्हणजे त्याला ती पावते, प्राण्यांच्या शरीरांला इष्ट पदार्थ देऊन त्याचा संतोष केला म्हणजे देव प्रसन्न होतो, हा नियम प्राण्यांना लागू आहे. भूतांची पूजा हीच देवपूजा (३). प्रकृतिपुरुष, शिवशक्ति, गणेशशारदा–दोन्हीं नांवें एका मूळमायेची किंवा मूळपुरुषाचीं आहेत. पुरुष म्ह० पुल्लिंगी देह व प्रकृति म्ह० स्त्रीलिंगी देह असा तेथें लिंग भेद नाहीं. उदकाला 'नदी' हें स्त्रीलिंगी नांव दिलें म्हणजे तें स्त्री होत नाहीं किंवा 'खळाळ' म्हटलें कीं कांहीं पुरुष होत नाहीं. अंतरात्मा (आपण) कोण कसा आहे हें न पाहिल्यामुळे नांवावरून अज्ञान्याला भेद वाटतो. अंतरात्मा एक नसून अनेक देहांना धारण करितो, किंवा देह अनेक झाले तरी त्यांचें एकपण मोडत नाहीं. सर्व देहांत आपणच एकलें एक असून एकपणाची ओळख न पटल्यामुळें बहुत्वाची उपाधि (गलबला) सोसत नाहीं. तो एक असून देहोपाधी भेदामुळें अनेक व भिन्न वाटतो व तो अनेक दिसला तरी सर्वांतर्यामीं एकच आहे. प्राणिमात्रांत तो एकच विविधरूपांनीं नटला आहे (४–९). वल्लीमध्यें जळ असतें पण तें कोरडेपणानें असतें म्हणून दिसत नाहीं, तथापि तें असतें यांत संशय नाहीं. कांकीं वल्लींत जळाचें ओलेंपण नसतें तर वल्लीं सजीवपणें राहिली नसती (१०) झाडांच्या सभोंवतीं पाणी घालण्यासाठीं मोठालीं आळीं केलेलीं असतात व आंतल्या ओलींमुळें (पुष्ट होऊन) झाडें आकाशांत (अंतराळीं) उंच वाढतात, वृक्ष गगनचुंबित होतात. (मनुष्यपशुपक्ष्यादिही या दृष्टांतानें झाडेंच असून अंतरात्मा हेंच त्यांचें मूळ जीवन होय). या आधारावर तीं वाढतात. कांहीं झाडें (पक्षी) आकाशांत उडून जातात; तीं पृथ्वीपासून वेगळीं झालीं तरी अंतरीं (अंतरात्मारूप) जीवन असल्यामुळें तीं वाळत नाहींत, ठिकठिकाणीं प्रबळ होऊन वाढतात (११–१२). देवाकरितां म्ह० अंतरात्म्यामुळें झाडें चालतात, तो नसला तर वाळलेलीं लांकडेंच होतात. यांत समजण्यास कठीण (कुवाडें, कूट) असें कांहींच नाहीं. झाडापासून झाडें होतात व तींही अंतराळीं जातात पण त्यांचें मूळ कांहीं

खातपाणी । घालून पाळिती प्रतिदिनीं । बोलकीं झाडें शब्दमथनीं । विचार घेती ॥ १५ ॥ होणार तितुकें आधींच जालें । मग कल्पकल्पून बोलिलें । जाणतयासी समजलें । सकळ कांहीं ॥ १६ ॥ समजलें तरी उमजेना । उमजलें तरी समजेना । प्रत्ययेंविण अनुमानेना । सकळ कांहीं ॥ १७ ॥ सर्वत्रांचा वडिल कोण । हेचि पहावी वोळखण । भेटे आपणासी आपण । जगदंतरें ॥ १८ ॥ अंतरनिष्ठांची उंच कोटी । बाहेरमुद्यांची संगती खोटी । मूर्ख काय समजेल गोष्टी । शाहाणे जाणती ॥ १९ ॥ अंतरें राखतां राजी । भलत्यास भलताच नवाजी । अंतरें न राखतां भाजी । मिळणार नाहीं ॥ २० ॥ ऐसें वर्ततें प्रत्यक्ष । अलक्षीं लावावें लक्ष । दक्षास भेटतां दक्ष । समाधान होतें ॥ २१ ॥ मनास मिळतां मन । पाहोन येती निरंजन । चंचळचक्र उलंघून । पैलाड जाती ॥ २२ ॥ येकदां जाऊन पाहोन आले । मग तें सन्निध देखिलें । चर्मचक्षीं लक्षिलें । न वचे कदा ॥ २३ ॥ नाना शरीरीं चंचळ । अखंड करी चळवळ । परब्रह्म तें निश्चळ । सर्वां ठाईं ॥ २४ ॥ चंचळ धांवे येकीकडे । वोस पडे दुसरेकडे । चंचळ पुरे सर्वांकडे । हें तों घडेना ॥ २५ ॥ चंचळ चंचळास पुरेना । अवघें चंचळ विवरेना । निश्चळ अपार अनुमाना । कैसें येतें ॥ २६ ॥ गगनीं चालिली हवावी । कैसी पावेल पार पदवी । जातां मध्येंचि विझावी । हा स्वभावचि तिचा ॥ २७ ॥

जमीन भेदून जातें असें नाहीं. झाडाच्याच खतपाण्यानें झाडें वाढतात. बोलकीं झाडें (माणसें) परस्परांस आपलें मनोगत कळवितात (१३–१५). सृष्टिस्वभावधर्मानें व्हायचें तें आधींच होऊन गेलें आहे, आतां मागून अनेक शास्त्रकारांनीं आपापल्या कल्पना लढवून परोपरीनें त्यावर ग्रंथ लिहिले आहेत, पण जाणते त्या सगळ्यांचें वर्म समजून असतात. सामान्य लोकांना वाच्यार्थ कळला तर वर्म कळत नाहीं, व वर्म कळल्यासारखें झालें तरी नीट उकल होत नाहीं, मुख्य अनुभव पाहिजे. त्यावांचून तत्वबोध होत नाहीं (१६–१७). सर्वांचा वडील अंतरात्मा (मागें द० १५, स० ३ पहा) त्याची ओळख करून घ्यावी म्हणजे जगदंतरीं आपणच भरले आहोंत हें कळून येतें. हें अंतर्मुख (आंत आपल्याआपण शोध घेणारे) किंवा अंतर्निष्ठ पुरुष जाणतात. त्यांची कोटि उंच (श्रेष्ठ) आहे. बहिर्मुखांना हें काय कळायचें आहे ? अंतरात्म्याची गोष्ट मूढांना कळायची नाहीं, सुज्ञच जाणतात. अंतरात्मा कळला, सर्वांभूतीं आपणच आहोंत हें समजलें, कीं दुसऱ्यांचीं अंतरें राखतां येतात. अंतर संभाळतां आलें कीं परका मनुष्यही (परकेपण मग उरतच नाहीं) प्रसन्न होऊन स्तुति करूं लागतो अंतर राखतां न आलें तर भाजीचें पानही मिळत नाहीं. ही अनुभवाची गोष्ट आहे. अलक्ष्य अंतरात्मा तेथें लक्ष लावावें. दक्षास दक्ष (अंतर्निष्ठा अंतर्निष्ठ) भेटला कीं समाधान होतें. मनास मन मिळालें, मीतूंपण उडालें, एका अंतरात्म्याची व्यापकता कळली कीं निरंजनाची भेट होते – चंचळचक्र ओलांडून पलीकडे केवळ परब्रह्म त्याची प्राप्ति होते. तें चर्मचक्षूनें पाहतां येत नाहीं. त्याची एकवार प्राप्ति झाली कीं तें अखंड आपल्याजवळच आहे. अंतरात्मा नाना देहांत चळवळ करितो, निश्चळ परब्रह्म सदोदित सर्वत्र आहे – चंचळाची व्यापकता कमी आहे – तें एकीकडे असलें कीं दुसरीकडे ओस पडतें, चंचळ सर्वांठायीं पुरत नाहीं. चंचळ (जीव) चंचळाचाही (अंतरात्मा) पुरता शोध घेऊं शकत नाहीं मग निश्चळ परब्रह्मास तो कसा आकळील ? चंद्रज्योत किंवा बाण आकाशांत पेटला तर त्याला आकाशाचा अंत लागणें कठिण, मध्येंच विझणें हा तिचा

मनोधर्म येकदेसी । कैसा आकळील वस्तुसी । निर्गुण सांडून अपेसी । सर्व ब्रह्म म्हणे ॥ २८ ॥ नाहीं सारासारविचार । तेथें अवघा अंधकार । खरें सांडून खोटें पोर । नेणतें घेतें ॥ २९ ॥ ब्रह्मांडाचें महाकारण । तेथून हें पंचीकरण । महावाक्याचें विवरण । वेगळें असे ॥ ३० ॥ महत्तत्व महद्भूत । तोचि जाणावा भगवंत । उपासना हे समाप्त । येथून जाली ॥ ३१ ॥ कर्म उपासना आणि ज्ञान । त्रिकांड वेद हें प्रमाण । ज्ञानाचें होतें विज्ञान । परब्रह्मीं ॥ ३२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चंचळलक्षणनिरूपणनाम समास पंचम ॥

॥ श्रीराम ॥ पीतापासून कृष्ण जालें । भूमंडळीं विस्तारलें । तेणेंविण उमजलें । हें तों घडेना ॥ १ ॥ आहे तरी स्वल्पलक्षण । सर्वत्रांची सांठवण । अधम आणी उत्तम गुण । तेथेंचि असती ॥ २ ॥ महीसुत सरसाविला । सरसाऊन द्विधा केला । उभयतां मिळोन चालिला । कार्यभाग ॥ ३ ॥ श्वेताश्वेतास गांठी पडतां । मध्यें कृष्ण मिश्रित होतां । इहलोकसार्थकता । होत आहे ॥ ४ ॥ विवरतां याचा विचार । मूर्ख तोचि होय चतुर । सद्यःप्रचित साक्षात्कार । परलोकींचा ॥ ५ ॥ सकळांसी जें मान्य । तेंचि होतसे सामान्य । सामान्यास अनन्य । होइजेत नाहीं ॥ ६ ॥ उत्तम

स्वभाव आहे. वृत्ति एकदेशी आहे ती ब्रह्माला आकळूं शकत नाहीं. वृत्त्यतीत ब्रह्म सोडून वृत्तिगत ब्रह्मालाच करंटा ब्रह्म म्हणतो. असार टाकून विवेकानें सारभूत निर्गुण ब्रह्म न घेतलें तर सारा अंधारच आहे. खरें सोडून खोटें घेणें हें सूज्ञाचें काम नाहीं. ब्रह्मांडाचा महाकारण देह म्हणजे मूळमाया – तेथून सारें पंचीकरण झालें आहे. महावाक्याचें विवरण तें वेगळेंच आहे, तें पंचीकरणांत येत नाहीं. महत्तत्व म्हणजे महद्भूत – त्याला भगवंत म्हणतात. उपासनेची समाप्ति तेथेंच होते (महत्तत्व हें महाद्वार – उपासनेची ही परमसीमा – याच्या पलीकडे निश्चळ परब्रह्म आहे). कर्म, उपासना व ज्ञान असे त्रिकांडात्मक वेद आहेत. वेदाची मर्यादाही तेथेंच खुंटते. ज्ञानाचें विज्ञान होणें, परब्रह्मस्वरूप होणें हें पलीकडचें आहे (१८–३२). [द० १५, स० ५]

पीतापासून म्ह० पिंवळ्या रंगाच्या हिरड्यांपासून काळी शाई तयार झाली (तिच्या साह्यानें वेदशास्त्रपुराणादि ग्रंथ लिहिले गेले). ह्या थोर ग्रंथांच्या आधारावांचून मनुष्यमात्रांस ज्ञान झालें नसतें (१). शाई ही एक साधी वस्तु, पण तिनें ब्रह्मांडांतील सर्व ज्ञान एकत्रित केलें आहे. ग्रंथांतून (रामकृष्णादिकांच्या अंगचे) उत्तम गुण व (रावणकंसादिकांच्या अंगचे) अधम गुण या दोहोंचेंही यथास्थित वर्णन केलें आहे (२). महीसुत म्ह० पृथ्वीच्या पोटांतून सहज वर येणारा बोरु हा पुढें आला, तो मध्यें छेद पावून त्याची लेखणी झाली व त्यामुळें स्वरव्यंजनयुक्त असे शब्दांचे संघ एकापुढें एक येऊन लेखनक्रिया चालू झाली (३). श्वेत म्ह० पांढरा कागद, अश्वेत म्ह० बोरु आणि तिसरा कृष्ण म्ह० शाई या तिघांच्या संयोगानें इहलोकींचे मनुष्यांचे सारे व्यवहार म्ह० लेखन, वाचन, अर्थबोध वगैरे सुरू झाले (४). ग्रंथांचा जो विचार करील तो मूर्ख असला तर चतुर होईल, लेखनार्थ मनांत आणील तर त्याला परलोकचा मार्ग सांपडून तो कृतार्थ होईल (५). सर्वांना जी गोष्ट पसंत असते तीच लोकांत प्रचलित होते पण चतुर पुरुषाच्यानें तशा सार्वत्रिक झालेल्या गोष्टीला अनन्यता देववत नाहीं म्ह० तो तिच्याशीं अनन्य होत नाहीं अर्थात् त्याला ती संमत नसते (उदाहरणार्थ – विषयसुख सर्वसंमत आहे पण हा तें मान्य करीत नाहीं, किंवा जगत् सत्य आहे असें सर्व समजतात पण तसें मानीत नाहीं) कोणाचे

मध्यम कनिष्ठ रेखा । अदृष्टीची गुप्त रेखा । चत्वार अनुभव सारिखा । होत नाहीं ॥ ७ ॥ चौदा पिळ्यांचे पवाडे । सांगती ते शाहाणे कीं वेडे । ऐकत्यानें घडे कीं न घडे । ऐसें पहावें ॥ ८ ॥ रेखा तितुकी पुसोन जाते । प्रत्यक्ष प्रत्यया येतें । डोळेझांकणी करावी ते । कायनिमित्य ॥ ९ ॥ बहुतांचे बोलीं लागले । ते प्राणी अनुमानीं बुडाले । मुख्य निश्चय चुकले । प्रत्ययाचा ॥ १० ॥ उदंडाचें उदंड ऐकावें । परी ते प्रत्ययें पाहावें । खरेंखोटें निवडावें । अंतर्यामीं ॥ ११ ॥ कोणासी नव्हे म्हणों नये । समजावे अपाय उपाय । प्रत्यय घ्यावा बहुत काय । बोलोनियां ॥ १२ ॥ माणुस हेंकाड आणी कच्चें । मान्य करावें तयाचें । येणें प्रकारें बहुतांचें । अंतर राखावें ॥ १३ ॥ अंतरीं पीळ पेंच वळसा । तोचि वाढवी बहुवसा । तरी मग शाहाणा कैसा । निववूं नेणे ॥ १४ ॥ वेडें करावें शाहाणें । तरीच जिणें श्लाघ्यवाणें । उगेंच वादांग वाढवणें । हें मूर्खपण ॥ १५ ॥ मिळोन जाऊन मेळवावें । पडी घेऊन उलथावें । कांहींच कळों नेदावें । विवेकबळें ॥ १६ ॥ दुसऱ्याचे चालणीं चालावें । दुसऱ्याचे बोलणीं बोलावें । दुसऱ्याचे मनोगतें जावें । मिळोनियां ॥ १७ ॥ जो दुसऱ्याच्या हितावरी । तो विपट कांहींच न करी । मानत मानत विवरी । अंतर तयाचें ॥ १८ ॥ आधीं अंतर हातीं घ्यावें । मग हळुहळु उकलावें । नाना उपायें न्यावें । परलोकासी ॥ १९ ॥ हेंकाडास हेंकाड मिळाला । तेथें गल्बलाचि जाला । कळहो उठतां

ललाटरेखा उत्तम असते, कोणाची मध्यम व कोणाची कनिष्ट असते, कोणाची रेखा अदृष्ट म्ह० गुप्त असते, चौघांचा अनुभव सारखा असत नाहीं, वेगवेगळा असतो. चौदा पिढ्यांचे (पूर्वजांचे) पवाडे (पराक्रम) गाणारे शहाणे असोत कीं वेडे असोत, ते ऐकणारानें मात्र त्यांपकीं आपल्या हातून कांहीं होण्यासारखें आहे कीं नाहीं याचा विचार करावा. कागदावरच्या, पाटीवरच्या किंवा भिंतीवरच्या रेषा पुसून टाकतां यतात हा जर अनुभव आहे तर कपाळावरची रेषाही पुसतां येणार नाहीं असें निमुटपणें कां मानावें ? बहुतांच्या नादीं लागणारे प्राणी संशयांत गिरक्या खात राहतात, ते प्रत्ययाचा मुख्य निश्चय करीत नाहींत व म्हणून फसतात (६-१०). पुष्कळांचें पुष्कळ ऐकावें, पण आपल्या मनांत खऱ्याखोट्याचा विचार करून अनुभवाला येईल तें घ्यावें. नाहीं कोणालाच म्हणूं नये (कोणाचें मन दुखवूं नये), पण आपलें हिताहित आपण पहावें, अनुभवानें खरें ठरेल तें घ्यावें. चातुर्याचें लक्षण आणखी काय सांगायचें आहे ? एखादा मनुष्य हट्टी व कच्चा असतो त्याचेंही ऐकून घ्यावें, तात्पर्य, सर्वांचें ऐकावें (व मनाचें करावें). आपल्या मनांतला पीळ, पेंच, वळसा (वांकडेपणा) हा वाढवूं लागला तर मग त्याला शाहणा कोण म्हणेल ? त्याला दुसऱ्याला समाधान देतां येणार नाहीं. वेड्याला शाहणें करावें तरच जन्मास आल्याची बहादरी. वादाच्या बाजू वाढविणें मूर्खत्व होय (११-१५). आपण प्रतिपक्ष्याशीं मिळून जाऊन त्याला आपल्यांत मिळून घ्यावें, पड घेऊन योग्य समयीं त्याला उलथावें, विवेकबळानें आपल्या विचारांचा त्याला थांग लागूं देऊं नये. दुसऱ्याच्या चालीनें चालावें, त्याच्यासारखेंच बोलावें, त्याच्या मनोगताशीं मिळून जावें. भला मनुष्य दुसऱ्याच्या हिताशीं विरोध येईल असें कांहींच करीत नाहीं, तो त्याशीं मिळून जातां जातां त्यालाच आपल्याशीं मिळवून घेतो. आधीं त्याचें मन वश करून घ्यावें, मग हळूहळू आपले विचार त्याच्या मनांत भरवावे, अनेक उपाय करून त्याला परलोकाचा मार्ग दाखवावा. हेकाडाला हेकाड मिळाला म्ह० दोघेही हमरीतुमरीवर येऊन कलह माजवितात — यांत चातुर्य कोणाचें ? पुष्कळ-

चातुर्याला । ठाव कैंचा ॥ २० ॥ उगीच करिती बडबड । परी करून दाखवणें औघड । परस्थळ साधणें जड । कठिण आहे ॥ २१ ॥ धके चपेटे सोसावे । नीच शब्द साहात जावे । परस्तावोन परावे । आपले होती ॥२२॥ प्रसंग जाणोनि बोलावें । जाणपण कांहींच न घ्यावें । लीनता धरून जावें । जेथें तेथें ॥ २३ ॥ कुग्रामें अथवा नगरें । पाहावीं घरांचीं घरें । भिक्षामिसें लहानथोरें । परीक्षून सोडावीं ॥ २४ ॥ बहुतीं कांहींतरी सांपडे । विचक्षण लोकीं मित्री घडे । उगेंच बैसतां कांहींच न घडे । फिरणें क्विरणें ॥ २५ ॥ सावधपणें सर्व जाणावें । वर्तमान आधींच घ्यावें । जाऊं ये तिकडे जावें । विवेकेंसहित ॥ २६ ॥ नाना जिनसपाठांतरें । निवती सकळांचीं अंतरें । लिहोन देतां परोपकारें । सीमा सांडावी ॥ २७ ॥ जैसें जयास पाहिजे । तें तें तत्काळचि दीजे । तरी मग श्रेष्ठचि होइजे । सकळां मान्य ॥ २८ ॥ भूमंडळीं सकळांसी मान्य । तो म्हणों नये सामान्य । कित्येक लोक अनन्य । तया पुरुषासी ॥ २९ ॥ ऐसीं चातुर्याचीं लक्षणें । चातुर्यें दिग्विजय करणें । मग तयास काय उणें । जेथें तेथें ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चातुर्यविवरणनाम समास षष्ठ ॥ ६ ॥

॥ श्रीराम ॥ नाना विकारांचें मूळ । ते हे मूळमायाच केवळ । अचंचळीं जे चंचळ । सूक्ष्मरूपें ॥ १ ॥ मूळमाया जाणीवेची । मुळींच्या मूळ संकल्पाची । वोळखी षड्गुणैश्वराची । येणोंचि न्यायें ॥ २ ॥ प्रकृतिपुरुष शिवशक्ती ।

जण उगाच बडबडतात, पण असें वागून दाखविणें कठिण आहे. परस्थळ म्ह० दुसऱ्याचें मन स्वाधीन करणें बहुत कठिण आहे (१६–२१). धक्के चपेटे सोसावे, नीच शब्दही सोशीत जावे म्हणजे अखेर पश्चात्ताप होऊन प्रतिपक्षी आपणांस येऊन मिळतात. प्रसंग जाणून बोलावें पण जाणपण (ज्ञातेपणाचा अभिमान) घेऊं नये, सर्व ठिकाणीं नम्रपणें वागावें. खेडींपाडीं व नगरें फिरावीं, घराचीं घरें पाहावीं, भिक्षामिषें लहानथोर (भलेबुरे) पाहून ठेवावे, बहुतांच्या ठिकाणीं कांहींना कांहीं गुण असतो तो लक्ष्यांत ध्यावा, चतुरांशीं स्नेह जोडावा, घरींच आळसानें बसल्यास फिरणें व मनुष्यशोध कांहींच होत नाहीं. सावधपणानें सर्व जाणावें, आधीं परस्पर शोध काढून मग कोणत्याही गांवांत किंवा घरांत विवेक हा सोबती संगें घेऊन जावें, अनेक कवितांचें पाठपाठांतर ठेवावें, नेणेंकरून जनांच्या चित्तांस समाधान होतें व (आस्थेवाईक भेटल्यास) स्वतः लिहून द्यावें, आळस करूं नये. यांत अतिशय मोठा परोपकार आहे. ज्याला जें पाहिजे तें त्याला तत्काळ द्यावें, म्हणजे लोक वंद्य मानतात व सर्वमान्यता प्राप्त होते. भूमंडळावर जो सर्वांस मान्य म्ह० लोकमान्य झाला तो पुरुष सामान्य म्हणूं नये, अनेक लोक त्या पुरुषाशीं अनन्य म्ह० एकनिष्ठ राहतात. चातुर्याचीं लक्षणें अशा प्रकारचीं आहेत. चातुर्यानें दिग्विजय करावा मग जेथें जावें तेथें सर्व अनुकूळच – उणें कांहींच नाहीं (२२–३०). [द० १५, स० ६]

नाना विकारांचें मूळ, आद्य विकार, म्हणजे मूळमाया होय. ती निश्चळ परब्रह्माचे ठिकाणीं अतिसूक्ष्मरूपानें झाली. तिला चंचळ म्हणतात. ती जाणीवरूप असून मूळ ब्रह्माचा मूळ संकल्प (अर्थात् वायुरूप) होय. (जाणीव व वायु उभयरूप) मूळमायेलाच षड्गुणेश्वर, प्रकृतिपुरुष, शिवशक्ति, अर्धनारीनटेश्वर, जगज्योति म्हणतात. संकल्पाचें चळण ती

आर्धनारीनटेश्वर म्हणती । परी ते आवघी जगज्जोती । मूळ त्यासी ॥ ३ ॥ संकल्पाचें जें चळण । तेंचि वायोचें लक्षण । वायो आणी त्रिगुण । आणी पंचभूतें ॥ ४ ॥ पाहातां कोणीयेक वेल । त्याच्या मुळ्या असती खोल । पत्रें पुष्पें फळें केवळ । मूळाचपासीं ॥ ५ ॥ याहीवेगळे नाना रंग । आकार विकार तरंग । नाना स्वाद अंतरंग । मूळामध्यें ॥ ६ ॥ तेंचि मूळ फोडून पाहातां । कांहींच नाहीं वाटे आतां । पुढें वाढतां वाढतां । दिसों लागे ॥ ७ ॥ कळ्यावरी वेल निघाला । अधोमुखेंबळें चालिला । फांपावोन पुढें आला । भूमंडळीं ॥ ८ ॥ तैसी मूळमाया जाण । पंचभूतें आणी त्रिगुण । मूळीं आहेत हें प्रमाण । प्रत्ययें जाणावें ॥ ९ ॥ अखंड वेल पुढें वाढला । नाना विकारीं शोभला । विकारांचा विकार जाला । असंभाव्य ॥ १० ॥ नाना फडगरें फुटलीं । नाना जुंबाडें वाढलीं । अनंत अग्रें चालिलीं । सृष्टीमध्यें ॥ ११ ॥ कित्येक फळें तीं पडती । सवेंचि आणीक निघती । ऐसीं होती आणी जाती । सर्वकाळ ॥ १२ ॥ येक वेलचि वाळले । पुन्हां तेथेंचि फुटले । ऐसे आले आणी गेले । कितीयेक ॥ १३ ॥ पानें झडती आणी फुटती । पुष्पें फळें तेणेंचि रीतीं । मध्यें जीव हे जगती । असंख्यात ॥ १४ ॥ अवघा वेलचि कर्पतो । मूळापासून पुन्हां होतो । ऐसा अवघा विचार जो तो । प्रत्यक्ष जाणावा ॥ १५ ॥ मूळ खाणोन काढिलें । प्रत्ययज्ञानें निर्मूळ केलें । तरी मग वाढणेंचि राहिलें । सकळ कांहीं ॥ १६ ॥ मुळीं बीज सेवटीं बीज । मध्यें जळरूप बीज । ऐसा हा स्वभाव सहज । विस्तारला ॥ १७ ॥ मूळामधील ज्या गोष्टी । सांगताहे बीजसृष्टी । जेथील अंश तेथें कष्टी । न होतां जातो ॥ १८ ॥

मूळमाया. ती वायुरूप असून त्रिगुणपंचभूतात्मक अष्टधा प्रकृति अतिसूक्ष्मरूपानें तिच्यांत आहे (१–४). एखादा वेल पाहिला तर त्याच्या मुळ्या फार खोल गेलेल्या असतात, पत्रपुष्पफलरूप विस्तार जो पुढें होत जातो तो सूक्ष्मरूपानें पहिल्या मूळांतच असतो. याशिवाय अनेक रंग, आकार, विकार, स्वाद, आंतील रचना इ० सर्व मूळांत बीजरूप असतें. तें मूळ फोडून पाहिलें तर तेथें हें कांहीं दिसायचे नाहीं, पण पुढें हळुहळू दिसूं लागतें. कळ्यावरून निघालेला हा वेल अधोमुख वाढत जाऊन फोंफावून विस्तार पावतो. हाच प्रकार मूळमायेचा आहे. त्रिगुणपंच-भूतें तिच्यांत सूक्ष्मरूपानें आहेत पण हें विवेकानें पाहिलें पाहिजे. वेल सतत पुढें वाढत जातो, अनेक विकारांनीं त्याला शोभा येते व विकारांचे पुन्हां अनेक विकार वाढत जातात. अनेक फांद्या (फडगरें), जुंबाडें, अग्रें वाढतात. कांहीं फळें पडतात, पुन्हां नवीं येतात, अशीं अनेक फळें येतात, पडतात, पुन्हां येत असतात. कालांतरानें सारा वेल करपतो, व मूळापासून पुन्हां दुसरा येतो (लक्षावधि प्राणी याच न्यायें येतात जातात). मूळच खणून काढलें व अनुभवज्ञानानें निर्मूळ केलें (मूळमायेचा निरास केला) म्हणजे मात्र पुन्हां वाढणें नाहीं (जन्ममरणाची यातायात खुंटते). असो (५–१६). मुळीं बीज, व अग्राला बीज, मध्यें जळरूप बीज, असा हा सहज विस्तार होत जातो. बीजापासून झालेली सृष्टि म्ह० पत्रपुष्पफळादिरूप विस्तार हा मुळांत काय आहे हें सांगत असतो. जें जें जेथून आलें तें तें तेथें सहज लीन होतें (मूळमायेंतून आलेला

जातो येतो पुन्हां जातो । ऐशा प्रत्यावृत्ति करितो । परंतु आत्मज्ञानी जो तो । अन्यथा न घडे ॥ १९ ॥ न घडे ऐसें जरी म्हणावें । तरी कांहींतरी लागे जाणावें । अंतरींच परी ठावें । सकळांसी कैचें ॥ २० ॥ तेणेंसींच कार्य करिती । परंतु तयास नेणती । दिसेना ते काय करिती । बापुडे लोक ॥ २१ ॥ विषयभोग तेणेंचि घडे । तेणेंविण कांहींच न घडे । स्थूळ सांडून सूक्ष्मीं पवाडे । ऐसा पाहिजे ॥ २२ ॥ जें आपलेंचि अंतर । तद्रूपचि जगदंतर । शरीरभेदाचे विकार । वेगळाले ॥ २३ ॥ आंगोळीची आंगोळीस वेदना । येकीची येकीस कळेना । हात पाय अवेव नाना । येणेंचि न्यायें ॥ २४ ॥ अवेवाचें अवेव नेणे । मां तों पराचें काय जाणे । परांतर याकारण । जाणवेना ॥ २५ ॥ येकाचि उदकें सकळ वनस्पती । नाना अग्रभेद दिसती । खुडिलीं तितुकींच सुकती । येर ते टवटवित ॥ २६ ॥ येणेंचि न्यायें भेद जाला । कळेना येकाचें येकाला । जाणपणें आत्मयाला । भेद नाहीं ॥ २७ ॥ आत्मत्वीं भेद दिसे । देहप्रकृतीकरितां भासे । तरी जाणतचि असे । बहुतेक ॥ २८ ॥ देखोन ऐकोन जाणती । शाहाणे अंतर परीक्षिती । धूर्त ते अवघेंच समजती । गुप्तरूपें ॥ २९ ॥ जो बहुतांचें पाळण करी । तो बहुतांचें अंतर विवरी । धूर्तपणें ठाउकें करी । सकळ कांहीं ॥ ३० ॥ आधीं मनोगत पाहाती । मग विश्वास धरिती । प्राणिमात्र येणें रितीं । वर्तताहे ॥ ३१ ॥ स्मरणामागें विस्मरण । रोकडी प्रचीत प्रमाण । आपलें ठेवणें आपण । चुकताहे ॥ ३२ ॥

पिंडब्रह्मांडात्मक नानाजीवरूपसृष्टि तिच्यांतच लय पावते). जातो, येतो, पुन्हां जातो अशा अनेक पुनरावृत्ति होतात, आत्मज्ञानी जो झाला त्याला मात्र हे जन्ममरणांचे सायास पडत नाहींत. त्यालाही आत्मरूप जाणावें लागतेंच, आत्मा अंतरींच आहे पण सर्वांस सुलभ नाहीं (१७–२०). अंतरात्म्याच्याच आधारावर कार्यें करितात, विषयभोग भोगतात, त्याच्यावांचून कांहींच होत नाहीं; पण स्थूळावरील दृष्टि मावळून त्या सूक्ष्माकडे विवेकानें वळलें पाहिजे. तो उघड दिसत नाहीं, याला बापडे जीव काय करितील? आत्मा आपला व जगाचा एकच आहे, शरीरभेद वेगळे आहेत. एक बोट कापलें तर त्याच्या वेदना दुसऱ्या बोटास होत नाहींत, हस्तपादादि अवयवांची हीच स्थिति; एका अवयवाचें दुसऱ्या अवयवास कळत नाहीं, मग आपल्यावरून दुसऱ्याचें अंतर जाणणें, कठिण जावें हें सहज आहे. एकाच उदकानें सर्व वनस्पति पोसतात व वाढतात, त्यांचीं अग्रें वेगळालीं दिसतात, पण खुडावीं तेवढींच सुकतात – बाकीचीं प्रफुल्ल असतात. हाच न्याय माणसांना. एकाचें एकाला कळत नाहीं, फक्त आत्मज्ञान झालें म्हणजे सर्वांचीं अंतरें एकच हें कळतें. आत्मत्वीं भेद दिसतो पण देह वेगळाले म्हणून तो दिसतो, तरी बहुतेकांना एकपण थोडें फार जाणवतें. कांहीं देखोन ऐकोन जाणतात, शहाणे अंतःपरीक्षेनें जाणतात व चतुर विवेकानें सारेंच समजतात. बहुतांचा पाळणकर्ता बहुतांचें अंतर जाणतो चातुर्यबळानें तो सर्व कांहीं समजतो. दुसऱ्याचें मनोगत पाहून मग विश्वास ठेवावा ही प्राणिमात्रांची रीत आहे (२१–३१). स्मरणापाठीमागें विस्मरण होतें. आपलीच ठेवलेली वस्तु आपण विसरतों हा सर्वांचा अनुभव आहेच,

आपलेंच आपणा स्मरेना । बोलिलें तें आठवेना । उठती अनंत कल्पना । ठाउक्या कैंच्या ॥ ३३ ॥ ऐसें हें चंचळ चक्र । कांहीं नीट कांहीं वक्र । जाला रंक अथवा शक्र । तरी स्मरणास्मरणें ॥ ३४ ॥ स्मरण म्हणिजे देव । विस्मरण म्हणिजे दानव । स्मरणविस्मरणें मानव । वर्तती आतां ॥ ३५ ॥ म्हणोनि देवी आणि दानवी । संपत्ति द्विधा जाणावी । प्रचीत मानसीं आणावी । विवेकेंसहित ॥ ३६ ॥ विवेकें विवेक जाणावा । आत्म्यानें आत्मा वोळखावा । नेत्रें नेत्रचि पहावा । दर्पणींचा ॥ ३७ ॥ स्थूळें स्थूळ खाजवावें । सूक्ष्में सूक्ष्म समजावें । खुणेनें खुणेसी बाणावें । अंतर्यामीं ॥ ३८ ॥ विचारें जाणावा विचार । अंतरें जाणावें अंतर । अंतरें जाणावें परांतर । होउनिया ॥ ३९ ॥ स्मरणामाजी विस्मरण । हेंचि भेदाचें लक्षण । येकदेसी परिपूर्ण । होत नाहीं ॥ ४० ॥ पुढें सिके मागें विसरे । पुढें उजेड मागें अंधारे । पुढें स्मरे मागें विस्मरे । सकळ कांहीं ॥ ४१ ॥ तुर्या जाणावी स्मरण । सुषुप्ति जाणावी विस्मरण । उभयतां शरीरीं जाण । वर्तती आतां ॥ ४२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अधोर्धनिरूपणनाम समास सप्तम ॥ ७ ॥

॥ श्रीराम ॥ रेणूहून सूक्ष्म किडे । त्याचें आयुष्य निपटचि थोडें । युक्ति बुद्धि तेणेंचि पाडें । तयामध्यें ॥ १ ॥ ऐसे नाना जीव असती । पाहों जातां न दिसती । अंतःकरणपंचकाची स्थिती । तेथेंही आहे ॥ २ ॥ त्यांपुरतें त्यांचें ज्ञान । विषय इंद्रियें समान । सूक्ष्म शरीरें विवरोन ।

आपलेंच आपल्याला स्मरत नाहीं, बोलिलेलें आठवत नाहीं, आपल्याच ठिकाणीं अनंत कल्पनातरंग उठतात ते आपले आपल्यालाच ठाऊक होत नाहींत. असें हें चंचळ मायेचें चक्र आहे, कांहीं काळ सरळ व कांहीं काळ वक्र फिरतें, रंक असो नाहीं तर इंद्र असो, कांहीं स्मरण व कांहीं विस्मरण या प्रकारचा जीवस्वभाव आहे. नित्यस्मरण ते देव, नित्यविस्मरण ते दानव व कांहीं स्मरण आणि कांहीं विस्मरण म्हणजे मानव. यामुळें दैवी आणि आसुरी असे संपत्तीचे दोन भेद मानले जातात, विवेकानें याचा प्रत्यय पाहावा. आरशांतील डोळा डोळ्यानेंच पाहावा, तसा विवेकानें विवेक जाणावा व आत्म्यानें आत्मा ओळखावा. जड (हातानेंच) जड देह खाजवावा, तसें सूक्ष्मानें सूक्ष्म समजावें, खुणेनें अंतरींची खूण जाणावी व बाणून घ्यावी. विचारानें विचार जाणावा, अंतरानें अंतर जाणावें, परांतराशीं एकरूप होऊन परांतर जाणावें. (स्वरूपाच्या) स्मरणांत विस्मरण होतें म्हणून सृष्टि भेदमय वाटते, जीव एकदेशीपणामुळें व्यापक होत नाहीं. पुढें पाठ मागें सपाट, पुढें उजेड मागें अंधार, पुढें स्मरण मागें विस्मरण असें सर्वांचें आहे. तुर्या ही स्मरणरूप आहे, सुषुप्ति ही विस्मरणरूप (अज्ञानमय) आहे, व दोन्ही देहांत आहेत (३२–४२). [द० १५, स० ७]

कित्येक किडे रेणूपेक्षांही बारीक असतात व त्याचप्रमाणानें त्यांची युक्तिबुद्धिही (सूक्ष्म) असते. असे अनेक जीव असतात, ते साध्या डोळ्यांला दिसतही नाहींत, पण त्यांच्यांतही अंतःकरण पंचकाची व्यवस्था आहेच (अंतःकरण, मन, बुद्ध, चित्त व अहंकार हें पंचक अनुक्रमें आकाशादि पंचभूतांपासून झालें आहे). त्यांचें ज्ञान, विषय, इंद्रियेंही त्यांच्या मानानेंच असतात. इतक्या सूक्ष्म शरीरांचा विचार करून कोण पाहतो? इतके सूक्ष्म प्राणी, कीं ज्यांच्या मानानें मुंगीही

पाहतो कोण ॥ ३ ॥ त्यास मुंगी महाथोर । नेणों चालिला कुंजर । मुंगीस मुताचा पूर । ऐसें बोलती ॥ ४ ॥ ते मुंगीसमान शरीरें । उदंड असती लहानथोरें । समस्तांमध्यें जीवेश्वरें । वस्ती कीजे ॥ ५ ॥ ऐसिया किड्यांचा संभार । उदंड दाटला विस्तार । अत्यंत साक्षपी जो नर । तो विवेरोन पाहे ॥ ६ ॥ नाना नक्षत्रीं नाना किडे । त्यांस भासती पर्वताएवढे । आयुष्यहि तेणेंचि पाडें । उदंड वाटे ॥ ७ ॥ पक्ष्यायेवढें लाहान नाहीं । पक्ष्यायेवढें थोर नाहीं । सर्प आणि मत्स्य पाहीं । येणेंचि पाडें ॥ ८ ॥ मुंगीपासून थोरथोरें । चढती वाढती शरीरें । त्यांचीं निर्धारितां अंतरें । कळों येती ॥ ९ ॥ नाना वर्ण नाना रंग । नाना जीवनांचे तरंग । येक सुरंग येक विरंग । किती म्हणोनी सांगावे ॥ १० ॥ येकें सुकुमारें येकें कठोरें । निर्माण केलीं जगदेश्वरें । सुवर्णासारिखीं शरीरें । दैदिप्यमानें ॥ ११ ॥ शरीरभेदें आहारभेदें । वाचाभेदें गुणभेदें । अंतरीं वसिजे अभेदें । येकरूपें ॥ १२ ॥ येक त्रासकें येक मारकें । पाहों जातां नाना कौतुकें । कितीयेक अमोलिकें । सृष्टीमध्यें ॥ १३ ॥ ऐसीं अवघीं विवरोन पाहे । ऐसा प्राणी कोण आहे । आपल्यापुरतें जाणोन राहे । किंचितमात्र ॥ १४ ॥ नवखंड हे वसुंधरा । सप्तसागरांचा फेरा । ब्रह्मांडाबाहेरील नीरा । कोण पाहे ॥ १५ ॥ त्या नीरामध्यें जीव असती । पाहों जातां असंख्याती । त्या विशाळ जीवांची स्थिती । कोण जाणे ॥ १६ ॥ जेथें जीवन तेथें जीव । हा उत्पत्तीचा स्वभाव । पाहातां याचा अभिप्राव । उदंड असे ॥ १७ ॥ पृथ्वीगर्भीं नाना नीरें । त्या नीरांमध्यें शरीरें । नाना जिनस लाहानथोरें । कोण जाणे ॥ १८ ॥

हत्तीसारखी मोठीच म्हटली पाहिजे. 'मुंगीला मुताचा पूर' अशी म्हण मुंगीसंबंधानें प्रसिद्धच आहे. मुंगीसारखीं लहान शरीरें लक्षावधि आहेत, पण सर्वांत अंतरात्म्याची वस्ति आहे. असे किड्यामुंग्यांचे असंख्य समुदाय आहेत. अतिसूक्ष्म जीवांना दुसरे कांहीं जीव पर्वतासारखे भासतात व त्यांचें आयुष्यही दीर्घ वाटत असतें. पक्षी, सर्प, मत्स्य हे लहान आहेत व थोरही आहेत. त्यांच्यापेक्षां लहान जीवांच्या दृष्टीनें ते थोर आहेत व त्यांच्यापेक्षां मोठ्या जीवांच्या (हत्ती, वाघ इ०) दृष्टीनें ते लहान आहेत. मुंगीपासून हत्तीपर्यंत चढतीं वाढतीं अनेक शरीरें आहेत, त्यांचें अंतरंग विवरून पाहतां हें कळों येतें. अनेक वर्णांचे, अनेक रंगांचे, अनेक आकृतींचे, कांहीं सुंदर, कांहीं बेढब, कांहीं सुकुमार, कांहीं कठोर, कांहीं सुवर्णासारखे दैदीप्यमान, असे अनंत जीव जगदीश्वरानें निर्माण केले आहेत. शरीर, आहार, वाचा, गुण इत्यादिकांसंबंधानें त्यांच्यांत भेद दिसले तरी सर्वांच्या अंतरीं अभिन्न असा एकच अंतरात्मा नांदत आहे. कांहीं प्राणी भीतिप्रद (त्रासक), कांहीं मारक (हिंस्र) असतात. सर्व पाहिले कीं सृष्टींतले अनेक चमत्कार पाहून परमेश्वराचें कौतुक वाटतें! पशुपक्षीकीटकादि अनंत प्राणी सारे विवरून पाहणारा कोण आहे? जो तो आपुल्या पुरतें अल्पमात्र जाणून राहतो. ही नवखंड पृथ्वी व तिच्या भोंवतालचा सप्तसागरांचा वेढा, ब्रह्मांडाबाहेरील उदकें हें सर्व कोण पाहतो? त्या उदकांत असंख्य जीव आहेत. त्या लहानमोठ्या जीवांची स्थिति कोण जाणूं शकेल? जेथें जीवन आहे तेथें जीव आहेत, हा सृष्टिस्वभाव आहे; याचा आणखी विचार पुष्कळ करितां येण्यासारखा आहे. पृथ्वीच्या पोटांत जीं उदकें आहेत त्यांतही कितीतरी लहानथोर जीव आहेत. कांहीं प्राणी

येक प्राणी अंतरिक्षीं असती । तेहीं नाहीं देखिली क्षिती । वरीच्या
वरी उडोन जाती । पक्ष फुटल्यानंतरें ॥ १९ ॥ नाना खेचरें आणि भूचरें ।
नाना वनचरें आणि जळचरें । चौर्‍यासि योनीप्रकारें । कोण जाणे ॥ २० ॥
उष्ण तेज वेगळें करुनी । जेथें तेथें जीवयोनी । कल्पनेपासुनी होती प्राणी ।
कोण जाणे ॥ २१ ॥ येक नाना सामर्थ्यें केले । येक इच्छेपासून जाले ।
येक शब्दासरिसे पावले । उश्रापदेह ॥ २२ ॥ येक देह बाजीगरीचे । येक
देह वोडंबरीचे । येक देह देवतांचे । नाना प्रकारें ॥ २३ ॥ येक क्रोधा-
पासून जाले । येक तपापासून जन्मले । येक उश्रापें पावले । पूर्वदेह ॥ २४ ॥
ऐसें भगवंताचें करणें । किती म्हणोनी सांगणें । विचित्र मायेच्या गुणें ।
होत जातें ॥ २५ ॥ नाना अवघड करणी केली । कोणीं देखिली ना
ऐकिली । विचित्र कळा समजली । पाहिजे सर्वें ॥ २६ ॥ थोडें बहुत
समजलें । पोटापुरती विद्या सिकलें । प्राणी उगेंच गर्वें गेलें । मी ज्ञाता
म्हणोनी ॥ २७ ॥ ज्ञानी येक अंतरात्मा । सर्वांमध्यें सर्वात्मा । त्याचा
कळावया महिमा । बुद्धि कैंची ॥ २८ ॥ सप्तकंचुक ब्रह्मांड । त्यांत सप्तकंचुक
पिंड । त्या पिंडामध्यें उदंड । प्राणी असती ॥ २९ ॥ आपल्या देहांतील
न कळे । मां तें अवघें कैंचें कळे । लोक होती उतावळे । अल्पज्ञानें
॥ ३० ॥ अणुरेणाऐसे जिनस । त्यांचे आम्ही विराट पुरुष । आमचें उदंडचि
आयुष्य । त्यांच्या हिसेबें ॥ ३१ ॥ त्यांच्या रीती त्यांचे दंडक । वर्तायाचे
असती अनेक । जाणे सर्वहि कौतुक । ऐसा कैंचा ॥ ३२ ॥ धन्य
परमेश्वराची करणी । अनुमानेना अंतःकरणीं । उगीच अहंता पापिणी । वेढा

पक्ष फुटल्यावर आकाशांत उडून जातात ते पुन्हां ही पृथ्वी पाहात नाहींत. खेचर (आकाशांत उडणारे प्राणी), तसेच भूचर, वनचर, जळचर इ० ८४ लक्ष योनींचे अनंत प्राणी आहेत ते कोण जाणतो ? उष्णतेज तेवढें वेगळें करून बाकीच्या सर्व सृष्टींत जीव आहेत. कित्येक प्राणी नुसत्या कल्पनेपासून होतात, कित्येक तप इ० सामर्थ्यानें होतात, कित्येक इच्छेनें होतात, कित्येक शापदग्ध झालेले पुन्हां उश्रापदेह घेऊन उठले आहेत. कित्येक देह मायेंतले आहेत, कित्येक देवताहि अनेक देह घेणाऱ्या आहेत. क्रोध, तप, उश्राप यांपासून कांहीं देह झाले आहेत. भगवंताची लीला विचित्र आहे, मायागुणें सर्व होत असतें. ही सृष्टिरचना ही देवाची विचित्र करणी आहे. थोडीफार पोटापुरती विद्या शिकून मनुष्यें 'मी ज्ञाता' या गर्वानें उगाच फुगत असतात. सर्वांत सर्वात्मपणानें भरलेला व्यापक अंतरात्मा तेवढा खरा ज्ञाता आहे, पण त्याचा महिमा मानवी बुद्धीला कसा कळावा ? सप्तकंचुक ब्रह्मांड म्ह० मूळ पंचतत्वें, अहंकार व महत्तत्व या सात आवरणांनीं वेष्टिलेलें ब्रह्मांड, तसाच पिंड, त्या पिंडांत अनंत जीव आहेत. आपल्या पिंडांतलें आपल्याला कांहींएक कळत नाहीं, मग ब्रह्मांडांतलें काय कळणार ? पण लोक अल्पज्ञानानें उच्छृंखल होतात. अणुरेणुइतके बारीक जीव आहेत कीं त्यांच्या मानानें आम्हांला विराट पुरुषच म्हटलें पाहिजे, त्यांच्या हिशेबानें आमचें आयुष्यहि शंभर वर्षांचें म्ह० किती तरी दीर्घ आहे ! परमेश्वराची कृति धन्य आहे. मानवाला तेचें कांहींच अनुमान करितां येत नाहीं ; तथापि दुष्ट अहंकार जीवाला उगाच नाचवीत असतो ! अहंकार सोडून देवाची कृति

लावी ॥ ३३ ॥ अहंता सांडून विवरणें । कित्येक देवाचें करणें । पाहतां मनुष्याचें जिणें । थोडें आहे ॥ ३४ ॥ थोडें जिणें अर्धपुडी काया । गर्व करिती रडाया । शरीर आवघें पडाया । वेळ नाहीं ॥ ३५ ॥ कुश्चीळ ठाईं जन्मलें । आणि कुश्चीळ रसेंचि वाढलें । यास म्हणती थोरलें । कोण्या हिसेबें ॥ ३६ ॥ कुश्चीळ आणि क्षणभंगुर । अखंड व्यथा चिंतातुर । लोक उगेच म्हणती थोर । वेडेपणें ॥ ३७ ॥ काया माया दों दिसांची । आदिअंतीं अवघी चीची । झांकातापा करून उगीचि । थोरीव दाविती ॥ ३८ ॥ झांकिलें तरी उपंढर पडे । दुर्गंधी सुटे जिकडे तिकडे । जो कोणी विवेकें पवाडे । तोचि धन्य ॥ ३९ ॥ उगेंचि कासया तंडावें । मोडा अहंतेचे पुंडावे । विवेकें देवास धुंडावें । हें उत्तमोत्तम ॥ ४० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सूक्ष्मजीवनिरूपणनाम समास अष्टम ॥ ८ ॥

॥ श्रीराम ॥ चौखाणींचे प्राणी असती । अवघे उदकेंचि वाढती । ऐसे होती आणि जाती । असंख्यात ॥ १ ॥ तत्वांचें शरीर जालें । अंतरात्म्यासगट वळलें । त्यांचें मूळ जों शोधिलें । तों उदकरूप ॥ २ ॥ शरत्काळींचीं शरीरें । पीळपीळों झिरपती नीरें । उभय रेतें येकत्रें । मिसळती रक्तीं ॥ ३ ॥ अन्नरस देहरस । रक्तरेतें बांधे मूस । रसद्रयें सावकास । वाढों लागे ॥ ४ ॥ वाढतां वाढतां वाढलें । कोमळाचें कठीण जालें । पुढें उदक पैसावलें । नाना अवेवीं ॥ ५ ॥ संपूर्ण होतां बाहेरी पडे । भूमीस पडतां मग तें रडे । अवघ्याचें अवघेंच घडे । ऐसें आहे ॥ ६ ॥ कुडी वाढे कुबुद्धि वाढे । मूळापासून अवघेंच घडे । अवघेंचि मोडे आणी वाढे । देखदेखतां ॥ ७ ॥ पुढें अवघियांचें शरीर । दिवसेंदिवस जालें थोर ।

पाहावी. पण पाहायला आयुष्य कोठें फार आहे ? आयुष्य थोडें, क्षणभंगुर देह, तो केव्हां पडेल याचा भरंवसा नाहीं, असें असतां गर्व कशाचा करायचा ? हा देह नाशवंत व कुश्चिळ म्ह० रजस्वलेच्या विटाळांत जन्मलेला. आधि (चिंता) व व्याधि (व्यथा) यांत आयुष्य जातें. लोक वेडेपणानें मोठेपणाचा डौल मिरवितात. कायामाया (शरीरसंपत्ति) दोन दिवसांची क्षणभंगुर, आदिअंतीं (जन्ममृत्युकाळीं) सारा फजीतवाडा, वस्त्रालंकारांनीं देह नटवून उगाच मोठेपणा मिरवितात. तरी देह मरणकाळीं उघडा (उपंडर) पडतोच, मग सर्वत्र त्याची दुर्गंधी सुटते. विवेकानें जो कोणी पाहील तोच धन्य होय. उगाच कशाला तंटेबखेडे करावे ? अहंतेचें बंड मोडून विवेकानें देवाला शोधावें हें सर्वांत उत्तम (१–४०). [द० १५, स० ८]

चारी खाणींचे असंख्य प्राणी होतात व जातात पण अवघे उदकापासून वाढतात. अंतरात्म्यासकट तत्वांचें गाठोडें असें हें शरीर दिसतें पण याचें मूळ पाहिलें तर उदकच आहे. अन्नरसाचा देहरस व देहरसाचीं रक्तरेतें व त्या शोणितशुक्रांची मूस बांधली जाते ; त्या कोमळाचें कठिण होऊन अनेक अवयव जलानेंच तयार होतात, पूर्णावयव होतांच मूल जन्मास येतें व पुढचा जन्मापासून मृत्यूपर्यंत सर्व जीवांचा क्रम एकच आहे. बीजें उदकानें अंकुरतात, मुळ्या पाताळीं जातात, अग्रें अंतराळीं

सुचों लागला विचार । कांहीं कांहीं ॥ ८ ॥ फळामध्यें बीज आलें । तेणें न्यायें तेथें जालें । ऐकतां देखतां उमजलें । सकळ कांहीं ॥ ९ ॥ बीजें उदकें अंकुरती । उदक नस्तां उडोन जाती । येके ठाईं उदक माती । होतां बरें ॥ १० ॥ दोहोंमध्यें असतां बीज । भिजोन अंकुर सहज । वाढतां वाढतां पुढें रीझ । उदंड आहे ॥ ११ ॥ इकडे मुळ्या धांवा घेती । तिकडे अग्रें हेलावती । मुळें अग्रें द्विधा होती । बीजापासून ॥ १२ ॥ मुळ्या चालिल्या पाताळीं । अग्रें धांवती अंतराळीं । नाना पत्रीं पुष्पीं फळीं । लिगडलीं झाडें ॥ १३ ॥ फळांवडील सुमनें । सुमनांवडील पानें । पानांवडील अनुसंधानें । काष्ठें अवघीं ॥ १४ ॥ काष्ठांवडील मुळ्या बारिक । मुळ्यांवडील तें उदक । उदक आळोन कौतुक । भूमंडळाचें ॥ १५ ॥ याची ऐसी आहे प्रचीती । तेव्हां सकळांवडील जगती । जगतीवडील मूर्ती । आपोनारायणाची ॥ १६ ॥ तयावडील अग्निदेव । अग्नीवडील वायोदेव । वायोदेवावडील स्वभाव । अंतरात्म्याचा ॥ १७ ॥ सकळांवडील अंतरात्मा । त्यासि नेणे तो दुरात्मा । दुरात्मा म्हणिजे दुरी आत्मा । अंतरला तया ॥ १८ ॥ जवळी असोन चुकलें । प्रत्ययास नाहीं सोकलें । उगेंचि आलें आणी गेलें । देवाचकरितां ॥ १९ ॥ म्हणोनी सकळांवडील देव । त्यासी होतां अनन्यभाव । मग हे प्रकृतीचा स्वभाव । पालटों लागे ॥ २० ॥ करी आपुला व्यासंग । कदापि नव्हे ध्यानभंग । बोलणें चालणें वेंग । पडोंच नेदी ॥ २१ ॥ जें वडिलीं निर्माण केलें । तें पाहिजे पाहिलें । काय काय वडिलीं केलें । किती पाहावें ॥ २२ ॥ तो वडील जेथें चेतला । तोचि भाग्यपुरुष जाला । अल्प चेतनें तयाला । अल्पभाग्य ॥ २३ ॥ तया नारायणाला मनीं । अखंड आठवावें ध्यानीं । मग ते लक्ष्मी तयापासूनी

हेलावतात. याप्रमाणें पत्रपुष्पफळांनीं झाडें समृद्ध होतात. फळापासून मागें पाहात जावें. फळांवडील सुमनें, सुमनांवडील पानें, पानांवडील काष्ठें, काष्ठांवडील बारीक मुळ्या, मुळ्यांवडिल तें उदक, उदक आळोन भूमंडळाचें कौतुक. तेव्हां सकळांवडिल जगती हें स्पष्ट झालें. आतां आणखी मागें जा. जगतीला (पृथ्वीला) वडिल आप, ' आपा 'ला वडिल अग्नि, अग्निवडिल वायुदेव, व वायुदेवावडिल अंतरात्म्याचा स्वभाव. तात्पर्य, सकळांवडिल अंतरात्मा हें सिद्ध झालें (१–१७). त्या अंतरात्म्याला जाणत नाहीं तो दुरात्मा. त्या अंतरात्म्याला प्रत्ययानें न पाहिल्यामुळें ' जवळी असून प्राणी चुकले ' असें होऊन ते फुकट आले आणि गेले असें होतें. म्हणून सकळांवडील देव अंतरात्मा, त्यांशीं अनन्य व्हावें म्हणजे प्रकृतीचा स्वभाव पालटूं लागतो. तो आपलें सर्व कर्म सांभाळतो, ध्यानाचा भंग होऊं देत नाहीं. बोलण्याचालण्यांत कोठें चूक पडूं देत नाहीं. त्यानें जें जें निर्माण केलें तें तें पाहावें, अथवा सर्वकर्ता तो – त्यानें केलेलें कोठवर पाहाणार ? तो सर्वांचा वडील अंतरात्मा जेथें प्रकाशतो तोच भाग्यवान् खरा. त्याचा प्रकाश (चेतना) अल्प तर भाग्य अल्प, चेतना पूर्ण तर भाग्यही पूर्ण (१८–२३). त्या देवाला – अंतरात्म्याला – नारायणाला अखंड स्मरावें, मग त्याची लक्ष्मी (प्रकृति) त्याला

जाईल कोठें ॥ २४ ॥ नारायण असे विश्वीं । त्याची पूजा करीत जावी । याकारणें तोषवावी । कोणीतरी काया ॥ २५ ॥ उपासना शोधून पाहिली । तों ते विश्वपाळिती जाली । न कळे लीळा परीक्षिली । न वचे कोणा ॥ २६ ॥ देवाची लीळा देवेंविण । आणीक दुसरा पाहे कोण । पाहणें तितुकें आपण । देवचि असे ॥ २७ ॥ उपासना सकळां ठाईं । आत्माराम कोठें नाहीं । याकारणें ठाईं ठाईं । रामें आटोपिलें ॥ २८ ॥ ऐसी माझी उपासना । आणितां नये अनुमाना । नेऊन घाली निरंजना । पैलीकडे ॥ २९ ॥ देवाकरितां कर्में चालती । देवाकरितां उपासक होती । देवाकरितां ज्ञानी असती । कितीयेक ॥ ३० ॥ नाना शास्त्रें नाना मतें । देवचि बोलिला समस्तें । नेमकांनेमक वेस्तावेस्तें । कर्मानुसार ॥ ३१ ॥ देवास अवघें लागे करावें । त्यांत घेऊं ये तितुकें घ्यावें । अधिकारासारिखें चालावें । म्हणिजे बरें ॥ ३२ ॥ आवाहन विसर्जन । ऐसेंचि बोलिलें विधान । पूर्वपक्ष जाला येथून । सिद्धांत पुढें ॥ ३३ ॥ वेदांत सिद्धांत धादांत । प्रचीत प्रमाण नमस्त । पंचीकरण सांडून महत । वाक्यार्थ पहावा ॥ ३४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पिंडोत्पत्तिनिरूपणनाम समास नवम ॥ ९ ॥

॥ श्रीराम ॥ गगनीं अवघेंचि होत जातें । गगनाऐसें तगेना तें । निश्चळीं चंचळ नाना तें । येणेंचि न्यायें ॥ १ ॥ अंधार दाटला बळें । वाटे गगन जालें काळें । रविकिरणें तें पिंवळें । सर्वेंचि वाटे ॥ २ ॥ उदंड हिंव

सोडून कोठें जाईल ? नारायण विश्वांत भरून राहिला आहे. त्याची पूजा करावी. त्याची पूजा करणें म्हणजे सर्वांभूतीं त्याला पाहणें ; सर्वांभूतांचा संतोष करणें. यावरून उपासना म्हणजे विश्वाचा संतोष, विश्वाचा प्रतिपाळ. सर्व भूतांतरात्मा जो नारायण त्याला सर्वांभूतीं पाहणें म्ह० सर्व भूतांना सुखविणें, त्यांचा प्रतिपाळ करणें, उपासनेचें मूळ शोधून पाहातां याप्रमाणें उपासना विश्वपाळिती दिसून येते. नारायणाची लीला नारायणावांचून कोणाला समजणार ? पाहणें तें सारें देवाचेंच रूप आहे. या दृष्टीनें पाहिलें म्हणजे आत्मारामासारखीच उपासना विश्वव्यापिनी व विश्वपाळिती आहे. माझी रामोपासना ही आहे. ही अनुमानानें आकळायची नाहीं. अंतरात्मा नारायण – राम याची ही उपासना मूळमायेपलीकडचें निरंजन (मायातीत, अंजन म्ह. माया) निर्गुण विमल ब्रह्म तेथें नेऊन सोडते. अंतरात्मा देव – सर्व कर्ममार्ग त्याच्यासाठीं आहेत, उपासना त्याच्यासाठीं, उपासक त्याचे, ज्ञान व ज्ञानी त्याच्यापर्यंत. अनेक शास्त्रें व मतें तो देवच बोलला आहे. नेमक आणि बाष्कळ, व्यवस्थित आणि अव्यवस्थित, सर्व कांहीं जीवांच्या कर्मानुसार देवाला सारेंच करावें लागतें; त्यांत आपल्याला पाहिजे तें घ्यावें, आपल्या अधिकाराप्रमाणें आपण चालावें हें योग्य आहे. आवाहन (मूळमायेपासून सर्व ब्रह्मांडाची उभारणी) व विसर्जन (ब्रह्मांडाची संहारणी) कसें होतें हें पाहणें ही देवाची उपासना. हा पूर्वपक्ष झाला. सिद्धांत यापुढें. शास्त्र, गुरु व आपण या तीन प्रचीति एकरूपतेस आणाव्या व पंचीकरणानें पिंडब्रह्मांडविचार करून तो विचारही सोडून द्यावा आणि महावाक्याचा विवेक पहावा. (२४–३४). [द० १५, स० ९]

गगनांत अवघें होतें जातें पण कांहींही गगनासारखें टिकत नाहीं, तसेंच निश्चळीं चंचळ तगत नाहीं. गडद अंधार पडला म्हणजे गगन काळें वाटतें, सूर्यप्रकाशानें पिवळें वाटतें, हिंव पडलें म्हणजे वाटतें कीं गगन थंड झालें, उष्ण झळेनें

ओव्हां पडिलें । गमे गगन थंड जालें । उष्ण झळेनें वाळलें । ऐसें वाटे ॥ ३ ॥ ऐसें जें कांहीं वाटलें । तें तें जालें आणी गेलें । आकाशासारिखें उगलें । हें तों घडेना ॥ ४ ॥ उत्तम जाणीवेचा जिनस । समजोन पाहें सावकास । निराभास तें आकाश । भास मिथ्या ॥ ५ ॥ उदक पसरे वायो पसरे । अंतरात्मा अत्यंतचि पसरे । तत्वें तत्व अवघेंचि पसरे । अंतर्यामीं ॥ ६ ॥ चळतें आणी चळेना तें । अंतरा अवघेंच कळतें । विवरणेंचि निवळतें । प्राणिमात्रांसीं ॥ ७ ॥ विवरतां विवरतां सेवटीं । निवृत्तिपदीं अखंड भेटी । जालियानें तुटी । होणार नाहीं ॥ ८ ॥ जेथें ज्ञानाचें होतें विज्ञान । आणि मनाचें होतें उन्मन । तत्वनिरसनीं अनन्य । विवेकें होतें ॥ ९ ॥ वडिलांस शोधून पाहिलें । तों चंचळाचें निश्चळ जालें । देवभक्तपण गेलें । तये ठाईं ॥ १० ॥ ठाव म्हणतां पदार्थ नाहीं । पदार्थमात्र मूळीं नाहीं । जैसें तैसें बोलों कांहीं । कळावया ॥ ११ ॥ अज्ञानशक्ति निरसली । ज्ञानशक्ति मावळली । वृत्तिशून्यें कैसी जाली । स्थिती पाहा ॥ १२ ॥ मुख्य शक्तिपात तो ऐसा । नाहीं चंचळाचा वळसा । निवांतीं निवांत कैसा । निर्विकारी ॥ १३ ॥ चंचळाचीं विकार बालटें । चंचळचि जेथें आटे । चंचळ घनवटे । हें तों घडेना ॥ १४ ॥ महावाक्याचा विचारु । तेथें संन्याशास अधिकारु । दैवीकृपेचा जो नरु । तोही विवरोन पाहे ॥ १५ ॥ संन्यासी म्हणिजे षड्न्यासी । विचारवंत सर्व संन्यासी । आपुली करणी आपणासी । निश्चयेंसी ॥ १६ ॥ जगदीश बोलल्यावरी । तेथें कोण अनुमान करी । आतां असो हें विचारी । विचार जाणती ॥ १७ ॥ जे जे विचारी समजले ।

वाटतें कीं तें वाळलें, पण यांपैकीं गगनाला कांहीं होत नाहीं; गगन आहे तसें अखंड निराभास आहे – भास भासतात ते सारे मिथ्या आहेत. जळ, वायु इ० तत्वें बाहेर पसरलीं म्हणजे भास होतो, तीं अंतर्यामीं कळतात (१–६). चंचळ कोण, निश्चळ कोण हें सारें विवरण करितां स्वच्छ कळतें. विवेकानें तत्वविचार करितां करितां निवृत्तिपदीं एकदां भेट झाली कीं त्या पदापासून कधीं चळण होत नाहीं. तेथें ज्ञानाचें विज्ञान होतें, मनाचें उन्मन होतें, तत्वनिरसनानंतर त्या निर्गुणपदाशीं अनन्यता होते. वडिल जो अंतरात्मा त्याला शोधून पाहतां चंचळाचें निश्चळ होतें व देवभक्तपण म्ह० द्वैत तेथेंच मावळतें. अज्ञानवृत्तीबरोबर ज्ञानवृत्तिही नाहींशी होऊन निवृत्तिपद उरतें. चंचल तेथें आटतें. हाच मुख्य शक्तिपात होय. चंचळचक्रीं फिरणें संपून निर्विकारीं हा निवांत होतो. चंचळाचे नानाविध भ्रम (बालटें) चंचळासवें नष्ट होतात. निश्चळ व चंचळ (प्रकाश व अंधार याप्रमाणें) एकरूप होतात असें म्हणतां येत नाहीं (७–१४). महावाक्य (तत्त्वमसि) याचा विचार करण्याचा अधिकार जो संन्यासी आहे त्याला आहे, किंवा ज्यावर ईश्वरी कृपा झाली आहे तोच त्याचें विवरण करितो. संन्यासी म्ह० षड् (सहा) रिपूंचा ज्यानें न्यास (त्याग) केला आहे तो जितेंद्रिय, वासनारहित; अर्थात् सर्व विचारी पुरुष (मग त्यांनीं बाह्यत्याग केला असो वा नसो) संन्यासीच आहेत. परमात्मा प्रसन्न झाल्यावर मग अनुमान कोण करील? असो. विचारी विचार जाणतात. जे जे विचारी पुरुष यथार्थ उमजले ते निःसंगता पावतात. देहाभिमानी देहाचा

ते ते निःसंग होऊन गेले । देहाभिमानी जे उरले । ते देहाभिमान रक्षिती ॥ १८ ॥ लक्षीं बैसलें अलक्ष । उडोन गेला पूर्वपक्ष । हेतुरूपें अंतरसाक्ष । तोहि मावळला ॥ १९ ॥ आकाश आणि पाताळ । दोनी नामीं अंतराळ । काढितां दृश्याचें चडळ । अखंड जालें ॥ २० ॥ तें तों अखंडचि आहे । मन उपाधी लक्षून पाहे । उपाधीनिरासें साहे । शब्द कैसा ॥ २१ ॥ शब्दपर कल्पनेपर । मनबुद्धिअगोचर । विचारें पाहावा विचार । अंतर्यामीं ॥ २२ ॥ पाहातां पाहातां कळों येतें । कळलें तितुकें व्यर्थ जातें । अवघड कैसें बोलावें तें । कोण्याप्रकारें ॥ २३ ॥ वाक्यार्थवाच्यांश शोधिला । अलक्षीं लक्ष्यांश बुडाला । पुढें समजोन बोला । कोणीतरी ॥ २४ ॥ शाश्वतास शोधीत गेला । तेणें ज्ञानी साच जाला । विकार सांडून मिळाला । निर्विकारीं ॥ २५ ॥ दुःस्वप्न उदंड देखिलें । जागें होतां लटिकें जालें । पुन्हां जरी तें आठविलें । तरी तें मिथ्या ॥ २६ ॥ प्रारब्धयोगें देह असे । असे अथवा निरसे । विचारें अंतरीं बैसे । चळेना ऐसा ॥ २७ ॥ बीज अग्नीनें भाजलें । त्याचें वाढणें खुंटलें । ज्ञात्यास तैसें जालें । वासनाबीज ॥ २८ ॥ विचारें निश्चळ जाली बुद्धि । बुद्धीपासीं कार्यसिद्धि । पाहतां वडिलांची बुद्धि । निश्चळीं गेली ॥ २९ ॥ निश्चळास ध्यातो तो निश्चळ । चंचळास ध्यातो तो चंचळ । भूतांस ध्यातो तो केवळ । भूत होय ॥ ३० ॥

अभिमान वाढवीतच राहतात. अलक्ष्यब्रह्मवस्तूच्या ठिकाणीं चित्त जडलें, पूर्वपक्ष उडून गेला, हेतुरूप (जिज्ञासा धरून बसलेला) जो अंतर्साक्षी (अंतरात्मा) तोही मावळला व शुद्ध स्वरूप उरलें. आकाश आणि पाताळ दोन्ही मिळून आकाशच (अंतराळ), मधला दृश्याचा पडदा (पृथ्वी, चडळ) काढून पाहिलें तर आकाश व पाताळ एकच आहेत – एक अखंड आकाशच आहे (अंतरात्मा प्रकृतीस पाहाणारा होता तो प्रकृतीस मावळला, व एक निश्चळ परब्रह्म उरलें). तें तर अखंड एकीएकच आहे, पण मनाला उपाधि उभी करून पाहण्याची संवय आहे; तथापि त्या उपाधीचा निरास झाल्यावर मग शब्दच कोठें उरतो (घटमठादि उपाधि आहेत तोंवर घटाकाश – मठाकाशादि शब्दयोजना होते, पण उपाधि गेल्यावर शब्दच उरत नाहीं). ब्रह्मवस्तु (गगनासारखी) शब्दाच्या, कल्पनेच्या, मनबुद्धीच्या पलीकडे आहे. याचा अंतर्यामीं विचार पाहावा म्हणजे पाहतां पाहतां कळून येतें. कळून येतें ही भाषाही उरत नाहीं, कांकीं कळलें तितकें व्यर्थ जातें. कळतेंपणही ब्रह्मीं खपत नाहीं. असा तो सूक्ष्म अनुभव शब्दांनीं कसा बोलावा? वाक्याचा अर्थ पाहतां वाच्यांश सांपडला, त्याचें मनन करितां लक्ष्यांश कळून वाच्यांश उडाला, नंतर लक्ष्यांशही अलक्ष्य वस्तूंत बुडाला, हें समजून पुढें कोणी तरी बोलू पाहूं! (बोलतांच येत नाहीं). महावाक्यांचा लक्ष्यांशही अलक्ष्यीं (ब्रह्मरूपीं) बुडाल्यावर बोलणार कोण ? ज्ञानी शाश्वतास शोधतां शोधतां ज्ञानस्वरूप झाला, विकारत्यागें निर्विकारीं मिळाला. जागृतीस आल्याबरोबर दुःस्वप्न मावळतें. पुन्हा त्याची आठवण केली तरी तें मिथ्या अशीच प्रतीति असते. अढळपदीं ज्ञानी स्थित झाल्यावर प्रारब्धयोगें देह राहील अथवा जाईल, त्याची पर्वा ज्ञान्याला नाहीं. ज्ञात्याचें वासनाबीज ज्ञानाग्नीनें दग्ध होतें, पुढें वाढ नाहीं. आत्मनिश्चय बुद्धीनें केला कीं कृतकार्य झाला, चंचल निमालें. पंचभौतिकांचें ध्यान करणारा पंचभौतिकांतच राहून जन्ममृत्युवान् होतो, चंचळ अंतरात्म्याचें ध्यान करणारा चंचळ होतो व निश्चळ परब्रह्माचें ध्यान करणारा निश्चळपद पावतो. जो शेवटपर्यंत

जो पावला सेवटवरी । तयास हें कांहींच न करी । अंतरनिष्ठां बाजीगरी । तैसी माया ॥ ३१ ॥ मिथ्या ऐसें कळों आलें । विचारानें सदृढ जालें । अवघें भयचि उडालें । अकस्मात ॥ ३२ ॥ उपासनेचें उत्तीर्ण व्हावें । भक्तजनें वाढवावें । अंतरीं विवेकें उमजावें । सकळ कांहीं ॥ ३३ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सिद्धांतनिरूपणनाम समास दशम ॥ १० ॥

जाऊन निश्चळ ब्रह्माला पावला, त्या अंतर्निष्ठाला मिथ्या माया काय होय? माया मिथ्या असें विचाराने कळले, विचार दृढ झाला, मग मायेचें भय उडून अभयप्राप्ति झाली. हा परमलाभ उपासनेनें झाला. अंतरात्म्याची उपासना केल्यानें निश्चळ पद मिळालें (मागील समासांत अंतरात्म्याची उभारणी किंवा मांडणी केली असून या समासांत त्याची संहारणी किंवा निरास केला आहे; अथवा या शब्दांपेक्षांही चांगली शब्दयोजना करून असें म्हणूं कीं मागील समासीं अंतरात्म्याचें आवाहन केलें असून या समासांत त्याचें विसर्जन केलें आहे). आतां उपासनेचें उतराई कसें व्हावें ? अंतरांत विवेकानें सर्व उमजावें व उपासनामार्ग भक्तानें वाढवावा. उपासना वाढविणें म्हणजेच उपासनेचें उतराई होणें होय (१५–३३).

[द० १५, स० १०]

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ सार्थ श्रीदासबोध ॥

॥ दशक षोडश सप्ततिन्वयाचा ॥

॥ श्रीराम ॥ धन्य धन्य तो वाल्मीक । ऋषींमाजी पुण्यश्लोक । जयाचेन हा त्रिलोक्य । पावन जाला ॥ १ ॥ भविष्य आणी शतकोटी । हें तों नाहीं देखिलें दृष्टीं । धांडोळितां सकळ सृष्टी । श्रुत नव्हे ॥ २ ॥ भविष्याचें येक वचन । कदाचित जालें प्रमाण । तरी आश्चर्य मानिती जन । भूमंडळीचे ॥ ३ ॥ नसतां रघुनाथअवतार । नाहीं पाहिला शास्त्राधार । रामकथेचा विस्तार । विस्तारला जेणें ॥ ४ ॥ ऐसा जयाचा वाग्विळास । ऐकोनी संतोषला महेश । मग विभागिलें त्रैलोक्यास । शतकोटी रामायण ॥ ५ ॥ ज्याचें कवित्व शंकरें पाहिलें । इतरां न वचे अनुमानलें । रामउपासकांसी जालें । परम समाधान ॥ ६ ॥ ऋषी होते थोर थोर । बहुतीं केला कवित्वविचार । परी वाल्मिकासारिखा कवीश्वर । न भूतो न भविष्यति ॥ ७ ॥ पूर्वी केलीं दुष्ट कर्मे । परी पावन जाला रामनामें । नाम जपतां दृढ नेमें । पुण्यें सीमा सांडिली ॥ ८ ॥ उफराटें नाम म्हणतां वाचें । पर्वत फुटले पापाचे । ध्वज उभारले पुण्याचे । ब्रह्मांडावरुते ॥ ९ ॥ वाल्मीकें जेथें तप केलें । तें वन पुण्यपावन जालें । शुष्क काष्ठीं अंकुर फुटले । तपोबळें जयाच्या ॥ १० ॥ पूर्वी होता वाल्हाकोळी । जीवघातकी भूमंडळीं ।

ऋषींमध्यें पुण्यश्लोक व त्रैलोक्यपावन असे वाल्मीकि धन्य होत. भविष्य आणि तें शतकोटी अशी अद्भुत गोष्ट सारी सृष्टि (जगाचें वाङ्मय) धुंडाळली तरी सांपडायची नाहीं. भविष्याचें एखादें वचन खरें झालें तर पृथ्वीवर त्याचा डांगोरा पिटला जातो. शास्त्राधार पाहिला नसून रामाचा अवतार होण्यापूर्वी रामकथा ज्यानें सविस्तर वर्णिली असा वाल्मीकींचा वाग्विलास ऐकून शंकर संतोषले व मग वाल्मीकींचें शतकोटी रामायण त्रैलोक्यास वांटून दिलें. त्यांच्या कवित्वाचें पूर्ण रहस्य शंकरास कळलें, इतरांस तसें कळत नाहीं, तथापि तें पाहून रामभक्तांना अत्यंत समाधान होतें. मोठमोठ्या ऋषींनीं कवित्व केलें, पण वाल्मिकीसारखा कवीश्वर मागें झाला नाहीं व पुढें होणार नाहीं. पूर्ववयांत त्यांच्या हातून क्रूरकर्मे झालीं होतीं, पण ते रामनामानें पावन झाले, दृढव्रतानें नामस्मरण करितांना त्यांच्या पुण्याला सीमा राहिली नाहीं. उफराटें नाम म्ह० ' म रा ' म्हणतां म्हणतां त्यांचें पापांचे डोंगर भग्न झाले, व पुण्याचे ध्वज ब्रह्मांडावर उभारले गेले. ज्या वनांत त्यांनीं तप केलें तें वनही पावन झालें, त्यांच्या तपोबळानें शुष्क काष्ठांला अंकुर फुटले ! हा पूर्वी माणसें

तोचि वंदिजे सकळीं । विबुधीं आणि ऋषीश्वरीं ॥ ११ ॥ उपरति आणि अनुताप । तेथें कैंचें उरेल पाप । देहांततपें पुण्यरूप । दुसरा जन्म जाला ॥ १२ ॥ अनुतापें आसन घातलें । देहाचें वारुळ जालें । तेंचि नाम पुढें पडिलें । वाल्मीक ऐसें ॥ १३ ॥ वारुळास वाल्मीक बोलिजे । म्हणोनि वाल्मीक नाम साजे । जयाच्या तीव्र तपें झिजे । हृदय तापसांचें ॥ १४ ॥ जो तापसांमाजी श्रेष्ठ । जो कवीश्वरांमध्यें वरिष्ठ । जयाचें बोलणें पष्ट । निश्चयाचें ॥ १५ ॥ जो निष्ठावंतांचें मंडण । रघुनाथभक्ताचें भूषण । ज्याची धारणा असाधारण । साधकां सदृढ करी ॥ १६ ॥ धन्य वाल्मीक ऋषेश्वर । समर्थांचा कवीश्वर । तयासी माझा नमस्कार । साष्टांगभावें ॥ १७ ॥ वाल्मीक ऋषी बोलिला नसता । तरी आम्हांसी कैंची रामकथा । म्हणोनियां समर्था । काय म्हणोनी वर्णावें ॥ १८ ॥ रघुनाथकीर्ती प्रगट केली । तेणें तयाची महिमा वाढली । भक्तमंडळी सुखी जाली । श्रवणमात्रें ॥ १९ ॥ आपुला काळ सार्थक केला । रघुनाथकीर्तीमध्यें बुडाला । भूमंडळीं उद्धरिला । बहुत लोक ॥ २० ॥ रघुनाथभक्त थोर थोर । महिमा जयांचा अपार । त्या समस्तांचा किंकर । रामदास म्हणे ॥ २१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्य-संवादे वाल्मीकस्तवननिरूपणनाम समास प्रथम ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥ धन्य धन्य हा सूर्यवंश । सकळ वंशांमध्यें विशेष । मार्तंडमंडळाचा प्रकाश । फांकला भूमंडळीं ॥ १ ॥ सोमाअंगीं आहे लांछन । पक्षा येका होय क्षीण । रविकिरण फांकतां आपण । कळाहीन होय ॥ २ ॥ याकारणें सूर्यापुढें । दुसरी साम्यता न घडे । जयाच्या प्रकाशें उजेडे ।

मारणारा वाल्हा कोळी होता, पण तोच पुढें मोठमोठ्या ज्ञात्यांना व ऋषिश्रेष्ठांना वंद्य झाला. वैराग्य आणि अनुताप यापुढें पाप कोठचें उरणार ? देहान्त व्हावा इतक्या खडतर तपश्चर्येनें त्याचा पुनर्जन्म झाला व तोही पुण्यरूप झाला. वल्मीक म्ह० वारुळ ; यावरून आसनावर तप करितां करितां देहाचें वारुळ झालें म्हणून त्यांना वाल्मीकि असें नांव पडलें ; त्यांचें तीव्र तप पाहून तप करणाऱ्यांचें हृदय कळवळलें. तपस्वी व कवीश्वर यांत अत्यंत श्रेष्ठ, बोलणें असंदिग्ध, निष्ठावंतांचें भूषण, रामभक्तांचें मंडण, ज्याची असामान्य धारणाशक्ति इ० पाहून साधकांची बुद्धी दृढ होते असा समर्थांचा (रामरायाचा) कवीश्वर वाल्मीकि धन्य होय. त्यांना माझा साष्टांग नमस्कार असो. त्यांनीं कवित्व केलें नसतें तर आम्हांला रामकथा कोठून मिळती ? त्यांनीं रामाचें यश ब्रह्मांडांत दुमदुमून सोडलें, भक्तांना सुखी केलें, स्वतःच्या जन्माचें सार्थक केलें व रामयशांत सारे लोक बुडवून त्यांना उद्धरिलें. वाल्मीकीसारखेच जे दुसरे थोर रामभक्त होऊन गेले त्या सर्वांचा मी (रामदास) किंकर म्ह० दासानुदास आहें (१–२१). [द० १६, स० १]

सर्व वंशांत श्रेष्ठ असा हा सूर्यवंश परम धन्य होय. याचा मूळ पूर्वज जो सूर्यनारायण त्याचा प्रकाश भूमंडळावर पसरलाच आहे. चंद्रावर डाग आहे, चंद्र कृष्णपक्षांत क्षीण होतो व शिवाय सूर्यापुढें तो निस्तेज होतो, म्हणून सूर्याची

प्राणिमात्रांसी ॥ ३ ॥ नाना धर्म नाना कर्में । उत्तमें मध्यमें अधमें । सुगमें दुर्गमें नित्यनेमें । सृष्टीमध्यें चालती ॥ ४ ॥ वेदशास्त्रें आणी पुराणें । मंत्र यंत्र नाना साधनें । संध्या स्नान पूजाविधानें । सूर्येंविण बापुडीं ॥ ५ ॥ नाना योग नाना मतें । पाहों जातां असंख्यातें । जाती आपुलाल्या पंथें । सूर्योदयो जालिया ॥ ६ ॥ प्रपंचिक अथवा परमार्थिक । कार्य करणें कोणी येक । दिवसेंविण निरर्थक । सार्थक नव्हे ॥ ७ ॥ सूर्याचें अधिष्ठान डोळे । डोळे नसतां मग ते आंधळे । याकारणें कांहींच न चले । सूर्येंविण ॥ ८ ॥ म्हणाल अंध कवित्वें करिती । तरी हेही सूर्याचीच गती । थंड जालिया आपुली मती । मग मतिप्रकाश कैंचा ॥ ९ ॥ उष्ण प्रकाश तो सूर्याचा । शीत प्रकाश तो चंद्राचा । उष्णत्व नस्तां देहाचा । घात होय ॥ १० ॥ याकारणें सूर्येंविण । सहसा न चले कारण । श्रोते तुम्ही विचक्षण । शोधून पाहा ॥ ११ ॥ हरिहरांच्या अवतारमूर्ती । शिवशक्तीच्या अनंत व्यक्ती । यापूर्वीं होता गभस्ती । आतांहि आहे ॥ १२ ॥ जितुके संसारासी आले । तितुके सूर्याखालें वर्तले । अंतीं देह त्यागून गेले । प्रभाकरादेखतां ॥ १३ ॥ चंद्र ऐलीकडे जाला । क्षीरसागरीं मथून काढिला । चौदा रत्नांमध्यें आला । बंधु लक्ष्मीचा ॥ १४ ॥ विश्वचक्षु हा भास्कर । ऐसें जाणती लहानथोर । याकारणें दिवाकर । श्रेष्ठाहून श्रेष्ठ ॥ १५ ॥ अपार नभमार्ग क्रमणें । ऐसेंचि प्रत्यहीं येणें जाणें । या लोकोपकाराकारणें । आज्ञा समर्थाची ॥ १६ ॥ दिवस नसतां अंधकार । सर्वांसी नकळे सारासार । दिवसेंविण तस्कर । कां दिवाभीत पक्षी ॥ १७ ॥ सूर्यापुढें आणिक दुसरें । कोण आणावें

योग्यता कोणालाच नाहीं. सूर्यामुळें प्राणिमात्रांना प्रकाश मिळतो. सर्व प्रकारचीं, सोपीं व अवघड, भलीं व बुरीं, धर्मकर्में व नेमधर्म सूर्यामुळें चालतात. वेदशास्त्रपुराणें, मंत्रयंत्र, नानाविध साधनें, स्नानसंध्याजपध्यानें, नाना योग, नाना मतें, प्रापंचिक अथवा पारमार्थिक कर्में सर्व कांहीं सूर्योदयाच्या धोरणानें व सूर्यामुळें चालतात (१–७). सूर्याचें अधिष्ठान डोळे व डोळे नसतां सारा अंधारच, म्हणून सूर्यावीण कांहींच होत नाहीं. (सूरदासासारखे) अंधही कविता करतात असें म्हणाल तर त्यांच्या बुद्धीला प्रकाश देणारा सूर्यावांचून कोण आहे ? बुद्धींत उष्णता (तेज) न राहील तर त्यांची मति प्रकाशित कशी होईल ? उष्ण प्रकाश सूर्याचा व थंड प्रकाश चंद्राचा ; देहांतील उष्णता गेली कीं कारभार संपतो. म्हणून सूर्यावीण सहसा कांहींच होत नाहीं हें विचारानें मनांत आणा (८–११). हरिहर किंवा शिवशक्ति यांचे अवतार अनेक झाले पण त्यापूर्वीं सूर्य होता व आतांही आहे. जे जे देह धरून संसारास आले त्या सर्वांनीं संसार सूर्याच्या सत्तेखालींच केला व त्याच्या देखतच देह टाकून गेले. लक्ष्मीचा बंधु चंद्र हा अलीकडे क्षीरसागराचें मंथन होऊन त्यांतून जीं चौदा रत्नें निघालीं त्यांत निघालेला आहे. सूर्य हा विश्वाचा डोळा आहे हें लहानथोर जाणतात म्हणून तो सर्वश्रेष्ठ आहे. अपार आकाशाचा मार्ग रोजच्या रोज चालायचा हें काम सूर्याला परमात्म्यानें लावून दिलें आहे. हा सूर्याचा जगावर केवढा उपकार आहे ? दिवस नसेल तर अंधार होऊन साऱ्यांचा सारासारविचार नष्ट होईल, दिवसाशिवाय (रात्रीं) चोर आणि दिवाभीतें मात्र वावरतात. अशा तेजोराशि सूर्यासमोर दुसऱ्या कोणाचें नांव घ्यावें ? (१२–१८). असा हा सर्वोपकारक

समोरें । तेजोरासी निर्धारें । उपमेरहित ॥ १८ ॥ ऐसा हा सविता सकळांचा । पूर्वज होय रघुनाथाचा । अगाध महिमा मानवी वाचा । काय म्हणोनी वर्णावी ॥ १९ ॥ रघुनाथवंश पूर्वापर । येकाहूनि येक थोर । मज मतिमंदास हा विचार । काय कळे ॥ २० ॥ रघुनाथाचा समुदाव । तेथें गुंतला अंतर्भाव । म्हणोनी वर्णितां महत्व । वाग्दुर्बळ मी ॥ २१ ॥ सकळ दोषांचा परिहार । करितां सूर्यास नमस्कार । स्फूर्ति वाढे निरंतर । सूर्यदर्शन घेतां ॥ २२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सूर्यस्तवननिरूपणनाम समास द्वितीय ॥ २ ॥

॥ श्रीराम ॥ धन्य धन्य हे वसुमती । इचा महिमा सांगों किती । प्राणिमात्र तितुके राहाती । तिच्या आधारें ॥ १ ॥ अंतरिक्षीं राहाती जीव । तोही पृथ्वीचा स्वभाव । देह जड नसतां जीव । कैसे तगती ॥ २ ॥ जाळिती पोळिती कुदळिती । नांगरिती उकरिती खाणती । मळमूत्र तिजवरी करिती । आणी वमन ॥ ३ ॥ नासकें कुजकें जर्जर । पृथ्वीविण कैची थार । देहांतकाळीं शरीर । तिजवरी पडे ॥ ४ ॥ बरें वाईट सकळ कांहीं । पृथ्वीविण थार नाहीं । नाना धातु द्रव्य तेंहि । भूमीचे पोटीं ॥ ५ ॥ येकास येक संहारिती । प्राणी भूमीवरी असती । भूमी सांडून जाती । कोणीकडे ॥ ६ ॥ गड कोट पुरें पट्टणें । नाना देश कळती अट्टणें । देव दानव मानव राहाणें । पृथ्वीवरी ॥ ७ ॥ नाना रत्नें हिरे परीस । नाना धातु द्रव्यांश । गुप्त प्रगट करावयास । पृथ्वीविण नाहीं ॥ ८ ॥ मेरुमांदार हिमाचळ । नाना अष्टकुळाचळ । नाना पक्षी मच्छ व्याळ । भूमंडळीं ॥ ९ ॥ नाना समुद्रा-

---

सूर्यप्रभु रामचंद्राचा पूर्वज होय. त्याचा अगाध महिमा मनुष्य वाचेनें काय वर्णील ? रघुनाथवंश अनादि थोर आहे, त्यांत एकापेक्षां एक थोर अशा विभूति झाल्या आहेत. रामभक्तांच्या मेळयांत माझें चित्त जडलें आहे, म्हणून त्यांचें वर्णन मी वाग्दुर्बळ कसा करूं ? सूर्याला नमस्कार केल्यानें सर्व दोषांचा परिहार होतो व नित्य सूर्यदर्शन घेतल्यानें स्फूर्ति वाढते (१९–२२). [द० १६, स० २]

ही पृथ्वी धन्य आहे. तिचा महिमा काय वानावा ? प्राणिमात्र तितके तिच्या आधारानें राहतात. कित्येक प्राणी अंतरिक्षांत राहतात हाही तिचाच धर्म आहे. कां कीं त्यांचे देह जड (पृथ्वीचे) नसते तर ते कसे वांचले असते ? पृथ्वीला जाळतात, पोळतात, कुदळतात, नांगरतात, उकरतात, खणतात ; मळमूत्रत्याग किंवा वमन तिच्यावर करितात, नासके, कुजके, फाटके पदार्थ तिच्यावर टाकतात ; पृथ्वीवांचून आधार कोणता ? देहपात होतो तेव्हां प्रेतही तिच्यावरच ठेवतात. बऱ्या वाईट सर्वांला पृथ्वी आधार आहे. अनेक धातु व द्रव्यें पृथ्वीच्या पोटीं सांपडतात. प्राणी एकमेकांचा संहार करितात पण पृथ्वीच्या आधारानें. पृथ्वी सोडून जातील कोणीकडे ? गड, कोट, पुरें, पट्टणें, नाना देश पृथ्वीपर्यटनानें कळतात. देव दानव मानव सारे पृथ्वीवर राहतात. रत्नें, हिरे, परीस, अनेक धातु, द्रव्यें वगैरे बहुमोल पदार्थ पृथ्वीच्या पोटांत आहेत व पृथ्वीच ते प्रगट दाखविते. मेरु, मांदार, हिमाचळ, अनेक कुळपर्वत, नानाविध पक्षी, मासे, सर्प सारे पृथ्वीवर आहेत. अनेक समुद्रांच्या

पैलीकडे । भोवतें आवरणोदकाकडे । असंभाव्य तुटले कडे । भूमंडळाचे ॥ १० ॥ त्यामध्यें गुप्त विवरें । लहानथोरें अपारें । तेथें निबिड अंधकारें । वस्ती कीजे ॥ ११ ॥ आवरणोदक तें अपार । त्याचा कोण जाणे पार । उदंड दाटले जळचर । असंभाव्य मोठे ॥ १२ ॥ त्या जीवनास आधार पवन । निबिड दाट आणी घन । फुटों शकेना जीवन । कोणेकडे ॥ १३ ॥ त्या प्रभंजनासी आधार । कठीणपणें अहंकार । ऐसा त्या भूगोळाचा पार । कोण जाणे ॥ १४ ॥ नाना पदार्थांच्या खाणी । धातुरत्नांच्या दाटणी । कल्पतरु चिंतामणी । अमृतकुंडें ॥ १५ ॥ नाना द्वीपें नाना खंडें । वसती उद्वसें उदंडें । तेथें नाना जीवनांचीं बंडें । वेगळालीं ॥ १६ ॥ मेरुभोंवते कडे कापले । असंभाव्य कडोसें पडिलें । निबिड तरु लागले । नाना-जिनसी ॥ १७ ॥ त्यासन्निध लोकालोक । जेथें सूर्याचें फिरे चाक । चंद्राद्रि द्रोणाद्रि मैनाक । महागिरी ॥ १८ ॥ नानादेशीं पाषाणभेद । नानाजिनसीं मृत्तिकाभेद । नानाविभूति छंदबंद । नानाखाणी ॥ १९ ॥ बहुरत्ना हे वसुंधरा । ऐसा पदार्थ कैंचा दुसरा । अफाट पडिलें सैरावैरा । जिकडे तिकडे ॥ २० ॥ अवघी पृथ्वी फिरोन पाहे । ऐसा प्राणी कोण आहे । दुजी तुळणा न साहे । धरणीविषीं ॥ २१ ॥ नाना वल्ली नाना पिकें । देशोदेसीं अनेकें । पाहों जातां सारिख्या सारिखें । येकही नाहीं ॥ २२ ॥ स्वर्ग मृत्य आणि पाताळें । अपूर्व रचिलीं तीन ताळें । पाताळलोकीं महाव्याळें । वस्ती कीजे ॥ २३ ॥ नाना वल्ली बीजांची खाणी । ते हे विशाळ धरणी । अभिनव कर्त्याची करणी । होऊन गेली ॥ २४ ॥ गड कोट नाना नगरें । पुरें

पलीकडे आवरणोदकाचे वेढे आहेत व मोठमोठे पर्वतांचे तुटलेले कडे हे पृथ्वीवरच आहेत. त्यांत अनेक लहान मोठीं गुप्त भुयारें आहेत कीं जेथें निबिड अंधकार भरलेला आहे. आवरणोदक तर अनंत अपार आहे त्यांत पर्वताकार मोठाले जळचर आहेत. त्या पाण्याला आधार घनदाट वायूचा असल्यामुळें पाणी कोठूनही फुटून जात नाहीं. त्या वायूला आधार कठिण तमोमय अहंकाराचा आहे. अशा या भूगोलाचा अंत कोणास लागणार आहे ? (१–१४). अनेक पदार्थांच्या खाणी, नानाविध धातु व रत्नें, कल्पवृक्ष, चिंतामणि, अमृताचीं कुंडें, अनेक द्वीपें व खंडें, अनेक ओसाड (उद्वसें) व गजबजलेलीं स्थळें, त्यांत अनेक जळाशयांचे (जीवन) विचित्र प्रकार, मेरुपर्वताच्या भोंवतालचे तुटलेले कडे, जागोजाग पडलेले विलक्षण कडोसे (अंधकार), अनेक जातींचे दाट वृक्ष, त्याजवळच लोकालोक पर्वत व सभोंवतीं फिरणारें सूर्यमंडळ, चंद्रद्रोण-मैनाकादि प्रचंड पर्वत, निरनिराळ्या प्रकारचे दगड, माती, रक्षा किंवा भस्में (विभूति), गुप्त ठेवी (छंद बंद), खाणी, अशा नानाविध रत्नांनीं संपन्न अशी पृथ्वी आहे ; तिच्यासारखी दुसरी कोणती वस्तु आहे ? ही जिकडे तिकडे अफाट पसरली आहे. ही अतुल आहे. सारी पृथ्वी कोण फिरून पाहूं शकेल ? भिन्नभिन्न प्रकारच्या अनंत वनस्पती व धान्यें पसरलीं आहेत. स्वर्ग, मृत्यु, पाताळ हे तीन लोक किती अद्भुत आहेत. पाताळांत अजस्र नागांची वस्ती आहे. ही पृथ्वी म्हणजे अनंता-अनंत वल्लींची व बीजांची खाण आहे. ब्रह्मदेवाच्या हातून या अद्भुत सृष्टीची रचना होऊन गेली. गड, किल्ले, सुंदर

पट्टणें मनोहरें । सकळां ठाईं जगदेश्वरें । वस्ती कीजे ॥ २५ ॥ महाबळी होऊन गेले । पृथ्वीवरी चौताळले । सामर्थ्यें निराळे राहिले । हें तों घडेना ॥ २६ ॥ असंभाव्य हे जगती । जीव कितीयेक जीती । नाना अवतार-पंगती । भूमंडळावरी ॥ २७ ॥ सध्यां रोकडें प्रमाण । कांहीं करावा नलगे अनुमान । नाना प्रकारीचें जीवन । पृथ्वीचेनि आधारें ॥ २८ ॥ कितेक भूमी माझी म्हणती । शेवटीं आपणचि मरोन जाती । कितेक काळ होतां जगती । जैसी तैसी ॥ २९ ॥ ऐसा पृथ्वीचा महिमा । दुसरी काय द्यावी उपमा । ब्रह्मादिकांपासुनी आम्हां । आश्रयोचि आहे ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पृथ्वीस्तवननिरूपणनाम समास तृतीय ॥ ३ ॥

॥ श्रीराम ॥ आतां सकळांचें जन्मस्थान । सकळ जीवांचें जीवन । जयास आपोनारायण । ऐसें बोलिजे ॥ १ ॥ पृथ्वीस आधार आवरणोदक । सप्तसिंधूचें सिंधोदक । नाना मेघींच मेघोदक । भूमंडळीं चालिलें ॥ २ ॥ नाना नद्या नाना देसीं । वाहात मिळाल्या सागरासी । लहानथोर पुण्य रासी । अगाध महिमे ॥ ३ ॥ नद्या पर्वतींहून कोसळल्या । नाना सांकडीमध्यें रिचवल्या । धबाबां खळाळां चालिल्या । असंभाव्य ॥ ४ ॥ कूप बावी सरोवरें । उदंड तळीं थोरथोरें । निर्मळें उचंबळती नीरें । नाना देसीं ॥ ५ ॥ गायमुखें पाट जाती । नाना कालवे वाहाती । नाना झऱ्या झिरपती । झरती नीरें ॥ ६ ॥ डुरे विहिरे पाझर । पर्वत फुटोन वाहे नीर । ऐसे उदकाचे प्रकार । भूमंडळीं ॥ ७ ॥ जितुके गिरी तितुक्या धारा ।

सुंदर शहरें – सर्व ठिकाणीं जगदीश्वराची वस्ती आहे (१५–२५). पृथ्वीवर मोठमोठाले पराक्रम गाजविणारे बलाढ्य वीर होऊन गेले व स्वसामर्थ्यानें पृथ्वी सोडून म्ह० स्वतंत्र पृथ्वी निर्माण करून राहिले असें मात्र झालें नाहीं. अशी ही पृथ्वी अफाट आहे. तिच्या पाठीवर असंख्य जीव होतात व जातात, शेंकडों आवतारही होऊन गेले. सांप्रतही प्रत्यक्ष आहेत. अनुमानच करायला पाहिजे असें नाहीं. पृथ्वीच्या आधारें सर्वांना जीवन मिळत आहे, जीव जिवंत राहात आहेत. ही भूमि माझी असें म्हणत कैक आजपर्यंत मेले आहेत, किती काळ होऊन गेला तरी पृथ्वी मात्र आहे तशीच आहे. असा पृथ्वीचा महिमा आहे. तिला दुसरी कशाची उपमा द्यावी ? ब्रह्मदेवापासून तों आमच्यापर्यंत सर्वांना तिचाच आधार आहे (२३–६०). [द० १६, स० ३]

आतां सर्वांचें जन्मस्थान, सर्व जीवांचें जीवन, त्या आपोनारायणाचें स्तवन करूं. पृथ्वीला सप्तसागरांचें आवरण (वेढा) आहे. त्यांचें पाणी व मेघोदक पृथ्वीवर वाहत असतें. अनेक देशींच्या अनेक नद्या वाहत वाहत समुद्राला मिळाल्या आहेत. त्या कमी अधिक पुण्यपावन आहेत व त्यांचीं माहात्म्येंही थोर आहेत. नद्या पर्वतांवरून कोसळून दऱ्याखोऱ्यांतून अडचणींतून खळखळाट वाहत जातात. आड, विहिरी, सरोवरें, मोठमोठाले तलाव, पाण्यानें उचंबळत नाना प्रदेशांतून वाहतात. गायमुखें, पाट, कालवे, झरे, डुरे म्ह० डबकीं, टांकीं, अनेक प्रकारांनीं पर्वत फोडून पाणी वाहात असतें. प्रत्येक डोंगरावरून पाण्याचे लोट भयंकर उसळ्या मारीत झरे व ओहोळ भरीत धांवत असतात. कोठें पाणी

कोसळती भयंकरा । पाभळ वाहाळा अपारा । उकळ्या सांडिती ॥ ८ ॥ भूमंडळीचें जळ आघवें । किती म्हणोनी सांगावें । नाना कारंजीं आणावें । बांधोन पाणी ॥ ९ ॥ डोहो डबकें खबाडीं टांकीं । नाना गिरिकंदरीं अनेकीं । नाना जळें नाना लोकीं । वेगळालीं ॥ १० ॥ तीर्थें येकाहून येक । महापवित्र पुण्यदायक । अगाध्र महिमा शास्त्रकारक । बोलोनि गेले ॥ ११ ॥ नाना तीर्थांचीं पुण्योदकें । नाना स्थळोस्थळीं सीतळोदकें । तैसींच नाना उष्णोदकें । ठाईं ठाईं ॥ १२ ॥ नाना वल्लीमध्यें जीवन । नाना फळीं फुलीं जीवन । नाना कंदीं मुळीं जीवन । गुणकारकें ॥ १३ ॥ क्षारोदकें सिंधोदकें । वीषोदकें पीयूषोदकें । नाना स्थळांतरीं उदकें । नाना गुणांचीं ॥ १४ ॥ नाना इक्षुदंडाचे रस । नाना फळांचे नाना रस । नाना प्रकारींचे गोरस । मध पारा गुळत्र ॥ १५ ॥ नाना मुक्ताफळांचें पाणी । नाना रत्नीं तळपे पाणी । नाना शास्त्रामध्यें पाणी । नाना गुणांचें ॥ १६ ॥ शुक्लीत श्रोणीत लाळ मूत्र स्वेद । नाना उदकाचे नाना भेद । विवरोन पाहातां विशद । होत जातें ॥ १७ ॥ उदकाचे देह केवळ । उदकाचेंचि भूमंडळ । चंद्रमंडळ सूर्यमंडळ । उदकाकरितां ॥ १८ ॥ क्षारसिंधु क्षीरसिंधु । सुरासिंधु आज्यसिंधु । दधिसिंधु इक्षुरसासिंधु । शुद्ध सिंधु उदकाचा ॥ १९ ॥ ऐसें उदक विस्तारलें । मूळापासून सेवटा आलें । मध्येंहि ठाईं ठाईं उमटलें । ठाईं ठाईं गुप्त ॥ २० ॥ जे जे बीजीं मिश्रित जालें । तो तो स्वाद घेऊन उठिलें । उंसामध्यें गोडीस आलें । परम सुंदर ॥ २१ ॥ उदकाचें बांधा हें शरीर । उदकचि पाहिजे तदनंतर । उदकाचा उत्पत्तिविस्तार । किती म्हणोनी सांगावा ॥ २२ ॥ उदक तारक उदक मारक । उदक नाना सौख्यदायक । पाहतां उदकाचा विवेक ।

कारंज्यांत आणून सोडलेलें असतें. पृथ्वीवर उदक किती व कसें वाहतें तें काय सांगावें? अनेक दऱ्याखोऱ्यांतून डोह, डबकीं, पाणटाकीं, नागझऱ्या वगैरे आहेतच. एकाहून एक पवित्र अनेक तीर्थेंही आहेत. कोठें बर्फासारखें गार पाणी व कोठें उष्णोदकें म्ह० उन्हाळीं आहेत. अनेक वल्लींत, फलपुष्पांत, कंदमूलांत अनेक तऱ्हेनें गुणकारक म्ह० औषधीतुल्य उदक आढळतें. खारें पाणी, विषारी पाणी, अमृतोदक अनेक स्थळीं अनेक गुणांचीं उदकें असतात. उंसाच्या कांड्यांतले रस, अनेक प्रकारच्या स्वादिष्ट फळांचे अनेक रस, दूध, दही, तूप इ० गोरस, मध, पारा, गुळत्रय (राब, काकवी, गुणवळी इ०) गुळाचे रस; तसेंच मोत्यें, रत्नें, शस्त्रें यांवर झळकणारें पाणी; रेत, शुक्र, लाळ, मूत्र, स्वेद (घाम) इ० उदकाचे प्रकार; विचार करितां सर्व समजून येतें (१–१७). सारे देह उदकापासून झाले आहेत; पृथ्वी, सूर्य, चंद्र हेही उदकापासूनच झाले आहेत. क्षारसिंधु (खारा समुद्र), क्षीरसमुद्र (दुधाचा), सुरासिंधु (मद्य), आज्यासिंधु (तूप), दधिसिंधु (दही), इक्षुरससिंधु (उंसाचा रस), व शुद्धोदकसिंधु हे सप्त समुद्र उदकाचेच आहेत. असें आद्यंत सारें उदकच पसरलें आहे, कोठें तें गुप्त आहे कोठें प्रकट आहे. तें ज्या बीजांत मिसळतें त्याचा गुण घेऊन उठतें. उंसासंगें तें गोड (व कारल्यासंगें कडवट) होतें. शरीर उदकाचें बांधलें आहे, उदकानें वाढतें. उदकापासून काय काय झालें आहे म्हणून काय सांगावें? उदक तारक आहे व मारकही आहे. उदक अत्यंत सौख्यदायक आहे–उदक ही अमोलिक वस्तु आहे असें विचारांतीं

अलोकीक आहे ॥ २३ ॥ भूमंडळीं धांवे नीर । नाना ध्वनी त्या सुंदर । धबाबां धबाबां थोर । रिचवती धारा ॥ २४ ॥ ठाईं ठाईं डोहो तुंबती । विशाळ तळीं डबाविती । चबाबिती थबाबिती । कालवे पाट ॥ २५ ॥ येकी पालथ्या गंगा वाहाती । उदकें सन्निधचि असती । खळाळां झरे वाहाती । भूमीचे पोटीं ॥ २६ ॥ भूमीगर्भीं डोहो भरले । कोण्ही देखिले ना ऐकिले । ठाईं ठाईं झोवीरे जाले । विद्युल्लतांचे ॥ २७ ॥ पृथ्वीतळीं पाणी भरलें । पृथ्वीमध्यें पाणी खेळे । पृथ्वीवरी प्रगटलें । उदंड पाणी ॥ २८ ॥ स्वर्गमृत्यपाताळीं । येक नदी तीन ताळीं । मेघोदक अंतराळीं । वृष्टी करी ॥ २९ ॥ पृथ्वीचें मूळ जीवन । जीवनाचें मूळ दहन । दहनाचें मूळ पवन । थोराहून थोर ॥ ३० ॥ त्याहून थोर परमेश्वर । महद्भूतांचा विचार । त्याहून थोर परात्पर । परब्रह्म जाणावें ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आपनिरूपणनाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

॥ श्रीराम ॥ धन्य धन्य हा वैश्वानरु । होय रघुनाथाचा श्वशुरु । विश्वव्यापक विश्वंभरु । पिता जानकीचा ॥ १ ॥ ज्याच्या मुखें भगवंत भोक्ता । जो ऋषींचा फळदाता । तमहिमरोगहर्ता । भर्ता विश्वजनांचा ॥ २ ॥ नाना वर्ण नाना भेद । जीवमात्रांस अभेद । अभेद आणी परम शुद्ध । ब्रह्मादिकांसी ॥ ३ ॥ अग्नीकरितां सृष्टी चाले । अग्नीकरितां लोक धाले । अग्नीकरितां सकळ ज्याले । लहानथोर ॥ ४ ॥ अग्नीनें आळलें भूमंडळ । लोकांस राहावया जालें स्थळ । दीप दीपिका नाना ज्वाळ । जेथें तेथें ॥ ५ ॥

वाटतें (१८–२३). पृथ्वीवर चहूंकडे उदक धांवतें तेव्हां त्याचा ध्वनिही किती सुंदर असतो, धो धो धारा पडतात, जागोजाग डोह व तळीं तुडुंब भरून वाहतात, कालवे व पाट मंदध्वनीनें धांवतात. कित्येक नद्या पालथ्या वाहतात, त्यांच्या जवळपास कोठेंही जरा खणलें कीं पाणी वाहूं लागतें. पृथ्वीच्या पोटांतून निर्झरोदकाचे पाट म्ह० सुंदर झरे सैरावैरा धांवतात. भूगर्भांत मोठाले जलाशय भरले आहेत, ते कोणी पाहिलेले किंवा ऐकलेलेही नसतात. कोठें कोठें वीज पडून झोविरे म्ह० झरे निघाले आहेत. पृथ्वीच्या खालीं आंत, वर पाणीच पाणी भरलें आहे. स्वर्ग, मृत्यु, पाताळ ह्या तीनही लोकांत एकच महानदी भरून वाहत आहे. मेघोदकाची अंतराळांतून वृष्टि होते (२४–२९). पृथ्वीचें मूळ पाणी, पाण्याचें मूळ अग्नि, अग्नीचें मूळ वायु, वायूहून परमेश्वर (आकाश, अंतरात्मा) हा महद्भूतांचा विचार झाला. त्याहूनही परात्पर परब्रह्म थोर आहे (३०–३१). [द० १६, स० ४]

हा वैश्वानर परम धन्य होय. हा श्रीरामचंद्राचा सासरा म्ह० जानकीदेवीचा पिता होय. हा विश्वव्यापक विश्वंभर आहे. ज्याच्या मुखें भगवान् हविषान्न ग्रहण करितात, यज्ञयागादि प्रसंगानें तो ऋषींना सुफलदायक होतो, असा हा विश्वाचा भर्ता तम (अंधकार), हिम (थंडी) व रोग यांचें निवारण करणारा आहे. वर्णादि अनेक भेद असले तरी सर्व जीवांना व ब्रह्मादिकांनाही हा अभेद म्ह० एकरूप आहे. अग्नीमुळें सृष्टि चालते, लोक भोजन करून तृप्त होतात व अग्नि (अंगांत) आहे म्हणून जिवंत राहातात. अग्नीनें आळून हा भूगोल उभा केला म्हणून जीवांना राहावया स्थळ मिळालें, लहान मोठे दीप व ज्वाळ अग्नीमुळेंच मिळतात. पोटांत जठराग्नि आहे

पोटामध्यें जठराग्नी । तेणें क्षुधा लागे जनीं । अग्नीकरितां भोजनीं । रुची येते ॥ ६ ॥ अग्नी सर्वांगीं व्यापक । उष्णें राहे कोणी येक । उष्ण नस्तां सकळ लोक । मरोन जाती ॥ ७ ॥ आधीं अग्नी मंद होतो । पुढें प्राणी तो नासतो । ऐसा हा अनुभव येतो । प्राणिमात्रांसी ॥ ८ ॥ असतां अग्नीचें बळ । शत्रु जिंके तावत्काळ । अग्नी आहे तावत्काळ । जिणें आहे ॥ ९ ॥ नाना रस निर्माण जाले । अग्नीकरितां निपजले । महारोगी आरोग्य जाले । निमिषमात्रें ॥ १० ॥ सूर्य सकळांहून विशेष । सूर्याउपरी अग्निप्रकाश । रात्रभागीं लोक अग्नीस । साहें करिती ॥ ११ ॥ अंत्यजगृहींचा अग्नी आणिला । त्यास दोष नाहीं बोलिला । सकळां गृहीं पवित्र जाला । वैश्वानरु ॥ १२ ॥ अग्निहोत्र नाना याग । अग्नीकरितां होती सांग । अग्नी तृप्त होतां मग । सुप्रसन्न होतो ॥ १३ ॥ देव दानव मानव । अग्नीकरितां चाले सर्व । सकळ जनांसी उपाव । अग्नी आहे ॥ १४ ॥ लग्नें करिती थोर थोर । नाना दारूचा प्रकार । भूमंडळीं यात्रा थोर । दारूनें शोभती ॥ १५ ॥ नाना लोक रोगी होती । उष्ण औषधें सेविती । तेणें लोक आरोग्य होती । वन्हीकरितां ॥ १६ ॥ ब्राह्मणास तनुमनु । सूर्यदेव हुताशनु । येतद्विषईं अनुमानु । कांहींच नाहीं ॥ १७ ॥ लोकामध्यें जठरानळु । सागरीं आहे वडवानळु । भूगोळाबाहेर आवरणानळु । शिवनेत्रीं विद्युल्लता ॥ १८ ॥ कुपीपासून अग्नी होतो । उंचदर्पणीं अग्नी निघतो । काष्ठमथनीं प्रगटतो । चकमकेनें ॥ १९ ॥ अग्नी सकळां ठाईं आहे । कठीण घिसणीं प्रगट होय । आग्यासर्पें दग्ध होये । गिरीकंदरें ॥ २० ॥ अग्नीकरितां नाना उपाय । अग्नीकरितां

म्हणून भूक लागते, अग्नि आहे म्हणून अन्नाला रुचि येते. अग्नि सर्वांगीं भरला आहे. उष्णता आहे तोंवर लोक जगतात, उष्णता गेली कीं मरतात. अग्निमांद्य आलें कीं लोक मृत्युमार्गाला लागतात याचा अनुभव सर्वांना येतो. अग्नीच्या बळावर शत्रूंना मारतां येतें, अग्नि आहे तोंवरच जगणें आहे (१–९). अनेक प्रकारचे औषधीरस अग्नीपासून निर्माण झाले असून त्यांच्या साह्यानें मोठमोठे रोगी तत्काळ आरोग्यता पावले आहेत. सर्वश्रेष्ठ सूर्य, सूर्यावर अग्निप्रकाश आहे, अंधाऱ्या रात्रीं अग्नीचें साह्य होतें. अंत्यजाच्या घराहून अग्नि आणला तरी त्याला दोष नाहीं, स्वयंपवित्र अग्नि सर्व गृहीं पावनच आहे. यज्ञयाग, अग्निहोत्रें अग्नीमुळेंच चालतात, अग्नि तृप्त झाला कीं प्रसन्न होतो. देवदानवमानवांचे सारे व्यवहार अग्नीस्तव होतात. मोठमोठाल्या लग्नांतून किंवा यात्रादि महोत्सवप्रसंगीं दारुकाम उडवितात; तो सारा अग्नीचाच प्रताप आहे. पुष्कळ रोगी उष्ण औषधांनीं निरोगी होतात. अग्नीमुळेंच आरोग्य आहे. ब्राह्मणांचें तनमन (सर्वस्वी) सूर्य व अग्नि हे होत यांत शंका नाहीं. प्राण्यांत जठरानल, समुद्रांत वडवानळ, पृथ्वीबाहेर आवरणानळ व शिवनेत्रीं विद्युल्लता हीं सारीं अग्नीचीं रूपें होत. कुपीपासून (बाटलीपासून का कांचेपासून?) अग्नि उत्पन्न होतो, आरशांतून अग्नि प्रकट होतो, काष्ठमंथनानें (लांकडावर लांकूड घांसल्यानें) किंवा चकमक झाडल्यानें अग्नि उत्पन्न होतो. अग्नि सर्वत्र आहे पण घर्षणानें प्रकट होतो. आग्या सर्पाच्या फूत्कारांनीं डोंगर पेटतात. अग्नीपासून उपाय व अपाय दोन्ही होतात, विचारावांचून सर्व व्यर्थ होय. पृथ्वीवर

नाना अपाय । विवेकेंविण सकळ होय । निरर्थक ॥ २१ ॥ भूमंडळीं लहानथोर । सकळांस वन्हीचा आधार । अग्निमुखें परमेश्वर । संतुष्ट होये ॥ २२ ॥ ऐसा अग्नीचा महिमा । बोलिजे तितुकी उणी उपमा । उत्तरोत्तर अगाध महिमा । अग्निपुरुषाचा ॥ २३ ॥ जीत असतां सुखी करी । मेल्यां प्रेत भस्म करी । सर्वभक्षकु त्याची थोरी । काय म्हणोनी सांगावी ॥ २४ ॥ सकळ सृष्टीचा संहार । प्रळय करी वैश्वानर । वैश्वानरें पदार्थमात्र । कांहीं उरेना ॥ २५ ॥ नाना होम उदंड करिती । घरोघरीं वैश्वदेव चालती । नाना क्षेत्रीं दीप जळती । देवापासीं ॥ २६ ॥ दीपाराधनें नीरांजनें । देव वोवाळिजे जनें । खरें खोटें निवडणें । दिव्य होतां ॥ २७ ॥ अष्टधा प्रकृती लोक तिन्ही । सकळ व्यापून राहिला वन्ही । अगाध महिमा वदनीं । किती म्हणोन बोलावा ॥ २८ ॥ चारी शृंगें त्रिपदीं जात । दोनी शिरें सप्त हात । ऐसा बोलिला शास्त्रार्थ । प्रचीतीविण ॥ २९ ॥ ऐसा वन्ही उष्णमूर्ति । तो मी बोलिलों यथामती । न्यूनपूर्ण क्षमा श्रोतीं । केलें पाहिजे ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्य-संवादे अग्नीनिरूपणनाम समास पंचम ॥ ५ ॥

॥ श्रीराम ॥ धन्य धन्य हा वायुदेव । याचा विचित्र स्वभाव । वायोकरितां सकळ जीव । वर्तती जनीं ॥ १ ॥ वायोकरितां श्वासोछ्वास । नाना विद्यांचा अभ्यास । वायोकरितां शरीरास । चळण घडे ॥ २ ॥ चळण वळण प्रसारण । निरोधन आणी आकुंचन । प्राण अपान व्यान उदान ।

लहानथोर सर्वांनाच अग्नीचा आधार आहे, अग्निमुखानें परमेश्वर प्रसन्न होतो. असा अग्नीचा महिमा थोर आहे, उपमा द्यावी ती कमीच पडते; उत्तरोत्तर (विवेक करावा तसतसा) महिमा अधिकच वाढत जातो (१०–२३). मनुष्य जिवंत आहे, तोंवर नाना सुखें देतो, मेल्यावर जाळून भस्म करितो. त्या सर्वभक्षकाची थोरवी काय सांगावी? सर्व सृष्टीचा संहार प्रळयाग्नि करितो. अग्नीपुढें कोणताच पदार्थ उरत नाहीं. होम, वैश्वदेव, क्षेत्रांतले देवापुढचे दिवे, दीपमाळा, निरांजनें, खरेंखोटें निवडण्याचीं दिव्यें सारीं अग्निमुळें होतात. अष्टधाप्रकृति व ब्रह्मांड अग्नि व्यापून राहिला आहे. अग्नीला चार शिंगें, तीन पाय, दोन शिरें व सात हात आहेत असें शास्त्रानें अग्नीचें वर्णन केलें आहे तें काय प्रचीतीवांचून केलें आहे? अशा उष्णतारूप अग्नीचें यथामति वर्णन केलें आहे (२४–३०). [द० १६, स० ५]

हा वायुदेव धन्य होय. याचा स्वभाव विचित्र आहे. हा आहे म्हणून जीव जगांत वागतात, श्वासोच्छ्वास करितात, शरीराची हालचाल किंवा विद्याभ्यासादि व्यापार करितात. चलन, वलन, धावन, प्रसारण व आकुंचन; प्राण, अपान, व्यान, उदान व समान; नाग, कूर्म, कृकल, देवदत्त व धनंजय असे वायूचे स्वभाव अनेक आहेत. (चलन म्ह० चालणें, वलन म्ह० वळणें, धावन म्ह० धावणें, प्रसारण म्ह० पसरणें, आकुंचन म्ह० आंखुडणें हीं वायूचीं पांच तत्वें किंवा धर्म आहेत. आतां वायूचें प्राणपंचक पाहा — प्राण हा जीवाच्या हृदयस्थानीं राहतो. दिवसरात्र २१६०० श्वासोच्छ्वास

समान वायु ॥ ३ ॥ नाग कूर्म कृकल वायो । देवदत्त धनंजयो । ऐसे हे वायोचे स्वभावो । उदंड असती ॥ ४ ॥ वायो ब्रह्मांडीं प्रगटला । ब्रह्मांडदेवतांस पुरवला । तेथुनी पिंडीं प्रगटला । नाना गुणें ॥ ५ ॥ स्वर्गलोकीं सकळ देव । तैसेचि पुरुषार्थी दानव । मृत्यलोकींचे मानव । विख्यात राजे ॥ ६ ॥ नरदेहीं नाना भेदे । अनंत भेदाचीं श्वापदें । वनचरें जळचरें आनंदें । क्रीडा करिती ॥ ७ ॥ त्या समस्तांमध्यें वायु खेळे । खेचरकुळ अवघें चळे । उठती वन्हीचे उबाळे । वायोकरितां ॥ ८ ॥ वायो मेघाचें भरण भरी । सवेंच पिटून परतें सारी । वायोऐसा कारभारी । दुसरा नाहीं ॥ ९ ॥ परी ते आत्मयाची सत्ता । वर्ते शरीरीं तत्वता । परी व्यापकपणें या समर्था । तुळणा नाहीं ॥ १० ॥ गिरीहून दाट फौजा । मेघ उठिले लोककाजा । गर्जगर्जों तडक विजा । वायोबळें ॥ ११ ॥ चंद्र सूर्य नक्षत्रमाळा । ग्रहमंडळें मेघमाळा । ये ब्रह्मांडीं नाना कळा । वायोकरितां ॥ १२ ॥ येकवटलें तें निवडेना । कालवलें तें वेगळें होयेना । तैसें हे बेंचाड नाना । केंवी कळे ॥ १३ ॥ वायो सुटे सरारां । असंभाव्य पडती गारा । तैसे जीव हे नीरा- । सरिसे पडती ॥ १४ ॥ वायुरूपें कमळकळा । तोचि आधार जळा । तया जळाच्या आधारें भूगोळा । शेषें धरिलें ॥ १५ ॥ शेषास पवनाचा आहार । आहारें फुगे शरीर । तरी मग घेतला भार । भूमंडळाचा ॥ १६ ॥ महाकूर्माचें शरीर भलें । ब्रह्मांड पालथें घातलें । येवढें शरीर तें राहिलें । वायोचेनी ॥ १७ ॥

हें याचें कर्म. अपान गुदस्थानीं राहतो व मळाचा उत्सर्ग हें याचें कर्म. व्यान सर्वांगीं राहतो व देहांतील साऱ्या सांध्यांस मागें पुढें करणें, हें याचें कर्म. उदान कंठस्थानीं राहतो व अन्नरसाचे विभाग करणें, हितानामक नाडींतून उचकी उत्पन्न करणें, स्वप्न पाडणें हीं याचीं कर्में. समान नाभिस्थानीं राहतो व नाड्यांच्या द्वारें अन्न रोमरोमांत पोंचवणें हें याचें कर्म. नागादि पंच उपप्राण आहेत. नागापासून ढेंकर येतो, कूर्मापासून डोळ्यांची उघडझांप होते, कृकलापासून शिंक येते, देवदत्तापासून जांभई येते व धनंजय शरीर पुष्ट करितो व प्रेतांत असून त्यास फुगवतो). वायु आधीं ब्रह्मांडांत प्रगट झाला व ब्रह्मांडदेवतांस पुरून मग नानाविध पिंडांत नानाप्रकारें प्रगट झाला (१–५). स्वर्गींचे देव, प्रतापी दानव, राजापासून रंकापर्यंत सारे मानव, नानाविध श्वापदें, आनंदानें क्रीडा करणारे वनचर, जळचर, खेचर इ० सर्व प्राण्यांत वायु खेळत असतो. अग्नीचे लोट (उमाळे, उबाळे) वायूपासून उत्पन्न होतात. वायु मेघांत वाफ भरून तयार करितो व वायूच त्यांना ढकलून पाणी पाडतो व पुन्हां रिकामे करितो. वायूसारखा कारभारी दुसरा कोणीच नाहीं. आत्म्याच्या सत्तेनेंच वायु शरीरांत नाना खेळ करितो, पण व्यापकपणांत वायूची बरोबरी कोणीच करीत नाहीं. गिरिशिखरावरून लोकांच्या कार्यासाठीं मेघांच्या फौजा उठून विजांचा कडकडाट करितात. तो सारा वायूचा प्रताप होय. चंद्र, सूर्य, नक्षत्रमाळा, तारांगणें, मेघमंडळें हीं सारीं वायुमुळेंच (६–१२). पंचभूतांचा जो हा खिचडा झाला आहे कीं ज्यांतून तीं वेगवेगळीं करून दाखवितां येत नाहींत – तें सारें बेंचाड (जुंबाड, कालवाकालव) वायूमुळेंच होय. सोसाट्याचा वारा सुटतो, प्रचंड गारांची वृष्टि होते, व पर्जन्यांतून असंख्य गारा पडतात. वायुरूप कमळकळा हा जळाचा आधार आहे, व जळाच्या आश्रयानें शेषानें भूगोल शिरावर धारण केला आहे. शेष वायु भक्षण करून पुष्ट होतो व म्हणून भूगोलधारणास समर्थ होतो. महाकूर्माचें शरीर वायूमुळेंच प्रचंड होऊन त्यानें ब्रह्मांड पालथें घातलें. वराहानें पृथ्वी दंतांवर धरिली हें सामर्थ्य

वाराहें आपुले दंतीं । पृथ्वी धरिली होती । तयाची येवढी शक्ती । वायुबळें ॥ १८ ॥ ब्रह्मा विष्णु महेश्वर । चौथा आपण जगदेश्वर । वायोस्वरूप विचार । विवेकी जाणती ॥ १९ ॥ तेतिस कोटी सुरवर । अठ्यासी सहस्र ऋषेश्वर । सिद्ध योगी भारेंभार । वायोकरितां ॥ २० ॥ नव कोटी कात्यायणी । छपन्न कोटी चामुंडिणी । औट कोटी भूतखाणी । वायोरूपें ॥ २१ ॥ भूतें देवतें नाना शक्ती । वायोरूप त्यांच्या व्यक्ती । नाना जीव नेणों किती । भूमंडळीं ॥ २२ ॥ पिंडीं ब्रह्मांडीं पुरवला । बाहेर कंचुकास गेला । सकळां ठाई पुरवला । समर्थ वायु ॥ २३ ॥ ऐसा हा समर्थ पवन । हनुमंत जयाचा नंदन । रघुनाथस्मरणीं तनमन । हनुमंताचें ॥ २४ ॥ हनुमंत वायोचा प्रसिद्ध । पित्यापुत्रास नाहीं भेद । म्हणोनी दोघेहि अभेद । पुरुषार्थविषीं ॥ २५ ॥ हनुमंतास बोलिजे प्राणनाथ । येणें गुणें हा समर्थ । प्राणेंविण सकळ व्यर्थ । होत जातें ॥ २६ ॥ मागें मृत्य आला हनुमंता । तेव्हां वायो रोधला होता । सकळ देवांस अस्थावस्ता । प्राणांत मांडले ॥ २७ ॥ देव सकळ मिळोन । केलें वायूचें स्तवन । वायो प्रसन्न होऊन । मोकळें केलें ॥ २८ ॥ म्हणोनि प्रतापी थोर । हनुमंत ईश्वरी अवतार । याचा पुरुषार्थ सुरवर । पाहतचि राहिले ॥ २९ ॥ देव कारागृहीं होते । हनुमंतें देखिलें अवचितें । संव्हार करूनी लंकेभोंवतें । विटंबून पाडिले ॥ ३० ॥ उसिणें घेतलें देवांचें । मूळ शोधिलें राक्षसांचें । मोठें कौतुक पुच्छकेताचें । आश्चर्य वाटे ॥ ३१ ॥ रावण होता सिंहासनावरी । तेथें

वायूचेंच. हरिहरब्रह्मा व चौथा अंतरात्मा हे वायुरूप आहेत — हें विवेकवंतांना ठाऊक आहे. तेहतीस कोटी देव, अठ्ठ्यांयशीं सहस्र ऋषीश्वर, सिद्ध, योगी हे सारे पुरे वायुरूप आहेत; नऊ कोटी कात्यायनी, छपन्न कोटी चामुंडिणी, साडेतीन कोटी भूतयोनींतले प्राणी, भूतें, दैवतें अनेक शक्ति वायुरूपच आहेत. आणि ह्या ब्रह्मांडीं किती जीव वायुरूप आहेत हें कोणीं सांगावें ? पिंडीं व ब्रह्मांडीं भरून ब्रह्मांडाबाहेर त्याला आवरण (कंचुक) करणारा हा समर्थ वायु सर्वस्थळीं भरून राहिला आहे (१३–२३). असा हा वायु परम समर्थ आहे. त्याचा पुत्र हनुमान, हनुमानानें तनमन रामचरणीं अर्पिलें. बापासारखाच प्रसिद्ध व तसाच पराक्रमी. हा पुत्र बापाहून अणुभर कमी नाहीं, दोघे अगदीं अभेद एकरूप आहेत. दोघेही पुरुषार्थी. हनुमंताला प्राणनाथ म्हणतात यावरून याचें सामर्थ्य सिद्ध आहे. (मारुतीराय जन्मल्याबरोबर सूर्यबिंब ग्रासायला धांवले तेव्हां इंद्रानें त्याजवर वज्र फेकलें. तें वज्र हनुवटीला लागलें तेव्हां) हनुमंताचा मृत्यूच जवळ आला असें वाटलें होतें. मारुतीनें ब्रह्मांडाचा प्राण रोधून धरिला होता. सर्व देव घाबरले होते, त्यांनीं मारुतीचें स्तवन केलें तेव्हां ब्रह्मांडाचा प्राण मोकळा झाला, म्हणून हनुमंत महाप्रतापी आहेत. ईश्वराचा अवतारच ते. देव त्यांचा पराक्रम पाहून थक्क झाले. देव रावणाच्या बंदिवासांत पडले होते तें पाहून हनुमंताला करुणा आली व त्यांनीं लंकेला वेढा देऊन राक्षसांचा संहार केला व त्यांची दुर्दशा केली. याप्रमाणें देवांचा छळ केल्याबद्दल राक्षसांचें उट्टें काढलें, त्यांचें मूळ शोधून फडशा पाडिला. ऊर्ध्वपुच्छ अशा मारुतिरायाची धन्यता वाटते. सिंहासनावर बसलेल्या गर्विष्ठ रावणाला ठोसे मारून

जाऊन ठोंसरे मारी । लंकेमध्यें निरोध करी । उदक कैंचें ॥ ३२ ॥ देवास आधार वाटला । मोठा पुरुषार्थ देखिला । मनामध्यें रघुनाथाला । करुणा करिती ॥ ३३ ॥ दैत्य अवघे संव्हारिले । देव तत्काळ सोडिले । प्राणिमात्र सुखी जाले । त्रैलोक्यवासी ॥ ३४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे वायो-स्तवननिरूपणनाम समास षष्ठ ॥ ६ ॥

॥ श्रीराम ॥ पृथ्वीचें मूळ जीवन । जीवनाचें मूळ अग्न । अग्नीचें मूळ पवन । मागां निरोपिलें ॥ १ ॥ आतां ऐका पवनाचें मूळ । तो हा अंतरात्माचि केवळ । अत्यंतचि चंचळ । सकळांमध्यें ॥ २ ॥ तो येतो जातो दिसेना । स्थिर होऊन बैसेना । ज्याचें रूप अनुमानेना । वेदश्रुतीसी ॥ ३ ॥ मूळीं मूळींचें स्फुरण । तेंचि अंतरात्म्याचें लक्षण । जगदेश्वरापासून त्रिगुण । पुढें जाले ॥ ४ ॥ त्रिगुणापासून जालीं भूतें । पावलीं पष्ट दशेतें । त्या भूतांचें स्वरूप तें । विवेकें वोळखावें ॥ ५ ॥ त्यामध्यें मुख्य आकाश । चौ भूतांमध्यें विशेष । याच्या प्रकाशें प्रकाश । सकळ कांहीं ॥ ६ ॥ येक विष्णु महद्भूत । ऐसा भूतांचा संकेत । परंतु याची प्रचीत । पाहिली पाहिजे ॥ ७ ॥ विस्तारें बोलिलीं भूतें । त्या भूतांमध्यें व्यापक तें । विवरोन पाहातां येतें । प्रत्ययासी ॥ ८ ॥ आत्मयाच्या चपळपणापुढें । वायो तें किती बापुडें । आत्म्याचें चपळपण रोकडें । समजोन पाहावें ॥ ९ ॥ आत्म्यावेगळें काम चालेना । आत्मा दिसेना ना आडळेना । गुप्तरूपें विचार नाना । पाहोन सोडी ॥ १० ॥ पिंड ब्रह्मांड व्यापून धरिलें । नाना शरीरीं विलासलें । विवेकी जनासि भासलें । जगदंतरीं ॥ ११ ॥ आत्म्याविण देह

त्याची कणीक मऊ केली. लंकेला वेढा दिला किंवा प्राणनिरोध केला तेव्हां पाणी राहिलें नाहीं. आपला कैवारी आला असें वाटून देवांना धीर आला, त्यांनीं त्याचा पराक्रम पाहिला. तेव्हां त्याला आयुरारोग्य मिळावें म्हणून त्यांनीं मनांत परमात्मा राम त्याची प्रार्थना केली. मारुतिरायानें सारे दैत्य मारिले, देव बंधमुक्त केले व त्रैलोक्यांतील प्राणिमात्रांना सुखी केलें (२४–३४). [द० १६, स० ६]

पृथ्वीचें मूळ जळ, जळाचें अग्नि, व अग्निचें वायु व वायुचें मूळ अंतरात्मा — हा सकळांत असून अत्यंत चंचळ आहे. तो येतो जातो पण दिसत नाहीं, स्थिरही राहात नाहीं, त्याच्या रूपाचें श्रुतिशास्त्रालाही अनुमान होत नाहीं. ब्रह्माच्या ठिकाणीं मूळ स्फुरण झालें, तो आदिसंकल्प हेंच अंतरात्म्याचें स्वरूप होय. जगदीश्वर तो. त्यापासून पुढें सत्व, रज, तम, हे तीन गुण झाले. त्रिगुणापासून भूतें स्पष्टदशेला आलीं — त्या भूतांचें स्वरूप नीट जाणावें. पंचभूतांमध्यें चार भूतांपैकींही विषेश असें सर्वप्रकाशक आकाश होय. ‘ एको विष्णुर्महद्भूतम् ’ असें त्या आकाशाला (अंतरात्म्याला) म्हणतात. तें सर्वांत व्यापक असून विवरतां प्रत्ययास येतें (१–८). त्याच्या चपळपणापुढें वायूचा चपळपणा काय होय ? तो समजून घ्यावा. आत्मा दिसत नाहीं, सांपडत नाहीं, पण त्यावांचून कांहींच काम चालत नाहीं. तो गुप्त राहून सर्व विचार करितो. तो पिंडब्रह्मांडांत असून अनंत शरीरांत खेळून राहिला आहे. विवेकी लोक त्याला जगदंतरीं पाहतात. त्याच्यावांचून देह चालत

चालती । हें तों न घडे कल्पांतीं । अष्टधा प्रकृतीच्या व्यक्ती । रूपासी आल्या ॥ १२ ॥ मूळापासून सेवटवरी । सकळ कांहीं आत्माच करी । आत्म्यापैलीकडे निर्विकारी । परब्रह्म तें ॥ १३ ॥ आत्मा शरीरीं वर्तती । इंद्रियग्राम चेष्टविती । नाना सुखदुःखें भोगिती । देहात्मयोगें ॥ १४ ॥ सप्त-कंचुक हें ब्रह्मांड । त्यामध्यें सप्तकंचुक पिंड । त्या पिंडामध्यें आत्मा जाड । विवेकें वोळखावा ॥ १५ ॥ शब्द ऐकोन समजतो । समजोन प्रत्युत्तर देतो । कठीण मृदु सीतोष्ण जाणतो । त्वचेमध्यें ॥ १६ ॥ नेत्रीं भरोनी पदार्थ पाहणें । नाना पदार्थ परीक्षणें । उंच नीच समजणें । मनामध्यें ॥ १७ ॥ क्रूरदृष्टी सौम्यदृष्टी । कपटदृष्टी कृपादृष्टी । नाना प्रकारींच्या दृष्टी । भेद जाणे ॥ १८ ॥ जिव्हेमध्यें नाना स्वाद । निवडूं जाणे भेदाभेद । जें जें जाणे तें तें विशद । करुनी बोले ॥ १९ ॥ उत्तम अन्नाचे परिमळ । नाना सुगंध परिमळ । नाना फळाचे परिमळ । घ्राणइंद्रियें जाणे ॥ २० ॥ जिव्हेनें स्वाद घेणें बोलणें । पाणीइंद्रियें घेणें देणें । पादइंद्रियें येणें जाणें । सर्वकाळ ॥ २१ ॥ शिस्नइंद्रियें सुरतभोग । गुदइंद्रियें मळोत्सर्ग । मनेंकरूनी सकळ सांग । कल्पून पाहे ॥ २२ ॥ ऐसे व्यापार परोपरी । त्रिभुवनीं येकलाचि करी । त्याची वर्णावया थोरी । दुसरा नाहीं ॥ २३ ॥ त्यावीण दुसरा कैंचा । जे महिमा सांगावा तयाचा । व्याप आटोप आत्मयाचा । न भूतो न भविष्यति ॥ २४ ॥ चौदा विद्या चौसष्टी कळा । धूर्तपणाच्या नाना कळा । वेदशास्त्रपुराणजिव्हाळा । तेणेंविण कैंचा ॥ २५ ॥ येहलोकींचा आचार । परलोकीं सारासारविचार । उभय लोकींचा निर्धार । आत्माच करी ॥ २६ ॥ नाना मतें नाना भेद । नाना संवाद विवाद । नाना निश्चय भेदाभेद । आत्माच करी ॥ २७ ॥ मुख्य तत्व विस्तारलें । तेणें तयास रूप आणिलें । येणेंकरितां सार्थक जालें । सकळ कांहीं ॥ २८ ॥ लिहिणें वाचणें

नाहीं. अष्टधाप्रकृतीपासून झालेले अनंत जीव त्याच्यामुळें प्रत्यक्ष दिसत आहेत. मूळमायेपासून शेवटपर्यंत (एखाद्या जीवदेहापर्यंत) सर्व कांहीं आत्माच करितो. त्याच्यापलीकडे फक्त निर्विकार परब्रह्म आहे. आत्मा शरीरांत वर्तती, इंद्रियांना चालविती, देहसंगतीनें अनेक सुखदुःखें भोगतो—सप्तकंचुक पिंड व तसेंच ब्रह्मांड या सर्वांत आत्मा श्रेष्ठ आहे. तो विवेकानें ओळखून घ्यावा, तो शब्द ऐकतो, त्यांचा अर्थ समजतो, समजून उत्तर देतो; त्वचेनें कठिण शीत उष्ण जाणतो, डोळे भरून पदार्थ पाहतो, त्यांची परिक्षा करितो, त्यांत श्रेष्ठ कनिष्ठ जाणतो; नेत्रांत क्रूरता, सौम्यता, कापट्य, दया इ० वृत्तिभेद त्याला दिसतात (९–१७). जिव्हा, घ्राण, गुद, शिस्न यांचे त्रैलोक्यांत एकलाच व्यापार करितो (१८–२३). त्याचा व्याप आटोप अवर्णनीय आहे. सर्व विद्या, कला, इहलोकींचा व्यापार व परलोकींचा विचार जाणतो. नाना मतें, नाना भेद, संवाद विवाद, सर्वांचा निर्णय तोच करितो. मुख्य तत्त्व म्ह० महत्तत्त्व (अंतरात्मा) याचा विस्तार झाला म्हणून त्याच्या रूपाबद्दल एवढें सांगतां आलें. लिहिणें वाचणें, धरणें सोडणें, सुखदुःख,

पाठांतर करणें । पुसणें सांगणें अर्थ करणें । गाणें वाजवणें नाचणें । आत्याचकरितां ॥ २९ ॥ नाना सुखें आनंदतो । नाना दुःखें कष्टी होतो । देह धरितो आणी सोडितो । नाना प्रकारें ॥ ३० ॥ येकलाचि नाना देह धरी । येकलाचि नटे परोपरी । नट नाट्य कळा कुसरी । त्यावीण नाहीं ॥ ३१ ॥ येकलाचि जाला बहुरूपी । बहुरूपी बहुसाक्षपी । बहुरूपें बहुप्रतापी । आणी लंडी ॥ ३२ ॥ येकलाचि विस्तारला कैसा । पाहे बहुविध तमासा । दंपत्येंविण कैसा । विस्तारला ॥ ३३ ॥ स्त्रियांस पाहिजे पुरुष । पुरुषासी पाहिजे स्त्रीवेष । ऐसा आवडीचा संतोष । परस्परें ॥ ३४ ॥ स्थूळाचें मूळ तें लिंग । लिंगामध्यें हे प्रसंग । येणेंप्रकारें जग । प्रत्यक्ष चाले ॥ ३५ ॥ पुरुषांचा जीव स्त्रियाची जीवी । ऐसी होते उठाठेवी । परी या सूक्ष्माची गोंवी । समजली पाहिजे ॥ ३६ ॥ स्थूळाकरितां वाटे भेद । सूक्ष्मीं अवघेंचि अभेद । ऐसें बोलणें निरुद्ध । प्रत्ययास आलें ॥ ३७ ॥ बायकोनें बायकोस भोगिलें । ऐसें नाहीं कीं घडलें । बायकोस अंतरीं लागलें । ध्यान पुरुषाचें ॥ ३८ ॥ स्त्रीसी पुरुष पुरुषास वधु । ऐसा आहे हा संमधु । याकारणें सूक्ष्म संवादु । सूक्ष्मींच आहे ॥ ३९ ॥ पुरुषइच्छेमध्यें प्रकृती । प्रकृतीमध्यें पुरुषव्यक्ती । प्रकृतीपुरुष बोलती । येणें न्यायें ॥ ४० ॥ पिंडावरून ब्रह्मांड पाहावें । प्रचीतीनें प्रचीतीस घ्यावें । उमजेना तरी उमजावें । विवराविवरों ॥ ४१ ॥ द्वैतइच्छा होती मूळीं । तरी ते आली भूमंडळीं । भूमंडळीं आणी मूळीं । रुजु पाहावें ॥ ४२ ॥ येथें मोठा जाला साक्षेप । फिटला श्रोतयांचा आक्षेप । जें प्रकृतीपुरुषाचें रूप । निवडोन गेलें ॥ ४३ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे महद्भूतनिरूपणनाम समास सप्तम ॥ ७ ॥

नटनाट्य, कलाकुसरी सर्व त्याचे विलास आहेत. अनेक देहांत एकलाच नटतो, असा हा बहुरूपी, बहुरंगी आहे. प्रतापी तोच व लंडी (भित्रा) तोच. एकलाच विस्तारला आहे, व त्याची मौज तोच पाहतो. तो दंपत्यभावावांचून विस्तारला आहे. स्त्रीस पुरुष व पुरुषास स्त्री पाहिजे, म्हणजे परस्पर आनंद होतो; पण लिंगभेदामुळें स्थूल शरीरांत स्त्रीपुरुष हा भेद आहे, एरवी दोनी ठिकाणीं अभेदानें तो एकलाच नांदत आहे. पुरुषांचा जीव (आत्मा) व स्त्रियांची जीवी (आत्मी) असें अज्ञ जीव बोलतात; पण याचा सूक्ष्म विचार पाहिला पाहिजे. स्थूलाच्या दृष्टीनें भेद वाटतो. पण सूक्ष्मांत साराच अभेद आहे, हें बोलणें निश्चित प्रत्ययास येतें. स्त्री स्त्रीस भोगीत नाहीं, तिच्या अंतरीं पुरुषाचें ध्यान असतें व पुरुषास स्त्रीचें ध्यान असतें, म्हणून सूक्ष्मांत खोल विचार करून पाहावा. पुरुषाच्या इच्छेंत प्रकृति व प्रकृतीच्या इच्छेंत पुरुष आहे. पिंडावरून ब्रह्मांड पाहावें, प्रचीतीनें प्रचीति घ्यावी, कळेना तरी पुनः पुन्हां मनन करावें. द्वैतइच्छा मूळमायेंतच आहे (मूळमाया प्रकृतिपुरुषात्मक आहे) म्हणूनच ती स्थूल पिंडांतही तशीच दिसते. भूमंडळीं जीवसृष्टींत स्त्रीपुरुष हा भेद दिसतो तो मूळांतही तसाच आहे हा हिशेब पाहावा. थोर विचाराचा साक्षेप केला पाहिजे. प्रकृतिपुरुषांचें रूप येथें स्पष्ट झाल्यानें श्रोत्यांचें शंकानिरसन झालें (२४–४३). [द० १६, स० ७]

॥ श्रीराम ॥ नमूं गणपती मंगळमूर्ती । जयाचेनि मतिस्फूर्ती । लोक भजती स्तवन करिती । आत्मयाचें ॥ १ ॥ नमूं वैखरी वागेश्वरी । अभ्यंतरीं प्रकाश करी । नाना भरोवरी विवरी । नाना विद्या ॥ २ ॥ सकळ जनांमध्यें नाम । रामनाम उत्तमोत्तम । श्रम जाउनी विश्राम । चंद्रमौळी पावला ॥ ३ ॥ नामाचा महिमा थोर । रूप कैसें उत्तरोत्तर । परात्पर परमेश्वर । त्रैलोक्यधर्ता ॥ ४ ॥ आत्माराम चहूंकडे । लोक वावडे जिकडे तिकडे । देह पडे मृत्य घडे । आत्मयाविण ॥ ५ ॥ जीवात्मा शिवात्मा परमात्मा । जगदात्मा विश्वात्मा गुप्तात्मा । आत्मा अंतरात्मा सूक्ष्मात्मा । देवदानवमानवीं ॥ ६ ॥ सकळ मार्ग चालती बोलती । अवतार-पंगतीची गती । आत्म्याकरितां होत जाती । ब्रह्मादिक ॥ ७ ॥ नादरूप ज्योतिरूप । साक्षिरूप सत्तारूप । चैतन्यरूप सस्वरूप । द्रष्टारूप जाणिजे ॥ ८ ॥ नरोत्तमु वीरोत्तमु । पुरुषोत्तमु रघोत्तमु । सर्वोत्तमु उत्तमोत्तमु । त्रैलोक्यवासी ॥ ९ ॥ नाना खटपट आणी चटपट । नाना लटपट आणी झटपट । आत्मा नस्तां सर्व सपाट । चहूंकडे ॥ १० ॥ आत्म्याविण वेडें कुडें । आत्म्याविण मडें बापुडें । आत्म्याविण थडें रोकडें । शरीराचें ॥ ११ ॥ आत्मज्ञानी समजे मनीं । पाहे जनीं आत्मयालागुनी । भुवनीं अथवा त्रिभुवनीं । आत्म्याविणें वोस ॥ १२ ॥ परम सुंदर आणी चतुर । जाणे सकळ सारासार । आत्म्याविण अंधकार । उभय लोकीं ॥ १३ ॥ सर्वांगीं सिद्ध सावध । नाना भेद नाना वेध । नाना खेद आणी आनंद । तेणेंचि-करितां ॥ १४ ॥ रंक अथवा ब्रह्मादिक । येकचि चालवी अनेक । पाहावा नित्यानित्यविवेक । कोणीयेकें ॥ १५ ॥ ज्याचे घरीं पद्मिणी नीरा । आत्मा

मंगळमूर्ती गणेश, जो बुद्धिप्रेरक असून ज्याचे गुणानुवाद सारे लोक गात आहेत त्या अंतरात्म्याला नमन असो. अंतरीं बुद्धिप्रकाश देणाऱ्या व नाना विद्यांचें विवरण करण्यास स्फूर्ति देणाऱ्या सरस्वतीला वंदन असो. सर्व जगांत रामनाम हें श्रेष्ठ आहे, तें घेऊन शंकरांच्या अंगाचा दाह कमी होऊन त्यांना आराम मिळाला. नामाचें माहात्म्य व रूप उत्तरोत्तर चढतें प्रत्ययास येतें, परात्पर परमेश्वर, त्रैलोक्यधर्ता आत्माराम चहूंकडे भरला आहे असा अनुभव येतो. प्राणिमात्र वावरतात तिथें तिथें हा आहेच–त्यावांचून देह मढें होय. शिवात्मा, परमात्मा, जगदात्मा, विश्वात्मा, सूक्ष्मात्मा, इ० नांवें अंतरात्म्याचींच आहेत–देवदानवमानवांत तोच एक वावरतो, सर्वसामान्यांच्या व्यवहारांत व अवतारी महात्म्यांच्या कृत्यांत तोच कर्ता आहे. ब्रह्मादिक त्याच्यामुळें होतात जातात (१–७). नाद, ज्योति, साक्षित्व, सत्ता, सर्व त्याजकडे–नरोत्तम, वीरोत्तम, पुरुषोत्तम, रघूत्तम, सर्वोत्तम सर्व कांहीं तो आहे. सर्व खटपटी व चळवळी त्याच्या. तो नाहीं अशी कल्पना केल्यास सर्व सपाट, शून्य, जड होईल. आत्मा नाहीं तर नुसतें मढें, थडगें होय. आत्मज्ञानी पुरुष जनीं त्याला पाहतात. त्रैलोक्य त्यावांचून शून्य होय. अमका मोठा सुंदर, चतुर व सारासारविचारी आहे असें आपण म्हणतों पण आत्मा अंतरीं आहे म्हणून हें बोलणें. सिद्ध, सावध, वेधक, सुखदुःखभोक्ता हे आरोप त्याच्यामुळें होतात. ब्रह्मदेवापासून रंकापर्यंत सर्वांना तो

तंवरी आवडी धरी। आत्मा गेलियां शरीरीं। तेज कैंचें ॥ १६ ॥ आत्मा दिसेना ना भासेना। बाह्याकारें अनुमानेना। नाना मनाच्या कल्पना। आत्मयाचेनी ॥ १७ ॥ आत्मा शरीरीं वास्तव्य करी। आवघें ब्रह्मांड विवरी भरी। वासना भावना परोपरी। किती म्हणोनी सांगाव्या ॥ १८ ॥ मनाच्या अनंत वृत्ती। अनंत कल्पना धरिती। अनंत प्राणी सांगों किती। अंतर त्यांचें ॥ १९ ॥ अनंत राजकारणें धरणें। कुबुद्धी सुबुद्धी विकरणें। कळों नेदणें चुकावणें। प्राणिमात्रांसी ॥ २० ॥ येकास येक जपती टपती। येकास येक खपती लपती। शत्रूपणाची स्थिती गती। चहुंकडे ॥ २१ ॥ पृथ्वीमध्यें परोपरीं। येकास येक सिंतरी हारी। कितेक भक्त परोपरी। परोपकार करिती ॥ २२ ॥ येक आत्मा अनंत भेद। देहपरत्वें घेती स्वाद। आत्मा ठाईंचा अभेद। भेदही धरी ॥ २३ ॥ पुरुषास स्त्री पाहिजे। स्त्रीस पुरुष पाहिजे। नवरीस नवरी पाहिजे। हें तो घडेना ॥ २४ ॥ पुरुषाचा जीव स्त्रियांची जीवी। ऐसी नाहीं उठाठेवी। विषयसुखाची गोंवी। तेथें भेद आहे ॥ २५ ॥ ज्या प्राण्यास जो आहार। तेथेंचि होती तत्पर। पशूचे आहारीं नर। अनादरें वर्तती ॥ २६ ॥ आहारभेद देहभेद। गुप्त प्रगट उदंड भेद। तैसाचि जाणावा आनंद। वेगळाला ॥ २७ ॥ सिंधुभूगर्भीचीं नीरें। त्या नीरांमधील शरीरें। आवरणोदकाचीं जळचरें। अत्यंत मोठीं ॥ २८ ॥ सूक्ष्म दृष्टीं आणितां मना। शरीराचा अंत लागेना। मग तो अंतरात्मा अनुमाना। कैसा येतो ॥ २९ ॥ देहात्मयोग शोधून पाहिला। तेणें कांहीं अनुमानला। स्थूळ सूक्ष्माचा गलबला। गथागोंवी ॥ ३० ॥

एकला चाळवितो. याचा प्रत्यय आत्मज्ञानी जनांना असतो. पति सुंदरीवर आसक्त असतो पण तिच्या देहांत आत्माराम नांदत आहे तोंवरच; तो गेल्यावर ती सुंदरी नव्हे तें प्रेत होय (८–१६). आत्मा दिसत नाहीं, भासत नाहीं, बाहेरच्या बाजूनें पाहतां त्याचें अनुमान होत नाहीं, त्याच्या बळावरच नाना कल्पना मन करीत असतें, आत्मा शरीरांत राहतो व साऱ्या ब्रह्मांडाचा विचार करितो, नानाविध वासना व भावना करितो. अनंत प्राण्यांच्या अनंत कल्पना; राजकारण, सुबुद्धि, कुबुद्धि, गुप्त विचार, फसवणूक सर्व आत्म्यामुळें. एक एकास जपतात, टपतात, खपतात, लपतात, शत्रुत्वानें वागतात, कोणी दुसऱ्यांस फसवितात व कोणी परोपकारांत दंग असतात, पण या सर्व भेदमय कारभारांत आत्म्याचें अभेदत्व ढळत नाहीं. पुरुषास स्त्रीचें व स्त्रीस पुरुषाचें वेड असतें, पण विषयसुखाच्या गोडींत भेद असला तरी गोडी भोगणारा अंतरात्मा दोहींकडे एकच आहे. ज्या प्राण्याचा जो आहार तेथेंच तो तत्पर असतो, पशूचा जो आहार त्याविषयीं माणसें उदासीन असतात. आहारांत, देहांत, भोगांत, सुखानुभवांत भेद असतो पण सर्व भेदांत आत्मा अभेद एकरूपच वर्ततो. समुद्राच्या पोटांत अनंत प्राणी असतात त्यापेक्षां आवरणोदकांतलीं जळचरें फार मोठीं. सूक्ष्म दृष्टीनें पाहतां अपरिमित असंख्य शरीरें आहेत त्यांचा अंत लागत नाहीं मग त्या अनंताचा अंत कसा लागावा? देह आणि आत्मा यांच्या संयोगानें जीं जीं कार्यें दिसतात त्यांचा सूक्ष्म शोध घेतल्यानेंच अंतरात्म्याचें अनुमान होतें, नाहीं तर स्थूल व सूक्ष्म

गथागोंवी उगवाव्याकारणें । केलीं नाना निरूपणें । अंतरात्मा कृपाळुपणें । बहुतां मुखें बोलिला ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आत्माराम-निरूपणनाम समास अष्टम ॥ ८ ॥

॥ श्रीराम ॥ पृथ्वीमध्यें लोक नाना । त्यांस नाना उपासना । भावार्थे प्रवर्तले भजना । ठाईं ठाईं ॥ १ ॥ आपुल्या देवास भजती । नाना स्तुती स्तवनें करिती । जे ते निर्गुण म्हणती । उपासनेसी ॥ २ ॥ याचा कैसा आहे भाव । मज सांगिजेजी अभिप्राव । अरे हा स्तुतीचा स्वभाव । ऐसा आहे ॥ ३ ॥ निर्गुण म्हणिजे बहुगुण । बहुगुणी अंतरात्मा जाण । सकळ त्याचे अंश हें प्रमाण । प्रचीत पाहा ॥ ४ ॥ सकळ जनांसी मानावें तें । येका अंतरात्म्यास पावतें । अधिकारपरत्वें तें । मान्य कीजे ॥ ५ ॥ श्रोता म्हणे हा अनुमान । मूळीं घालावें जीवन । तें पावे पानोपान । हे सध्यां प्रचीती ॥ ६ ॥ वक्ता म्हणे तुळसीवरी । उदक घालावें पात्रभरी । वरी न थिरे निमिषभरी । भूमीस भेदे ॥ ७ ॥ थोरा वृक्षास कैसें करावें । सेंव्या पात्र कैसें न्यावें । याचा अभिप्राव देवें । मज निरोपावा ॥ ८ ॥ पर्जन्याचें उदक पडतें । तें तों मुळाकडे येतें । हाताचि पावेना तेथें । काय करिती ॥ ९ ॥ सकळास मूळ सांपडे । ऐसें पुण्य कैचें घडे । साधुजनाचे पवाडे । विवेकीं मन ॥ १० ॥

यांच्या गोंधळांत कांहीं कळायचें नाहीं. तो गोंधळ मोडावा. अंतरात्मा प्रत्ययास यावा यासाठीं हीं सगळीं निरूपणें चाललीं आहेत. तींसुद्धा अंतरात्म्यानेंच अनेक संतसज्जनांच्या मुखांनीं केलीं आहेत (१७–३१). [द० १६, स० ८].

प्रश्न—ह्या पृथ्वीमध्यें अनेक लोक आहेत व त्यांच्या अनेक उपासना आहेत. आपापल्या भावाप्रमाणें लोक ठायीं ठायीं पूज्यभाव ठेवून भजत असतात व जे ते ' आपला देव निर्गुण आहे, आपली उपासना निर्गुणाची आहे ' असें म्हणत असतात. याचा मेळ कसा घालायचा? उत्तर—अरे ! हा स्तुतीचा स्वभाव असाच असायचा. बरें, त्यांत कांहीं बिघडतें असें नाहीं. हें पहा. निर्गुण म्हणजे बहुगुण, व बहुगुणी आहे एक अंतरात्मा. सगळ्यांचे सगळे देव म्ह० सर्व उपास्यें त्याचेच अंश आहेत व कोणत्याही देवाची उपासना केली तरी ती तत्त्वतः त्या अंतरात्म्यालाच पावते. म्हणून कोणत्याही देवाला आपल्या अधिकाराप्रमाणें कोणीही भजला तरी सर्वांचें मूळ जो अंतरात्मा त्याचेंच तें भजन होत असल्यामुळें त्याला मान्यता द्यायला तुझें काय जातें? तात्पर्य, आपापल्या उपास्य देवांचें भजन करीत असतांना आम्ही निर्गुणाला भजतों असें सगळेच म्हणत असले तरी त्यांत हानि कोठें आहे? प्रश्न—निर्गुणाची उपासनाच श्रेष्ठ म्हणून तीच सर्वांनीं करावी, अनेक देवदेवतांच्या नादीं लागूं नये. वृक्षाच्या मूळाशीं पाणी घातलें कीं तें पानापानाला जातें, त्याप्रमाणें निर्गुणाची उपासना केली कीं त्यांत देवदेवता आल्याच. उत्तर—मी म्हणतों कीं तुळशीवर पाणी घातलें म्ह० तिच्या पानांवर व शेंड्यावर व कोठेंही पाणी घातलें तरी तें वर क्षणभरही न थारतां मूळाकडेच जातें, त्याप्रमाणें देवदेवतांची पूजा केली तरी मुख्य परमेश्वराला पावते. प्रश्न—लहान झाडांच्या वर पाणी घालतां आलें तरी वडासारख्या मोठ्या झाडांवर पाणी कसें घालतां येईल, कळशी शेंड्यापर्यंत कशी नेतां येईल? याचें वर्म मला सांगा. उत्तर—कळशी शेंड्यापर्यंत हात न पोंचल्यामुळें नेतां न आली तरी पर्जन्याचें उदक तर मोठ्या झाडांवर पडतेंना? तेंही मूळाकडेच धांवत येतें असें आपण पाहतों. सर्वांनाच मूळ सांपडेल असें कसें होईल? फार पुण्यसंग्रह पदरीं असल्याशिवाय मूळ सांपडत नाहीं.

तथापी वृक्षांचेन पडिपाडें । जीवन घालितां कोठें पडे । ये गोष्टीचें सांकडें । कांहींच नाहीं ॥ ११ ॥ मागील आशंकेचें निरसन । होतां जालें समाधान । आतां गुणास निर्गुण । कैसे म्हणती ॥ १२ ॥ चंचळपणें विकारलें । सगुण ऐसें बोलिलें । येर तें निर्गुण उरलें । गुणातीत ॥ १३ ॥ वक्ता म्हणे हा विचार । शोधून पाहावें सारासार । अंतरीं राहातां निर्धार । नांव नाहीं ॥ १४ ॥ विवेकेंचि तो मुख्य राजा । आणी सेवकाचें नांव राजा । याचा विचार समजा । विवाद खोटा ॥ १५ ॥ कल्पांतप्रळई जें उरलें । तें निर्गुण ब्रह्मसें बोलिलें । येर तें अवघेंचि जालें । मायेमध्यें ॥ १६ ॥ सेना शाहार बाजार । नाना यात्रा लहानथोर । शब्द उठती अपार । कैसे निवडावे ॥ १७ ॥ काळामध्यें पर्जन्यकाळ । मध्यरात्रीं होतां निवळ । नाना जीव बोलती सकळ । कैसे निवडावे ॥ १८ ॥ नाना देश भाषा मतें । भूमंडळीं असंख्यातें । बहु ऋषी बहु मतें । कैसीं निवडावीं ॥ १९ ॥ वृष्टि होतांच अंकुर । सृष्टिवरी निघती अपार । नाना तंतु लहानथोर । कैसें निवडावें ॥ २० ॥ खेचरें भूचरें जळचरें । नानाप्रकारींचीं शरीरें । नाना रंग चित्रविचित्रें । कैसीं निवडावीं ॥ २१ ॥ कैसें दृश्य आकारलें । नानापरीं विकारलें । उदंडचि पैसावलें । कैसें निवडावें ॥ २२ ॥ पोकळीमध्यें गंधर्वनगरें । नाना रंग लाहानथोरें । बहु व्यक्ति बहु प्रकारें । कैसीं निवडावीं ॥ २३ ॥

साधुजनांचीच विवेकी दृष्टि मूळाला जाऊन भिडते. तथापि वृक्षाच्या दृष्टान्तावरून हें स्पष्ट होतें कीं, पाणी कोठेंही घातलें तरी मूळाकडे जातें त्याप्रमाणें भक्तिभावानें देवदेवतांची उपासना केली तरी ती मुख्य परमात्म्याला पोंचते (१–१२). प्रश्न — लोक सगुणाला निर्गुण कसें म्हणतात तें सांगा. निर्गुणाच्या ठिकाणीं प्रथम स्फूर्ति (चंचळपणा) झाली तें सगुण. गुणाच्या पलीकडे निर्गुण आहेच आहे. उत्तर — तें खरें आहे. सारासारविचार पाहावा. असार टाकून सार म्ह० शाश्वत परब्रह्म घ्यावें म्ह० ‘ तत्वमसि ’ बोधानें ब्रह्माशीं ऐक्यत्वाचा निर्धार झाल्यावर सगुण व निर्गुण हा भेदच उरत नाहीं, पण या नांवांचा तेथें पत्ता काय लागणार ! हें विवेकाचें काम आहे. सेवकाचें नांव ‘ राजा ’ ठेवलें म्हणून तो कांहीं खरा राजा होत नाहीं. ही कौतुकाची भाषा आहे, त्याप्रमाणें सगुणालाच निर्गुण म्हटल्यानें सगुण कांहीं निर्गुण होत नाहीं, कोणीं कौतुकानें तसें म्हटलेंच तर त्यांत कांहीं हानीही नाहीं. कल्पांतप्रळय झाल्यावर जें उरतें तें निर्गुण ब्रह्म, त्यावेगळें सारें मायेंत येतें (१३–१६). सगुण व निर्गुण यांचा विवेक फार सूक्ष्म आहे, शब्दांपलीकडचा आहे. आतां जगांत अनेक उपासना (संप्रदाय, पंथ, धर्म) असल्या तरी शब्दांत जोंवर घोंटाळताहेत तोंवर त्यांत निवडानिवड करीत कोणीं बसावें ! मतामतांचा गलबला हा चालतच असतो. लष्कर, दाटवस्तीचें शहर, किंवा बाजार यांत अनंत शब्द उठत असतात, पण त्या गलबल्यांतील शब्द निवडायचे कसे व त्यांचा विचार करायचा कसा ? मोठा मुसळधार पाऊस पडून मध्यरात्रीं जरा निवांत झालें कीं अनेक जीवांच्या बोलण्याचे शब्द ऐकूं येतात ते शब्द कसे निवडायचे ? ह्या पृथ्वीवर अनेक देश, अनेक भाषा, अनेक ऋषींचीं व अनेक विचारवंतांचीं अनेक मतें आहेत त्यांत निवड कशी करायची ? खेचर, भूचर, जळचर अशा अनेक प्राण्यांचीं अनेक भिन्नभिन्न प्रकारचीं चित्रविचित्र रंगांचीं व विविध आकृतींचीं अनंत शरीरें आहेत त्यांत निवड काय करावी ? पहिला पाऊस पडल्यावर सर्वत्र सृष्टींत जमिनींतून अनंत प्रकारचे अंकुर बाहेर पडतात त्यांत काय निवड करणार ? पंचभूतत्रिगुणांची सृष्टि मूळमायेंतून प्रगटतेला येत येत अनंत विकारांनीं विस्तार पावली आहे त्यांत काय काय निवडावें ? आकाशांत गंधर्वनगरें म्ह० लहानमोठ्या आकारांच्या अनंत आकृति उत्पन्न झालेल्या दिसतात त्यांत कशा प्रकारची

दिवसरजनीचे प्रकार । चांदिणें आणी अंधकार । विचार आणी अविचार । कैसा निवडावा ॥ २४ ॥ विसर आणी आठवण । नेमस्त आणी बाष्कळपण । प्रचीत आणी अनुमान । येणें रीती ॥ २५ ॥ न्याय आणी अन्याय । होय आणी न होय । विवेकेंविण काय । उमजो जाणे ॥ २६ ॥ कार्यकर्ता आणी निकामी । शूर आणी कुकर्मी । धर्मी आणी अधर्मी । कळला पाहिजे ॥ २७ ॥ धनाढ्य आणी दिवाळखोर । साव आणी तस्कर । खरें खोटें हा विचार । कळला पाहिजे ॥ २८ ॥ वरिष्ठ आणी कनिष्ठ । भ्रष्ट आणी अंतरनिष्ठ । सारासारविचार पष्ट । कळला पाहिजे ॥ २९ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे नानाउपासनानिरूपणनाम समास नवम ॥ ९ ॥

॥ श्रीराम ॥ पंचभूतें चाले जग । पंचभूतांची लगबग । पंचभूतें गेलियां मग । काय आहे ॥ १ ॥ श्रोता वक्तयास बोले । भूतांचे महिमे वाढविले । आणि त्रिगुण कोठें गेले । सागा स्वामी ॥ २ ॥ अंतरात्मा पांचवें भूत । त्रिगुण त्याचें अंगभूत । सावध करूनियां चित्त । बरें पाहे ॥ ३ ॥ भूत म्हणिजे जितुकें जालें । त्रिगुण जाल्यांत जालें । इतुकेन मूळ खंडलें । आशंकेचें ॥ ४ ॥ भूतांवेगळें कांहीं नाहीं । भूतजात हें सर्वही । येकावेगळें येक कांहीं । घडेचिना ॥ ५ ॥ आत्म्याचेन जाला पवन । पवनाचेन प्रगटे अग्न । अग्नीपासून जीवन । ऐसें बोलती ॥ ६ ॥ जीवन अवघें डबाबिलें । तें रविमंडळें आळलें । वन्हीवायोचेन जालें । भूमंडळ ॥ ७ ॥

निवड करायची ? दिवस आणि रात्र, प्रकाश आणि अंधकार, विचार आणि अविचार, स्मरण आणि विस्मरण, नेमस्तपणा आणि बाष्कळता, प्रचीति व अनुमान (अनुभव व तर्क), न्याय आणि अन्याय, होय आणि न होय (होतें आणि होत नाहीं, आहे आणि नाहीं, होणारें जाणारें आणि शाश्वत), असा खिचडा सृष्टींत सर्वकाळ चाललाच आहे. विवेकावांचून सत्य कळायचें आहे काय ? कार्यकर्ता आणि निकामी पुरुष, शूर आणि विषयकिंकर ; धर्मिष्ठ आणि धर्मलंड, धनाढ्य आणि दिवाळखोर, सभ्य आणि चोर, सत्य व असत्य, वरिष्ठ आणि कनिष्ठ, भ्रष्ट आणि अंतर्निष्ठ, यांचा तरतमभाव स्पष्ट कळला पाहिजे. तात्पर्य, सृष्टींत विविधत्व सर्वत्र भरलेलें आहे, त्यांतच नानाविध संप्रदायउपासनांचीही विविधता आहे. विविधत्व हें सारें मायेंतील आहे, असार आहे. तें विवेकानें टाकून देऊन सार, शाश्वत, निर्गुण स्वीकारावें (१७–२९). [द० १६, स० ९]

पंचभूतांच्या योगेंकरून जग चालतें, सारी चळवळ त्यांची आहे. पंचभूतें गेल्यावर मग काय आहे ? यावर कोणी शंका काढील, ' भूतांची एवढी प्रतिष्ठा सांगतां मग गुणांचें महत्त्व कांहींच नाहीं काय ? ' याला उत्तर असें आहे – आकाश म्ह० अंतरात्मा हें पांचवें भूत आहे व त्रिगुण त्याचे अंगभूत आहेत अर्थात् त्रिगुणांचा अंतर्भाव आकाशांतच होतो शिवाय ' भूत ' झाले (भू–होणें) ते त्रिगुण झालेल्यांत आहेत अर्थात् त्यांचा समावेश भूतांतच होतो. म्हणून पंचभूतांवेगळें कांहीं नाहीं, सर्व भूतात्मक आहे असें वर म्हटलें तेंच यथार्थ आहे. एकाशिवाय एक होत नाहीं असा भूतांचा परस्परसंबंध आहे. आत्म्यापासून आकाश, त्यापासून वायु, वायूपासून अग्नि, अग्नीपासून आप असें झालें आहे. सारें पाणीच डबाबलें (भरलें होतें) तें सूर्यतेजानें आळलें, तेव्हां त्याची वायु व अग्नि यांच्या साह्यानें पृथ्वी झाली. वन्हि, वायु व रवि

वन्ही वायो रवी नस्ता । तरी होते उदंड सीतळता । ते सीतळतेमध्यें उष्णता । येणें न्यायें ॥ ८ ॥ अवघें वर्मासी वर्म केलें । तरीच येवढें फांपावलें । देहमात्र तितुकें जालें । वर्माकरितां ॥ ९ ॥ अवघें सीतळचि असतें । तरी प्राणिमात्र मरोन जातें । अवघ्या उष्णेंचि करपतें । सकळ कांहीं ॥ १० ॥ भूमंडळ आळोन गोठलें । तें रविकिरणें वाळोन गेलें । मग सहजचि देवें रचिलें । उपायासी ॥ ११ ॥ म्हणोन केला पर्जन्यकाळ । थंड जालें भूमंडळ । पुढें उष्ण कांहीं सीतळ । सीतकाळ जाणावा ॥ १२ ॥ सीतकाळें कष्टले लोक । कर्पोन गेले वृक्षादिक । म्हणोन पुढें कौतुक । उष्णकाळाचें ॥ १३ ॥ त्याहीमध्यें प्रातःकाळ । माध्यानकाळ सायंकाळ । सीतकाळ उष्णकाळ । निर्माण केले ॥ १४ ॥ ऐसें येकामागें येक केलें । विलेनें नेमस्त लाविलें । येणेंकरितां जगले । प्राणिमात्र ॥ १५ ॥ नाना रसें रोग कठीण । म्हणोनी औषधी केल्या निर्माण । परंतु सृष्टीचें विवरण । कळलें पाहिजे ॥ १६ ॥ देहमूळ रक्त रेत । त्या आपाचे होती दांत । ऐसीच भूमंडळीं प्रचीत । नाना रत्नांची ॥ १७ ॥ सकळांसी मूळ जीवन बांधा । जीवनें चाले सकळ धंदा । जीवनेंवीण हरिगोविंदा । प्राणी कैंचे ॥ १८ ॥ जीवनाचें मुक्ताफळ । शुक्रासारिखें सुढाळ । हिरे माणिकें इंद्रनीळ । तेजाळ जाले ॥ १९ ॥ महिमा कोणाचा सांगावा । जाला कर्दमुचि आघवा । वेगळवेगळु निवडावा । कोण्या प्रकारें ॥ २० ॥ परंतु बोलिलें कांहींयेक । मनास कळावया विवेक । जनांमध्यें तार्किक लोक । समजती अवघें ॥ २१ ॥ अवघें समजलें हें घडेना ।

नसते तर सर्वत्र पाण्याची थंडीच भरून राहिली असती, याप्रमाणें त्या शीतळतेंत उष्णता आली. एकाला एक वर्म आहे म्हणून सृष्टिविस्तार झाला आहे, व म्हणून पंचभूतात्मक देह झाले आहेत. सारी पाण्याची शीतळताच असती तर प्राणी थंडीनेंच कांकडून मेले असते, सारी उष्णताच असती तर सारें करपून गेलें असतें. पृथ्वी आळून घट्ट गोळा बनली ती सूर्यतेजानें वाळून निवाली व त्यावर पुन्हां उपाय म्हणून देवानें पर्जन्यकाळ उत्पन्न करून ती थंड केली. कांहीं उष्ण व कांहीं शीतळ असा मग हिंवाळा केला. थंडीनें प्राणी त्रासले व वृक्ष करपले म्हणून मग उन्हाळा केला. त्यांत पुन्हां सकाळ दुपार, संध्याकाळ असे तीन काळ करून उष्ण व शीतळ यांचें तारतम्य ठेवलें. याप्रमाणें एकामागें एक व्यवस्था केल्यामुळें जीव जगले आहेत, नानारससेवनानें कठिण रोग झाले म्हणून त्यावर तोड देण्यासाठीं औषधी निर्माण केल्या. याप्रमाणें एकापासून एक व एकाचें वर्म एक अशी सृष्टि कशी केली हें विचारानें पाहिलें पाहिजे (१–१६). देहाचें मूळ म्ह० (स्त्रीचें) रक्त व (पुरुषाचें) रेत – त्याच आपापासून दांत झाले आहेत. आपापासून अशींच रत्नें झालीं आहेत. सर्वांचें मूळ आप म्ह० जीवन—सर्व देह पाण्यापासून तयार झाले, त्यानेंच ते वाढले व जगले आहेत. जीवनावीण जीव कसचे जगतात ? शुक्राच्या चांदणीसारखीं मोत्यें, हिरे, माणकें पाण्यापासून झाल्यामुळेंच तेजाळ म्ह० कांतिमान् झालीं आहेत. उदकाचा महिमा सांगितला पण बाकीच्या भूतांचा महिमाही असाच थोर आहे. सृष्टि पंचभूतांच्या कर्दमापासून (कर्दम – चिखल, मिश्रण) झाली आहे. त्यांत भूतें परस्परापासून वेगळीं करून दाखवितां येत नाहींत, विचाराची दिशा दाखविली आहे; त्यावरून शहाण्यांनीं वर्म जाणावें (१७–२१). सर्व पूर्णत्वें कळणें कोणासच शक्य नाहीं, म्हणून तर विविध शास्त्रें

शास्त्राशास्त्रांसी पडेना । अनुमानें निश्चय होयेना । कांहींयेक ॥ २२ ॥ अगाध गुण भगवंताचे । शेष वर्णूं न शके वाचे । वेदविधी तेहि काचे । देवेंविण ॥ २३ ॥ आत्माराम सकळां पाळी । आवघें त्रैलोक्य सांभाळी । तया येकेंविण धुळी । होय सर्वत्रांची ॥ २४ ॥ जेथें आत्माराम नाहीं । तेथें उरो न शके कांहीं । त्रैलोकींचे प्राणी सर्वही । प्रेतरूपी ॥ २५ ॥ आत्मा नस्तां येती मरणें । आत्म्याविण कैचें जिणें । बरा विवेक समजणें । अंतर्यामीं ॥ २६ ॥ समजणें जें विवेकाचें । तेंही आत्म्यावीण कैचें । कोणीयेकें जगदीशाचें । भजन करावें ॥ २७ ॥ उपासना प्रगट जाली । तरी हे विचारणा कळली । याकारणें पाहिजे केली । विचारणा देवाची ॥ २८ ॥ उपासनेचा मोठा आश्रयो । उपासनेवीण निराश्रयो । उदंड केलें तरी जयो । प्राप्त नाहीं ॥ २९ ॥ समर्थाची नाहीं पाठी । तयास भलताच कुटी । याकारणें उठाउठी । भजन करावें ॥ ३० ॥ भजन साधन अभ्यास । येणें पाविजे परलोकास । दास म्हणे हा विश्वास । धरिला पाहिजे ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे गुणभूतनिरूपणनाम समास दशम ॥ १० ॥

परस्परांशीं पूर्णपणें मिळत नाहींत व म्हणून अनुमानानें (कारण शास्त्रें आनुमानिक आहेत) निश्चय होत नाहीं. भगवंताचे अगाध गुण शेषही वानूं शकत नाहीं, वेद व विधि (ब्रह्मदेव) सुद्धां वर्णन करण्यास असमर्थ आहेत (२२–२३). अंतरात्मा (नारायण) सर्वांचें पाळण करितो, सारें त्रैलोक्य सांभाळतो, त्यावांचून सारेच धुळीस मिळतील. आत्माराम नाहीं तेथें कांहींच राहात नाहीं, त्यावांचून त्रैलोक्यांतील सारे प्रेतरूप आहेत. तो नाहीं म्हणजे मृत्यु, तो आहे म्हणजे जगणें, याचा विचार पाहावा. विवेकाचें समजणें, हेंही आत्म्यामुळें; म्हणून त्या आत्मारामाचें – जगदीशाचें – भजन करावें. उपासना प्रगट झाली कीं हा आत्मविचार कळतो, म्हणून देव जो अंतरात्मा त्याचा विचार करावा. उपासनेचा आश्रय फार मोठा आहे, तिच्यावांचून जीव निराश्रित आहेत, पुष्कळ चळवळी केल्या पण उपासनेचें बळ नाहीं तर त्या निष्फळ होतात. समर्थ (आत्माराम) जर पाठीराखा केला नाहीं तर वाटेल तो (भूतें काय व मनाचे कामादि विकार काय) यथेच्छ ठोकतो म्हणून तात्काळ देवाला ओळखून त्याचें भजन करावें. भजन-साधनाच्या अभ्यासानें परलोकाची (प्रकृतिपर ब्रह्मस्थितीची) प्राप्ति होते, पण यावर श्रद्धा ठेवली पाहिजे (२४–३१). [द० १६, स० १०]

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ सार्थ श्रीदासबोध ॥

॥ दशक सतरावा प्रकृतिपुरुषांचा ॥ १७ ॥

॥ श्रीराम ॥ निश्चळ ब्रह्मीं चंचळ आत्मा । सकळांपर जो परमात्मा । चैतन्य साक्षी ज्ञानात्मा । षड्गुणैश्वरु ॥ १ ॥ सकळ जगाचा ईश्वरु । म्हणोनी नामें जगदीश्वरु । तयापासून विस्तारु । विस्तारला ॥ २ ॥ शिवशक्ति जगदीश्वरी । प्रकृतिपुरुष परमेश्वरी । मूळमाया गुणेश्वरी । गुणक्षोभिणी ॥ ३ ॥ क्षेत्रज्ञ द्रष्टा कूटस्थ साक्षी । अंतरात्मा सर्वलक्षी । शुद्धसत्व महत्तत्व परीक्षी । जाणता साधु ॥ ४ ॥ ब्रह्मा विष्णु महेश्वरु । नाना पिंडीं जीवेश्वरु । त्यास भासती प्राणीमात्र । लहानथोर ॥ ५ ॥ देहदेउळामध्यें बैसला । न भजतां मारितो देहाला । म्हणोनी त्याच्या भेणें तयाला । भजती लोक ॥ ६ ॥ जे वेळेसी भजन चुकलें । तें तें तेव्हां पछाडिलें । आवडीनें भजों लागले । विश्वजन ॥ ७ ॥ जें जें जेव्हां आक्षेपिलें । तें तें तत्काळाचि दिधलें । त्रैलोक्य भजों लागलें । येणें प्रकारें ॥ ८ ॥ पांचा विषयांचा नैवेद्य । जेव्हां पाहिजे तेव्हां सिद्ध । ऐसें न करितां सद्य । रोग होती ॥ ९ ॥ जेणें काळें नैवेद्य पावेना । तेणें काळें देव राहेना । भाग्य वैभव पदार्थ नाना । सांडून जातो ॥ १० ॥ जातो तो कळों देईना । कोणास ठाउक होयेना । देवेंविण अनुमानेना । कोणास देव ॥ ११ ॥

निश्चळ ब्रह्मापासून चंचळ आत्मा (मूळमाया) झाला. तो सकळां पर म्ह. पंचभूतें व त्रिगुण यांच्या पलीकडे आहे. त्याला परमात्मा, चैतन्य, साक्षी, ज्ञानात्मा, षड्गुणेश्वर अशीं नांवें आहेत. तो सर्व जगाचा ईश आहे म्हणून त्याला जगदीश्वर म्हणतात, त्यापासून सृष्टिविस्तार झाला आहे. शिवशक्ति, जगदीश्वरी, प्रकृतिपुरुष, मूळमाया, गुणमाया, क्षेत्रज्ञ, द्रष्टा, कूटस्थ, शुद्धसत्व, महत्तत्त्व इ० सर्व नांवें त्या चंचळ आत्म्याचीं म्ह० अंतरात्म्याचीं आहेत. तो ब्रह्मा, विष्णु, हर, अनंत पिंडांतील जीव, सर्व प्राणिमात्र यांना जाणतो (१–५). देहदेवळांत बसून जे देह त्याला भजत नाहींत त्यांना तो शिक्षा करितो म्हणून त्याच्या भयानें लोक त्याला भजतात; भजनांत कुचराई करणारांना तो ठोकतो म्हणून सारे लोक त्याच्यापुढें नमतात; बरें त्याच्यापाशीं जें जें मागावें तें तें तो देतो म्हणून प्राणिमात्र त्याला शरण जातात. शब्दादि पांच विषयांचा नैवेद्य त्याच्यासाठीं सर्वदा तयार ठेवावा लागतो; नाहींतर तो देहाच्या मागें नाना रोग लावून देतो. त्याला नैवेद्य मिळाला नाहीं कीं तो नाराज होऊन नानाप्रकारचे भोग्य पदार्थ, वैभव वगैरे सारे सोडून जातो. जातो तें कळूं देत नाहीं. कोणास समजत नाहीं, त्याशीं अनन्य झाल्यावांचून तो स्वतःचें रूप कोणास दाखवीत नाहीं. (याप्रमाणें अंतरात्मा बळात्कारानें आपला

देव पाहावयाकारणें । देउळें लागती पाहणें । कोठें तरी देउळाच्या गुणें । देव प्रगटे ॥ १२ ॥ देउळें म्हणिजे नाना शरीरें । तेथें राहिजे जीवेश्वरें । नाना शरीरें नाना प्रकारें । अनंत भेदें ॥ १३ ॥ चालतीं बोलतीं देउळें । त्यामध्यें राहिजे राउळें । जितुकीं देउळें तितुकीं सकळें । कळलीं पाहिजे ॥ १४ ॥ मत्स्य कूर्म वराह देउळें । भूगोळ धरिला सर्वकाळें । विक्राळें निर्मळें । कितियेक ॥ १५ ॥ कितेक देउळीं सौख्य पाहे । भरीतें अवघें सिंधु आहे । परी तें सर्वकाळ न राहे । अशाश्वत ॥ १६ ॥ अशाश्वताचा मस्तकमणी । जयाची येवढी करणी । दिसेना तरी काय जालें धणी । तयासीच म्हणावें ॥ १७ ॥ उद्भवोन्मुख होतां अभेद । विमुख होतां उदंड खेद । ऐसा अधोर्ध्व संवाद । होत जातो ॥ १८ ॥ सकळांचें मूळ दिसेना । भव्य भारी आणी भासेना । निमिष येक वसेना । येके ठाईं ॥ १९ ॥ ऐसा अगाध परमात्मा । कोण जाणे त्याचा महिमा । तुझी लीळा सर्वोत्तमा । तूंच जाणसी ॥ २० ॥ संसारा आलियाचें सार्थक । जेथें नित्यानित्यविवेक । इहलोक आणी परलोक । दोनी साधिले ॥ २१ ॥ मननसीळ लोकांपासीं । अखंड देव अहर्निशीं । पाहतां त्यांच्या पूर्वसंचितासी । जोडा नाहीं ॥ २२ ॥ अखंड योग म्हणोन योगी । योग नाहीं तो वियोगी । वियोगी तोही योगी । योगबळें ॥ २३ ॥ भल्यांची महिमा ऐसी । जे सन्मार्ग लावी लोकांसी । पोहणार असतां बुडतयासी । बुडों नेदावें ॥ २४ ॥ स्थूळसूक्ष्मतत्वझाडा ।

कार्यभाग साधून घेतो). तो देव भेटावा म्हणून देवळें पाहावीं लागतात, म्हणजे कोठें तरी (संतसद्गुरूच्या ठिकाणीं) तो प्रगटतो (त्याची ओळख पटते). देवळें म्ह० शरीरें व त्यांत जीवेश्वर राहतो; शरीरें अनेक व भिन्नभिन्न आहेत. चालत्या बोलत्या देवळांत देव (राऊळ) राहतो. सर्व देवळांत (शरीरांत) देव (अंतरात्मा) राहतो हें कळलें पाहिजे. मत्स्य, कूर्म, वराह, भूगोळावरील सर्व प्राणी, त्यांत कित्येक भयंकरही असतात, सर्वांत तो नांदत आहे. कित्येक देवळांत तो सौख्यच पाहतो इतकें कीं, जणूं काय समुद्राला भरतीच आली आहे, पण तें सुख सर्वकाळ टिकत नाहीं, अशाश्वत असतें. अनित्य सृष्टीच्या मस्तकावरचा मणि म्ह० मूळ पुरुष, ज्याची कृति एवढी थोर आहे असा हा अंतरात्मा डोळ्यांत दिसला नाहीं म्हणून काय झालें ?—त्यालाच जीवांनीं आपला धणी (मालक) मानलें पाहिजे. त्या सर्वांच्या उद्भवाकडे (मूळपुरुष, वडील त्याकडे) तोंड वळविलें कीं त्याचा आपला अभेद आहे, त्याच्याकडे पाठ फिरविली (विमुख झालों) कीं सारें दुःखच आहे, असा त्याच्या संबंधानें अध आणि ऊर्ध्व म्ह० सुख व दुःख यांचा संबंध आहे. सकळांचें मूळ (अंतरात्मा) दिसत नाहीं, व फार भव्य (सर्वव्यापी व प्रकाशरूप) असून भासत नाहीं, निमिषभरही कोठें स्थिर राहत नाहीं. असा हा परमात्मा अगाध आहे. त्याचा महिमा कोण जाणत असेल तो जाणे. सर्वोत्तमा ! तुझी लीला तुलाच ठाऊक (६–२०). नित्यानित्यविवेकानें इहलोक आणि परलोक (प्रपंच व परमार्थ) हे दोन्ही ज्यानें साधले त्याच्या जन्माचें सार्थक झालें. मननशील लोकांजवळ अखंड म्ह० अनाद्यनंत परमेश्वर अहर्निश असतो, नित्ययुक्त असतात—त्यांचें पूर्वपुण्य अगाध होय. देवाचा त्यांचा अखंड योग असतो म्हणून ते योगी खरे; योग नाहीं तो वियोगी म्ह० देवापासून दूर पडलेला असेल तोही योगबळानें (मननिदिध्यासबळानें) योगी (देवाशीं अखंड संयुक्त) होतो. असा मनुष्य भला खरा. कांकीं, तो इतरांनाही सन्मार्गाला (देवाच्या मार्गाला) लावतो. ज्याला पोहतां येतें त्यानें बुडणारास बुडूं देऊं नये. स्थूळ आणि

पिंडब्रह्माडाचा निवाडा । प्रचीत पाहे ऐसा थोडा । भूमंडळीं ॥ २५ ॥ वेदांतीचें पंचीकरण । अखंड तयाचें विवरण । महावाक्यें अंतःकरण । रहस्य पाहे ॥ २६ ॥ ये पृथ्वीमध्यें विवेकी असती । धन्य तयांची संगती । श्रवणमात्रें पावती गती । प्राणिमात्र ॥ २७ ॥ सत्संग आणी सच्छास्त्रश्रवण । अखंड होतसे विवरण । नाना सत्संग आणी उत्तम गुण । परोपकाराचे ॥२८॥ जे सत्कीर्तीचे पुरुष । ते परमेश्वराचे अंश । धर्मस्थापनेचा हव्यास । तेथेंचि वसे ॥ २९ ॥ विशेष सारासारविचार । तेणें होय जगदुद्धार । संगत्यागें निरंतर । होऊन गेले ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे देव-बळात्कारनाम समास प्रथम ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥ ब्रह्म निर्मळ निश्चळ । जसे गगन अंतराळ । निराकार केवळ । निर्विकारी ॥ १ ॥ अंतचि नाहीं तें अनंत । शाश्वत आणि सदोदित । असंत नव्हे तें संत । सर्वकाळ ॥ २ ॥ परब्रह्म तें अविनाश । जैसें आकाश अवकाश । न तुटे न फुटे सावकास । जैसें तैसें ॥ ३ ॥ तेथें ज्ञान ना अज्ञान । तेथें स्मरण ना विस्मरण । तेथें अखंड निर्गुण । निरावलंबीं ॥ ४ ॥ तेथें चंद्र सूर्य ना पावक । नव्हे काळोखें ना प्रकाशक । उपाधीवेगळें येक । निरोपाधी ब्रह्म ॥ ५ ॥ निश्चळीं स्मरण चेतलें । त्यास चैतन्य ऐसें कल्पिलें । गुणसमानत्वें जालें । गुणसाम्य ऐसें ॥ ६ ॥ गगनीं आली अभ्रच्छाया । तैसी जाणिजे मूळमाया । उद्भव आणी विलया । वेळ नाहीं ॥ ७ ॥

सूक्ष्म तत्त्वांचा झाडा करून पिंडब्रह्मांडाचा विचारानें निरास करून आत्मानुभव पाहणारा पुरुष विरळ होय. तो वेदांतील पंचीकरण म्ह० मूळमायेपासून पिंडापर्यंत सर्व सृष्टीचा नित्यविचार करून अंतरांतील देव महावाक्याच्या विवरणानें पाहात असतो. अशा विवेकी जनांची संगति धन्य होय. त्यांच्या मुखानें निरूपण ऐकून प्राणिमात्र उद्धरतात. तेथें सत्संग व सच्छास्त्रश्रवण घडून परोपकाराचे उदार गुण अंगीं जडतात. असे सत्कीर्तीचे पुरुष ते देवाचेच अंश होत, त्यांनाच धर्मस्थापनेची आवड असते. सारासारविवेकानें जीवांचा उद्धार होऊन असंगत्वानें ते स्वरूपाकार होतात (२१–३०). [द० १७, स० १]

आकाशासारखें ब्रह्म निश्चळ, निर्मळ, निराकार व निर्विकार आहे. तें अंत नाहीं म्हणून अनंत ; असंत (अशाश्वत) नाहीं म्हणून संत, सदोदित आहे तें अविनाश आहे ; आकाशासारखेंच फुटत नाहीं, तुटत नाहीं, सदोदित आहे तसें आहे. तेथें ज्ञान नाहीं व अज्ञानही नाहीं, स्मरण नाहीं व विस्मरणही नाहीं ; निरावलंबी म्ह० त्याला कशाचा आश्रय नाहीं म्ह० तें स्वयंभू आहे, अखंड आहे, निर्गुण आहे. तेथें सूर्यचंद्राग्नि नाहींत, तेथें प्रकाश नाहीं, व अंधारही नाहीं, असें तें द्वैतरहित, अद्वय, निरुपाधिक आहे म्ह० सकलउपाधिरहित आहे (१–५). त्या निश्चळीं चळण, स्मरण चेतलें – त्यावर चैतन्य अशी कल्पना केली तेथें सत्वरजतम हे त्रिगुण समान राहिले म्हणून त्याला गुणमाया असें नांव ठेविलें. तें स्मरण, चैतन्य किंवा चंचळ – त्यालाच मूळमाया म्हणतात. मूळमाया म्हणजे काय? आकाश निश्चळ असतां वर ढग पसरावे त्यांना पसरायला व नाहींसे व्हायलाही वेळ लागत नाहीं – तशी ब्रह्मीं मूळमायेचें आवरण उभें राहिलें. निर्गुणाच्या ठिकाणीं हा जो

निर्गुणीं गुणविकारु । तोचि षड्गुणेश्वरु । अर्धनारीनटेश्वरु । तयास म्हणिजे ॥ ८ ॥ आदिशक्ति शिवशक्ति । मूळीं आहे सर्वशक्ति । तेथून पुढें नाना व्यक्ती । निर्माण जाल्या ॥ ९ ॥ तेथून पुढें शुद्धसत्व । रजतमाचें गूढत्व । तयास म्हणिजे महत्तत्व । गुणक्षोभिणी ॥ १० ॥ मूळीं असेचिना व्यक्ती । तेथें कैंची शिवशक्ती । ऐसें म्हणाल तरीं चित्तीं । सावधान असावें ॥ ११ ॥ ब्रह्मांडावरून पिंड । अथवा पिंडावरून ब्रह्मांड । अधोर्ध्व पाहातां निवाड । कळों येतो ॥ १२ ॥ बीज फोडून आणिलें मना । तेथें फळ तों दिसेना । वाढत वाढत पुढें नाना । फळें येती ॥ १३ ॥ फळ फोडितां बीज दिसे । बीज फोडितां फळ नसे । तैसा विचार असे । पिंडब्रह्मांडीं ॥ १४ ॥ नरनारी दोनी भेद । पिंडीं दिसती प्रसिद्ध । मूळीं नस्तां विशद । होतील कैसीं ॥ १५ ॥ नाना बीजरूप कल्पना । तींत काय येक असेना । सूक्ष्म म्हणोनि भासेना । येकायेकीं ॥ १६ ॥ स्थूळाचें मूळ ते वासना । ते वासना आधीं दिसेना । स्थूळावेगळें अनुमानेना । सकळ कांहीं ॥ १७ ॥ कल्पनेची सृष्टी केली । ऐसीं वेदशास्त्रें बोलिलीं । दिसेना म्हणोन मिथ्या केली । न पाहिजेत कीं ॥ १८ ॥ पडदा येका जन्माचा । तेथें विचार कळे कैंचा । परंतु गूढत्व हा नेमाचा । ठाव आहे ॥१९॥ नाना पुरुषांचे जीव । नाना स्त्रियांचे जीव । येकचि परी देहस्वभाव । वेगळाले ॥ २० ॥ नवरीस नवरी नलगे । ऐसा भेद दिसों लागे । पिंडावरून उमगे । ब्रह्मांडबीज ॥ २१ ॥ नवरीचें मन नवऱ्यावरी ।

ढग – विकार त्यालाच मूळमाया, षड्गुणेश्वर, अर्धनारीनटेश्वर, आदिशक्ति, शिवशक्ति, इ० नांवें आहेत. त्या मूळमायेंतच पुढील सृष्टिरचनेची सर्वशक्ति – सर्वबीजें असून तिच्यापासूनच अनेक तत्त्वें आकारास आलीं. तेथून शुद्ध सत्व (यांतच रजतमही सूक्ष्मबीजरूपानें होते), महत्तत्त्व किंवा गुणमाया झाली. आतां मूळमायाच जर अव्यक्त आहे, तर तेथें शिवशक्ति कोठून आल्या असें म्हणाल तर सावधपणानें याचा विचार पाहावा (६–११). पिंडावरून ब्रह्मांड किंवा ब्रह्मांडावरून पिंड, खालून वर किंवा वरून खालीं कसाही विचार करून पाहा म्हणजे कळेल (आपण पिंडावरून ब्रह्मांडाचा विचार करीत शिवशक्तीपर्यंत जाऊं). आंब्याची कोय फोडून पाहिली तर तींत कांहीं फळ दिसत नाहीं, पण ती कोय जमिनींत लावून निगा राखून त्याचें मोठें झाड वाढविलें म्हणजें शेवटीं फळें येतात. फळ फोडून पाहिलें तर त्यांत बीज दिसतें, पण बीज फोडून पाहिलें तर त्यांत कांहीं फळ दिसत नाहीं – असाच पिंडब्रह्मांडाचा विचार करावा. स्त्रीपुरुष हा भेद पिंडांत दिसतो, पण मूळांत हा भेद नसता तर पिंडांत कोठून दिसता ? बीजरूप कल्पनेच्या पोटांत अनंत कल्पना असतात, त्या सूक्ष्म म्हणून भासत नाहींत इतकेंच. स्थूळाचें मूळ वासनेंत आहे (वासनेमुळेंच हा स्थूळ देह निर्माण होतो) पण वासना कोठें दिसते ? सांगायचें इतकेंच कीं स्थूळावरून सूक्ष्माची – दृष्टावरून अदृष्टाची – कल्पना करावी लागते. कल्पनेपासून सृष्टि झाली असें वेदशास्त्र सांगतात पण कल्पना दिसत नाहीं म्हणून वेदशास्त्रांचें सांगणें कांहीं खोटें नाहीं. एकेक जन्म हा एकेक पडदा आहे, म्हणून अनेक पडदे मध्यें आल्यामुळें आपणांस मूळाचा विचार कळत नाहीं, पण निश्चित रहस्यें अशींच गूढ असतात, तीं विवेकाशिवाय उमगत नाहींत. स्त्रीपुरुषांचे अनेक जीव आहेत पण देहस्वभाव भिन्नभिन्न आहेत. नवरीला नवरी नको असते, नवराच पाहिजे असतो हा पिंडांत नियम दिसतो ; यावरून ब्रह्मांडबीज जी मूळमाया तिचा विचार करा. नवरीचें मन नवऱ्यावर व

नवऱ्याचें मन नवरीवरी । ऐसी वासनेची परी । मूळींहून पाहावी ॥ २२ ॥ वासना मूळींची अभेद । देहसंमंधें जाला भेद । तुटतां देहाचा समंध । भेद गेला ॥ २३ ॥ नरनारीचें बीजकारण । शिवशक्तीमध्यें जाण । देह धरितां प्रमाण । कळों आलें ॥ २४ ॥ नाना प्रीतीच्या वासना । येकाचें येकास कळेना । तीक्ष्ण दृष्टीनें अनुमाना । कांहींसें येतें ॥ २५ ॥ बाळकास वाढवी जननी । हें तों नव्हे पुरुषाचेनी । उपाधी वाढे जयेचेनी । ते हे वनिता ॥ २६ ॥ वीट नाहीं कंटाळा नाहीं । आलस्य नाहीं त्रास नाहीं । इतुकी माया कोठेंचि नाहीं । मातेवेगळी ॥ २७ ॥ नाना उपाधी वाढवूं जाणे । नाना मायेनें गोंवूं जाणे । नाना प्रीति लावूं जाणे । नाना प्रपंचाची ॥ २८ ॥ पुरुषास स्त्रीचा विश्वास । स्त्रीस पुरुषाचा संतोष । परस्पर वासनेस । बांधोन टाकिलें ॥ २९ ॥ ईश्वरें मोठें सूत्र केलें । मनुष्यमात्र गुंतोन राहिलें । लोभाचें गुंडाळें केलें । उगवेना ऐसें ॥ ३० ॥ ऐसी परस्परें आवडी । स्त्रीपुरुषांची महागोडी । हे मूळींहून चालिली रोकडी । विवेकें पाहावी ॥ ३१ ॥ मूळीं सूक्ष्म निर्माण जालें । पुढें स्पष्ट दिसोन आलें । उत्पत्तीचें कार्य चाले । उभयतांकरितां ॥ ३२ ॥ मूळीं शिवशक्ती खरें । पुढें जालीं वधुवरें । चौऱ्यांसि लक्ष विस्तारें । विस्तारली जे ॥ ३३ ॥ येथें शिवशक्तीचें रूप केलें । श्रोतीं मनास पाहिजे आणिलें । विवरलियांविण बोलिलें । तें व्यर्थ जाणावें ॥ ३४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे शिवशक्तिनिरूपणनाम समास द्वितीय ॥ २ ॥

नवऱ्याचें नवरीवर अशी पिंडांत भिन्न वासना दिसते; तिचा पत्ता मूळमायेंत लावावा. वासना अभिन्न पण देहसंबंधामुळें भेद होतो, देहसंबंध सुटला कीं भेद गेला. पिंडांत नरनारींचा जो भेदसंबंध दिसतो तोच मूळमायेंत शिवशक्तिरूपानें सूक्ष्मतः असला पाहिजे असें स्थूळावरून सूक्ष्माकडे मागें जातां जातां आढळून येतें (१२–२४). प्रीतीच्या सूक्ष्म वासना अनेक असतात, त्या एकाच्या एकास कळत नाहींत, बारकाईनें विचार केला म्हणजे कांहींसें ध्यानांत येतें. आई बाळाला वाढविते, तें काम पुरुषाकडून होणार नाहीं. सारी उपाधि वाढते स्त्रीमुळेंच. आळस नाहीं, वीट नाहीं, कंटाळा नाहीं, त्रास नाहीं, ममता अत्यंत – हें आईवांचून कोणाच्याही हातून होणार नाहीं. अनेक उपाधि वाढवणें, मायेंत गोंवून ठेवणें, प्रेमप्रीतीनें प्रपंचाशीं बांधून टाकणें हें आईच करूं जाणे. पुरुषाचा विश्वास स्त्रीवर व स्त्रीच्या संतोषाचें स्थान पुरुष असें वासनेनें उभयतांस एकत्र बांधलें आहे. ईश्वरानें मोठें सूत्र केलें आहे व मनुष्यमात्रांस सोडवावयाला दुर्घट अशा प्रेमजाळांत गुंतविलें आहे. स्त्रीपुरुषांची ही परस्पर गोडी मूळांतून (मूळमायेपासूनच) चालत आली आहे, याचा प्रत्यक्ष अनुभव पाहावा. मूळमायेंत शिवशक्तिरूपानें सूक्ष्म भेद आहे तोच सृष्टींत पुढें चालला असून उत्पत्तिकार्य दोघांमुळें होत आहे. सूक्ष्मांत शिवशक्ति तीच स्थूळांत वधूवरें होतात. ८४ लक्ष योनि त्यामुळेंच निर्माण झाल्या आहेत. शिवशक्तीचें रूप येथें केलें आहे तें नीट विवरून पाहावें, मननाशिवाय ऐकणें व्यर्थ होय (२५–३४). [द० १७, स० २]

॥ श्रीराम ॥ थांबा थांबा ऐका ऐका । आधींच ग्रंथ सोडूं नका । सांगितलें तें ऐका । सावधपणें ॥ १ ॥ श्रवणामध्यें सार श्रवण । तें हें अध्यात्मनिरूपण । सुचित करून अंतःकरण । ग्रन्थामध्यें विवरावें ॥ २ ॥ श्रवणमननाचा विचार । निजध्यासें साक्षात्कार । रोकडामोक्षाचा उधार । बोलोंचि नये ॥ ३ ॥ नाना रत्नें परीक्षितां । अथवा वजनें करितां । उत्तम सोनें पुटीं घालितां । सावधान असावें ॥४॥ नाना नाणीं मोजून घेणें । नाना परीक्षा करणें । विवेकी मनुष्यासीं बोलणें । सावधपणें ॥ ५ ॥ जैसें लाखोलीचे धान्य । निवडून वेंचितां होतें मान्य । सगट मोजितां अमान्य । देव क्षोभे ॥ ६ ॥ येकांतीं नाजुक कारभार । तेथें असावें अतितत्पर । त्याच्या कोटिगुणें विचार । अध्यात्मग्रन्थीं ॥ ७ ॥ काहण्या कथा गोष्टी पवाड । नाना अवतारचरित्रें वाड । त्या समस्तांमध्यें जाड । अध्यात्मविद्या ॥ ८ ॥ गत गोष्टीसी ऐकिलें । तेणें काय हातास आलें । म्हणती पुण्य प्राप्त जालें । परी तें दिसेना कीं ॥ ९ ॥ तैसें नव्हे अध्यात्मसार । हा प्रचीतीचा विचार । कळतां अनुमानाचा संव्हार । होत जातो ॥ १० ॥ मोठे मोठे येऊन गेले । आत्म्याकरितांच वर्तले । त्या आत्म्याचा महिमा बोले । ऐसा कवणु ॥ ११ ॥ युगानुयुगें येकला येक । चालवितो तिनी लोक । त्या आत्म्याचा विवेक । पाहिलाच पाहावा ॥ १२ ॥ प्राणी आले येऊन गेले । ते जैसे जैसे वर्तले । ते वर्तणुकेचें कथन केलें । इच्छेसारिखें ॥ १३ ॥ जेथें आत्मा नाहीं दाट । तेथें अवघें सरसपाट । आत्म्याविण बापुडें काष्ठ । काय जाणे ॥ १४ ॥ ऐसें वरिष्ठ आत्मज्ञान ।

सांगतों तें नीट ऐकून मग ग्रंथ सोडा. सर्व श्रवणांत श्रेष्ठ श्रवण अध्यात्माचें होय. मन एकाग्र करून मग ग्रंथांतील तत्त्वांचें मनन करा. श्रवणाचें मनन करावें, मननाचा निदिध्यास (चिंतन) करावा व निदिध्यास होतां होतां साक्षात्कार होतो. मोक्ष उधारीचा नाहीं, प्रत्ययाचा तात्काळ अनुभव घेण्याचा आहे (१–३). नाना रत्नें, मोतीं, हिरे यांची परीक्षा किंवा वजन करितांना, सोनें मुशींत घालतांना मनुष्य सावध असतो, विवेकी पुरुषाशीं सावधपणानें बोलावें लागतें, लाखोलीचें धान्य बायका निवडून वाहतांना दक्षता ठेवतात; कां कीं न मोजतां तसेंच वाहिलें तर देवाचा राग होतो, एकांतांत कांहीं कारभाराच्या नाजुक गोष्टींबद्दल राजकारणी पुरुष अत्यंत सावधानता ठेवतात, त्याच्या कोटपट बुद्धीची सूक्ष्मता अध्यात्मग्रंथांचें विवरण करितांना लागत असते. काहण्या, कथा, गोष्टी, पवाडे, अवतारचरित्रें या सर्वांपेक्षां अध्यात्मविद्या श्रेष्ठ (जाड) आहे. मागें होऊन गेलेल्यांच्या कथा ऐकून आपल्या हातीं काय लागतें? पुण्य लागतें म्हणतात पण पुण्य कांहीं दिसत नाहीं. अध्यात्माचा प्रकार असा नाहीं. येथल्या येथें तात्काळ मोक्ष देणारें अध्यात्म होय. याच्या अनुभवाबरोबर अनुमानिक संशयाचें ज्ञान पार नाहींसें होतें (४–१०). मोठमोठ्यांनीं आत्मलाभाकरितांच प्रयास केले, त्या आत्म्याचा महिमा कोणी वर्णावा? युगानुयुगें जो एकला आत्मा त्रैलोक्य चालवीत आहे, त्या आत्म्याचा विचार करावा. सृष्टींत अनंत प्राणी आले व गेले, त्यांनीं जशी वर्तणूक केली तशी इच्छेप्रमाणें सांगून ठेविली. आत्म्यावीण सारें व्यर्थ होय. आत्म्यावीण प्राणी काष्ठवत् होय, तो काय जाणणार? असें आत्मज्ञान सर्व ज्ञानांत श्रेष्ठ होय, त्यासारखें दुसरें काय

दुसरें नाहीं या समान । सृष्टीमध्यें विवेकी सज्जन । तेचि हें जाणती ॥ १५ ॥ पृथ्वी आणी आप तेज । याचा पृथ्वीमध्यें समज । अंतरात्मा तत्वबीज । तें वेगळेंचि राहिलें ॥ १६ ॥ वायोपासून पैलीकडे । जो कोणी विवेकें पवाडे । जवळीच आत्मा सांपडे । तया पुरुषासी ॥ १७ ॥ वायो आकाश गुणमाया । प्रकृतिपुरुष मूळमाया । सूक्ष्मरूपें प्रचित येया । कठिण आहे ॥ १८ ॥ मायादेवीच्या धांदली । सूक्ष्मीं कोण मन घाली । समजला त्याची तुटली । संदेहवृत्ती ॥ १९ ॥ मूळमाया चौथा देह । जाला पाहिजे विदेह । देहातीत होऊन राहे । धन्य तो साधु ॥ २० ॥ विचारें ऊर्ध्व चढती । तयासीच ऊर्ध्व गती । येरां सकळां अधोगती । पदार्थज्ञानें ॥ २१ ॥ पदार्थ चांगले दिसती । परी ते सर्वेचि नासती । अतो भ्रष्ट ततो भ्रष्ट होती । लोक तेणें ॥ २२ ॥ याकारणें पदार्थज्ञान । नाना जिनसींचा अनुमान । सर्व सांडून निरंजन । धुंडीत जावें ॥ २३ ॥ अष्टांग योग पिंडज्ञान । त्याहून थोर तत्वज्ञान । त्याहून थोर आत्मज्ञाम । तें पाहिलें पाहिजे ॥ २४ ॥ मूळमायेचे सेवटीं । हरिसंकल्प मुळीं उठी । उपासनायोगें मिठी । तेथें घातली पाहिजे ॥ २५ ॥ मग त्यापैलीकडे जाण । निखळ ब्रह्म निर्गुण । निर्मळ निश्चळ त्याची खूण । गगनासारिखी ॥ २६ ॥ येथून तेथवरी दाटलें । प्राणिमात्रांस भेटलें । पदार्थमात्रीं लिगटलें । व्यापून आहे ॥ २७ ॥ त्याऐसें नाहीं थोर । सूक्ष्माहून सूक्ष्म विचार । पिंडब्रह्मांडाचा संव्हार । होतां कळे ॥ २८ ॥ अथवा पिंडब्रह्मांड असतां । विवेकप्रळय पाहों जातां । शाश्वत

आहे? विवेकी सज्जन त्याचें महत्त्व जाणतात (११–१५). पृथ्वी, आप, तेज यांचा पृथ्वींत समावेश केल्यावर (कांकीं त्यांना रूप आहे) आकाश (अंतरात्मा) वेगळेंच राहतें. तें सर्व तत्त्वांचें बीज आहे. वायुतत्त्वाच्या पलीकडचा जो कोणी विचार करील त्याला अंतरात्मा जवळच सांपडेल. वायु, पुढें आकाश, नंतर गुणमाया, नंतर प्रकृतिपुरुष म्हणजेच मूळमाया हीं उत्तरोत्तर सूक्ष्म आहेत व सूक्ष्मरूपेंच त्यांची प्रचीति घेतली पाहिजे. मायेच्या गोंधळांत सांपडलेले जीव इतक्या सूक्ष्मांत मन घालतांना फारसे दिसत नाहींत, पण जो विवेक समजून सूक्ष्मीं प्रवेश करील तो निःसंदेह होईल. मूळमाया हा ब्रह्मांडाचा चौथा देह आहे, त्याचा विवेकानें निरास झाला पाहिजे. सकल (अष्ट) देहातीत होऊन राहील तो साधु धन्य होय. जे विचारानें वर चढतील त्यांना उंच (ऊर्ध्व) गति मिळेल, इतर पदार्थज्ञानांत गुरफटलेल्यांना अधोगति होते. पदार्थ रमणीय दिसतात पण ते नाशवंत आहेत, म्हणून प्राणी धड इथें ना तिथें (देव ना संसार) असे विफलजन्म होतात. पदार्थज्ञान सारें अनुमानिक, म्हणून तें सर्व सोडून निरंजनाला धुंडावें. अष्टांगयोग व पिंडज्ञान खालचें, त्यापेक्षां तत्त्वज्ञान वरचें व तत्त्वांच्या विचारापेक्षां आत्मज्ञान श्रेष्ठ, सर्वोत्तम; म्हणून तें अवश्य पाहावें. मूळमायेच्या शेवटीं जें विमळब्रह्म (हरि) आहे, त्या हरीच्या ठिकाणीं जो आदिसंकल्प उठतो तेथें उपासनायोगानें सर्वस्वार्पण केलें पाहिजे. त्यापलीकडे निखळ ब्रह्म आहे, तें गगनासारखें निश्चळ व निर्मळ आहे. तें येथून तेथवर (मूळमायेपासून पिंडापर्यंत) घनदाट भरलें आहे. प्राणिमात्रांस व जड पदार्थांसही तें लिगटलें आहे. त्याहून थोर कोणीच नाहीं. अत्यंत सूक्ष्म विचारानें पिंडब्रह्मांडाचा (अष्टदेहांचा) निरास झाला कीं तें आकळतें; अथवा पिंड व ब्रह्मांड असतांही विवेकप्रळय पाहतां शाश्वत ब्रह्म कळून येतें. साऱ्या तत्त्वांचा झाडा करावा,

कोण हें तत्वतां । उमजों लागे ॥ २० ॥ करून अवघा तत्वझाडा । सारासाराचा निवाडा । सावधपणें ग्रंथ सोडा । सुखेंनैव ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे श्रवणनिरूपणनाम समास तृतीय ॥ ३ ॥

॥ श्रीराम ॥ बहुत जनांसी उपाय । वक्तयास पुसतां त्रासों नये । बोलतां बोलतां अन्वय । सांडूं नये ॥ १ ॥ श्रोत्यानें आशंका घेतली । ते तत्काळ पाहिजे फेडिली । स्वगोष्टीनें स्वगोष्टी पेंचली । ऐसें न व्हावें ॥ २ ॥ पुढें धरितां मागें पेंचला । मागें धरितां पुढें उडाला । ऐसा सांपडतचि गेला । ठाईं ठाईं ॥ ३ ॥ पोहणारचि गचक्या खातो । जनास कैसा काढूं पाहातो । आशय लोकांचा राहातो । ठाईं ठाईं ॥ ४ ॥ आपणचि बोलिला संव्हार । आपणचि बोलिजे सर्वसार । दुस्तर मायेचा पार । ठाकिला पाहिजे ॥ ५ ॥ जें जें सूक्ष्म नाम घ्यावें । त्याचें रूप बिंबवून द्यावें । तरीच वक्ता म्हणवावें । विचारवंत ॥ ६ ॥ ब्रह्म कैसें मूळमाया कैसी । अष्टधाप्रकृति शिवशक्ति कैसी । षड्गुणेश्वराची स्थिति कैसी । गुणसाम्याची ॥ ७ ॥ अर्धनारीनटेश्वर । प्रकृतिपुरुषाचा विचार । गुणक्षोभिणी तदनंतर । त्रिगुण कैसे ॥ ८ ॥ पूर्वपक्ष कोटून कोठवरी । वाच्यांश लक्ष्यांशाची परी । सूक्ष्म नाना विचार करी । धन्य तो साधु ॥ ९ ॥ नाना पाल्हाळीं पडेना । बोलिलेंचि बोलावेना । मौन्यगर्भ अनुमाना । आणून सोडी ॥ १० ॥ घडीं येक विमळ ब्रह्म । घडीं येक म्हणे सर्व ब्रह्म । द्रष्टा साक्षी सत्ता ब्रह्म । क्षण येक ॥ ११ ॥

सारासारविचारानें शुद्ध ब्रह्म तें ओळखावें आणि मग सावधपणें सुखेंनैव ग्रंथ सोडावा (१६–३०). [द० १७, स० ३]

बहुत जनांच्या उद्धाराचे मार्ग कोणते असें श्रोत्यांपैकीं कोणी वक्त्यास मध्येंच विचारलें तर त्यानें त्याचा त्रास (कंटाळा किंवा भय) मानूं नये व बोलतां बोलतां विषयाचा पूर्वापार संबंध सोडून बोलूं नये. श्रोत्यानें कसलीही शंका घेतली तर त्यानें समाधान केलें पाहिजे. आपण सांगितलेल्या एका गोष्टीनें दुसरी गोष्ट आपणास नडली असें होऊं नये. पुढें धरिला तर मागें पेंचांत सांपडला किंवा मागें धरिला तर पुढें उडाला असा जागोजाग वक्ता सांपडत गेला तर श्रोत्यांनीं काय करावें ? पोहणाराच गटांगळ्या खाऊं लागला तर तो दुसऱ्यांस (बुडणारांस) कसा तारील ? असें होऊं लागलें तर लोकांच्या ठिकठिकाणीं शंका तशाच राहून जातील. एकदां सृष्टीचा अशा प्रकारें संहार होतो असें बोलून वक्ताच पुन्हां ‘ सर्वब्रह्म ’ प्रतिपादूं लागला तर मायेची पैलथडी पावायचा उपाय श्रोत्यांस कोण सांगेल ? जें जें सूक्ष्मांतील नाम घ्यावें त्याचें त्याचें रूप श्रोत्यांच्या मनावर त्यानें बिंबवून द्यावें तरच विवेकवंत वक्ता म्हणून पुढें आल्याचा उपयोग. ब्रह्म कसें, मूळमायेचें रूप कसें, पुढें अष्टधाप्रकृति, शिवशक्ति, षड्गुणैश्वर इ० नांवें मूळमायेला कां पडलीं, गुणसाम्य जिच्यांत आहे ती गुणमाया कोणती, त्रिगुण कोणते, पूर्वपक्ष कोटून कोठवर, वाच्यांश काय, लक्ष्यांश कोणता, इ० सूक्ष्म विचारांचा स्वच्छ उलगडा ज्याला झाला आहे तो साधु धन्य होय ; वक्तृत्वाचा अधिकार त्यालाच खरोखर आहे. तो पाल्हाळ किंवा चर्वित-चर्वण करीत नाहीं, वाचा जेथें विसांवून मौन धरिते तें ब्रह्म श्रोत्यांच्या आटोक्यांत आणून सोडतो (१–१०). एकदां ब्रह्म विमळ व निश्चळ आहे असें सांगतो, एकदां सर्व ब्रह्म प्रतिपादितो, एकदां साक्षित्व व सत्ता ब्रह्माच्या माथीं मारतो,

निश्चळ तेंचि जालें चंचळ । चंचळ तेंचि ब्रह्म केवळ । नाना प्रसंगीं खळखळ । निवाडा नाहीं ॥ १२ ॥ चळतें आणि निश्चळ । अवघें चैतन्याचि केवळ । रूपें वेगळालीं प्रांजळ । कदापी बोलवेना ॥१३॥ उगीच करी गथागोंवी । तो लोकांस कैसें उगवी । नाना निश्चयें नाना गोंवी । पडत जाते ॥ १४ ॥ भ्रमास म्हणे परब्रह्म । परब्रह्मास म्हणे भ्रम । ज्ञातेपणाचा संभ्रम । बोलोन दावी ॥ १५ ॥ घाली शास्त्रांची दडपण । प्रचीतीविण निरूपण । पुसो जातां उगाच सीण । अत्यंत मानी ॥ १६ ॥ ज्ञात्यास आणि पदार्थभिडा । तो काय बोलेल बापुडा । सारासाराचा निवाडा । जाला पाहिजे ॥ १७ ॥ वैद्य मात्रेची स्तुति करी । मात्रा गुण कांहींच न करी । प्रचीतीवीण तैसी परी । ज्ञानाची जाली ॥ १८ ॥ जेथें नाहीं सारासार । तेथें अवघा अंधकार । नाना परीक्षेचा विचार । राहिला तेथें ॥ १९ ॥ पाप पुण्य स्वर्ग नर्क । विवेक आणि अविवेक । सर्वब्रह्मीं काय येक । सांपडलें नाहीं ॥ २० ॥ पावन आणि तें पतन । दोनीं मानिलीं तत्समान । निश्चयो आणि अनुमान । ब्रह्मरूप ॥ २१ ॥ ब्रह्मरूप जालें आघवें । तेथें काय निवडावें । अवघी साकरचि टाकावें । काय कोठें ॥ २२ ॥ तैसें सार आणि असार । अवघा जाला येकंकार । तेथें बळावला अविचार । विचार कैंचा ॥ २३ ॥ वंद्य निंद्य येक जालें । तेथें काय हाता आलें । उन्मत्त द्रव्यें जें भुललें । तें भलतेच बोले ॥ २४ ॥ तैसा अज्ञानभ्रमें भुलला । सर्व ब्रह्म म्हणोनी बैसला । महापापी आणि भला । येकचि मानी ॥ २५ ॥ सर्वसंगपरित्याग । अव्हासवा विषयभोग ।

एकदां निश्चळ तेंचि चंचळ व चंचळ तेंच निश्चळ ब्रह्म म्हणून म्हणतो, असा अनेक प्रसंगीं असंबद्ध बोलत जातो व निश्चयात्मक कांहींच सांगत नाहीं तो वक्ता कसचा ? चंचळ व निश्चळ सारेंच चैतन्य म्हणून म्हणतो, दोन्ही वेगवेगळीं आहेत असें त्याला स्पष्ट सांगतां येत नाहीं. उगाच स्वतःच गोंधळांत पडतो तो श्रोत्यांस निश्चयात्मक ज्ञान काय देणार ? अनेक निश्चय सांगत सुटला तर सारा गोंधळच होतो. भ्रमाला म्हणतो परब्रह्म व परब्रह्माला म्हणतो भ्रम, आणि डौल आणतो ज्ञातेपणाचा. शास्त्रवचनांचे आधार पुढें करून श्रोत्यांना दडपून टाकतो पण अनुभवाच्या नांवानें शून्य. त्याचा एक-निश्चय नसल्यामुळें कोणीं कांहीं शंका काढिली कीं तो त्रासून जातो. द्रव्यादि पदार्थांची चाड ठेवणारा हा पामर ब्रह्मज्ञान काय सांगणार ? सारासारविचार स्वच्छ असला पाहिजे. वैद्य आपल्या मात्रेची तारीफ करितो पण मात्रेचा गुण रोग्यास येत नाहीं, तसा हा ज्ञान बडबडतो पण श्रोत्यांस प्रचीति येत नाहीं तर त्याचा काय उपयोग ? (११–१८). सार व असार यांचा निःसंदेह निवाडा जेथें झाला नाहीं, तें अनुमानिक ज्ञान म्हणजे अज्ञानच होय, तेथें सत्यमिथ्या परीक्षा कोठची ? ' सर्वब्रह्म ' वाद्यांना पापपुण्य, स्वर्गनरक, विचार अविचार, पतन पावन सारींच सारखीं, त्यांना निश्चय व संशय दोन्ही ब्रह्मरूपच ! त्यांना सारेंच ब्रह्मरूप, सारीच साखर मग त्यांत निवडानिवड कसची होते ? सार आणि असार दोन्ही त्यांना एकरूपच ; तात्पर्य, या एकंकार करणाऱ्या सर्वब्रह्मवाद्यांचें सारेंच बोलणें अविचाराचें असल्यामुळें त्यांच्या बोलण्यांत विचाराचा लेशही नसतो. वंद्य आणि निंद्य दोन्ही एकच म्हटल्यावर निश्चय कोणता हातीं येणार ? अंमल चढल्यावर मनुष्य भलतेंच बरळतो तसा अज्ञानभ्रमानें भुललेला हा मूर्ख, महापापी व साधु एकच मानतो. सर्वसंगपरित्याग व स्वेच्छाचाराचा

दोघे येकचि मानितां मग । काय उरलें ॥ २६ ॥ भेद ईश्वर करून गेला । त्याच्या वाचेन न वचे मोडिला । मुखामध्यें घांस घातला । तो अपानीं घालावा ॥ २७ ॥ ज्या इंद्रियांस जो भोग । तो तो करी यथासांग । ईश्वराचें केलें जग । मोडितां उरेना ॥ २८ ॥ अवघी भ्रांतीची भुताटकी । प्रचीतीवीण गोष्टी लटकी । वेड लागलें जे बटकी । तें भलतेंचि बोले ॥ २९ ॥ प्रत्ययज्ञाता सावधान । त्याचें ऐकावें निरूपण । आत्मसाक्षात्काराची खूण । तत्काळ बाणे ॥ ३० ॥ वेडें वांकडें जाणावें । आंधळें पाउलीं वोळखावें । बाष्कळ बोलणें सांडावें । वमन जैसें ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अनुमाननिरसननाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

॥ श्रीराम ॥ येकवीस सहस्र साहशें जपा । नेमून गेली ते अजपा । विचार पाहातां सोपा । सकळ कांहीं ॥ १ ॥ मुखीं नासिकीं असिजे प्राणें । तयास अखंड येणें जाणें । याचा विचार पाहाणें । सूक्ष्मदृष्टी ॥ २ ॥ मुळीं पाहातां येक स्वर । त्याचा तार मंद्र घोर । त्या घोराहून सूक्ष्म विचार । अजपाचा ॥ ३ ॥ सारिगमपदनीस । सरीं मातृका सायास । प्रथम स्वरें मातृकांस । म्हणोन पाहावें ॥ ४ ॥ परेवाचेहून अर्तें । आणि पश्यंतीखालतें । स्वराचे जन्मस्थान तें । तेथून उठे ॥ ५ ॥ येकांतीं उगेंच बैसावें । तेथें हें समजोन पाहावें । अखंड घ्यावें सांडावें । प्रभंजनासी ॥ ६ ॥ येकांतीं मौन धरून बैसे । सावध पाहातां कैसें भासे । सोहं सोहं ऐसे । शब्द होती ॥ ७ ॥

विषयभोग दोन्ही एकच मानल्यावर त्यांत साधकानें घ्यावयाचें काय ? भेद ईश्वरानेंच केला आहे. तो याच्या बाळा मोडतां येणार नाहीं. तोंडांत घालायचा घांस अपानांत घातला तर कसें होईल ? ज्या ज्या इंद्रियाला जो जो भोग योग्य, तोच त्याला दिला पाहिजे. देवाचे नियम मोडतां येत नाहींत. यांचें बरळणें भ्रमांतलें, अनुभवावांचून बडबड ती, वेड्याचें तें बरळणें. स्वानुभवी व सावध अशा वक्त्याचे मुखें ज्ञान ऐकावें म्हणजे स्वरूपलाभाची खूण तात्काळ बाणते. वेडेंवांकडें जाणावें, चालण्यावरून आंधळें जाणावें, तसें बाष्कळ भाषण ऐकून वनासारखें टाकावें (१९–३१). [द० १७, स० ४]

२१६०० श्वासोच्छ्वास प्रत्येक प्राण्याचे प्रत्यहीं होतात. त्यांकडे एकाग्रतेनें लक्ष ठेवणें याला ' अजपा ' जप म्हणतात. विचार केला म्हणजे हा साधणें कांहीं कठिण नाहीं. मुखांत व नाकांत प्राण असून त्याचे श्वास व उच्छ्वास एकसारखे होत असतात, ते सूक्ष्म दृष्टीनें पाहावेत. मूळांत पाहूं जातां स्वर एकच आहे पण त्याचे तार (वरचा षड्ज), मंद्र (मधला षड्ज) व घोर (खालचा षड्ज, खर्ज) असे तीन भेद आहेत ; त्यांतल्या घोरापेक्षांही अजपेचा विचार सूक्ष्म आहे. सा, री, ग, म, प, ध, नि हे सप्तस्वर. या सर्व मातृका म्हणून पाहा. सप्तस्वरांपैकीं कोणताही स्वर प्रथम धरून तेथून पुढचे म्हणून पाहा. नाभिस्थानीं असलेल्या परावाणीच्या अलीकडे म्ह० वरतीं व हृदयस्थानीं असलेल्या पश्यन्ती वाणीच्या खालीं अर्थात् नाभि व हृदय यांच्यामध्यें स्वराचें जन्मस्थान आहे, तेथून स्वर उठतो. निवांत स्थळीं उगीच स्थिर बसून याचा अनुभव पाहावा, वायु आंत घ्यावा व सोडावा, एकांतीं मौन धरून बसावें व सूक्ष्मपणें पाहावें म्हणजे सोहं सोहं असे शब्द

उच्चारेंविण जे शब्द । ते जाणावे सहज शब्द । प्रत्यया येती परंतु नाद । कांहींच नाहीं ॥ ८ ॥ ते शब्द सांडून बैसला । तो मौनी म्हणावा भला । योगाभ्यासाचा गल्बला । याकारणें ॥ ९ ॥ येकांतीं मौन धरून बैसला । तेथें कोण शब्द जाला । सोहं ऐसा भासला । अंतर्यामीं ॥ १० ॥ धरितां सो सांडितां हं । अखंड चाले सोहं सोहं । याचा विचार पाहाता बहु । विस्तारला ॥ ११ ॥ देहधारक तितुका प्राणी । स्वेदजउद्भिजादिक खाणी । श्वासोच्छ्वास नस्तां प्राणी । कैसे जिती ॥ १२ ॥ ऐसी हे अजपा सकळांसी । परंतु कळे जाणत्यासी । सहज सांडून सायासीं । पडोंच नये ॥ १३ ॥ सहज देव असतचि असे । सायासें देव फुटे नासे । नासिवंत देवास विश्वासे । ऐसा कवणु ॥ १४ ॥ जगदंतराचें दर्शन । सहज घडे अखंड ध्यान । आत्मइच्छेनें जन । सकळ वर्तती ॥ १५ ॥ आत्मयाचें समाधान । घडे तैसेंचि अशन । सांडलें फिटलें समर्पण । तयासीच होय ॥ १६ ॥ अग्निपुरुष पोटीं वसती । तयास अवदानें सकळ देती । लोक आज्ञेमध्यें असती । आत्मयाचे ॥ १७ ॥ सहज देवजपध्यानें । सहज चालणें स्तुती स्तवनें । सहज घडे तें भगवानें । मान्य कीजे ॥ १८ ॥ सहज समजायाकारणें । नाना हटयोग करणें । परंतु येकायेकीं समजणें । घडत नाहीं ॥ १९ ॥ द्रव्य चुकतें दरिद्र येतें । तळीं लक्ष्मी वरी वर्ततें । प्राणी काय करील तें । ठाउकें नाहीं ॥ २० ॥

होत असलेले ऐकूं येतात. उच्चारावांचून हे शब्द होतात म्हणून यांना सहजशब्द म्हणतात. हे प्रत्ययाला येतात पण यांचा नाद होत नाहीं. तेही शब्द सांडून बसतो तो खरा मौनी होय. योगाभ्यासाची जी एवढी खटपट करायची असते ती त्यासाठींच होय. एकांतीं याप्रमाणें मौन धरून बसलें असतां कोणता शब्द होतो ? 'सोहं' शब्द आंत होत असल्याचा भास होतो. श्वास आंत घेतांना 'सः' व बाहेर सोडतांना 'अहम्' असा सोहं सोहं हा जप अखंड चाललेला आहे. याचा आणखी विचार सांगितल्यास विस्तार फार होईल (१–११). जारज, अंडज, स्वेदज व उद्भिज असे चार प्रकारचे प्राणी आहेत, त्या सर्व प्राण्यांचा हा जप सहज चाललेला आहे, या श्वासाशिवाय ते जगायचेच नाहींत. असा हा अजपाजप सर्व प्राण्यांचा अखंड चाललाच आहे. पण जाणत्यांना तो कळत असतो. हा सहजजप सोडून सायासाचा जप करूंच नये. सहज निश्चळ देव आहे तसा आहेच, सायासानें घडविलेला देव फुटतो, तुटतो ; अशा नाशवंत देवावर कोण विश्वास ठेवील ? जगदंतर जो अंतरात्मा त्याचें दर्शन घेतलें असतां सहजध्यान अखंड होतच असतें. त्याच्याच इच्छेप्रमाणें प्राणिमात्र वागत असतात. आपलें अशन म्ह० खाणेंपिणें, भोग असेच घडतात कीं जेणेंकरून त्याचें समाधान होतें. बुद्धिपुरस्सर अर्पण केलेलेंच नव्हे, तर चुकलें माकलेलें सर्व कांहीं त्या आत्मारामालाच समर्पण होत असतें. आपल्या उदरीं वैश्वानररूप जो यज्ञपुरुष आहे त्यालाच आपण आहुति देत असतों ; त्याच्याच आज्ञेंत आपण सर्व वागत असतों ; जपध्यान, स्तुतिस्तवन आपल्या हातून सहजच होत असतें. सहज जें जें कांहीं आपण करीत असतों तें तें भगवंताला मान्य होत असतें. हें सर्व सहज होत असतें हें कळण्यासाठीं लोक हटयोग करितात, पण एकाएकीं समजणें कठिण आहे. द्रव्य कोठें पुरलें आहे हें बरोबर ठिकाण न कळल्यामुळें मनुष्य विनाकारण दारिद्र्यांत दिवस कंठीत बसतो. हा बसतो त्याच्या खालींच ठेवा पुरलेला असून हा वर बसून उपवास करितो ! काय करील, निधान आपल्याजवळच आहे हें बिचाऱ्याला ठाऊक नाहीं. तळघरांत द्रव्य आहे,

तळघरांमध्यें उदंड द्रव्य । भिंतीमध्यें घातलें द्रव्य । स्तंभीं तुळवटीं द्रव्य । आपण मध्यें ॥ २१ ॥ लक्ष्मीमध्यें करंटा नांदे । त्याचें दरिद्र अधीक सांदे । नवल केलें परमानंदें । परमपुरुषें ॥ २२ ॥ येक पाहाती येक खाती । ऐसी विवेकाची गती । प्रवृत्ति अथवा निवृत्ति । येणेंचि न्यायें ॥ २३ ॥ अंतरीं वसतां नारायणें । लक्ष्मीस काय उणें । ज्याची लक्ष्मी तो आपणें । बळकट धरावा ॥ २४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अजपानिरूपणनाम समास पंचम ॥ ५ ॥

॥ श्रीराम ॥ आत्मा देहामध्यें असतो । नाना सुखदुःखें भोगितो । सेवटीं शरीर सांडून जातो । येकायेकीं ॥ १ ॥ शरीरीं शक्ति तारुण्यपणीं । नाना सुखें भोगी प्राणी । अशक्त होतां वृद्धपणीं । दुःखें भोगी ॥ २ ॥ मरावेना ऐसी आवडी । हातपाय खोडून प्राण सोडी । नाना दुःखें अवघडीं । वृद्धपणीं ॥ ३ ॥ देहआत्मयाची संगती । कांहींयेक सुख भोगिती । चर्फडचर्फडून जाती । देहांतकाळीं ॥ ४ ॥ ऐसा आत्मा दुःखदायक । येकांचे प्राण घेती येक । आणी शेवटीं निरर्थक । कांहींच नाहीं ॥ ५ ॥ ऐसा दों दिसांचा भ्रम । त्यास म्हणती परब्रह्म । नाना दुःखांचा संभ्रम । मानून घेतला ॥ ६ ॥ दुःखी होऊन चर्फडून गेले । तेथें कोण समाधान जालें । कांहींयेक सुख भोगिलें । तों सर्वेचि दुःख ॥ ७ ॥ जन्मादारभ्य आठवावें । म्हणिजे अवघें पडेल ठावें । नाना दुःख मोजावें । काय म्हणोनी ॥ ८ ॥ ऐसी आत्मयाची संगती । नाना दुःखें प्राप्त होती । दैन्यवाणे होऊन जाती ।

भिंतींत द्रव्य आहे, खांबांत व तुळवटांत याप्रमाणें साऱ्या वाड्यांत सर्वत्र द्रव्य पुरलेलें आहे, पण अशा लक्ष्मीनिवासांत बसून करंटा अधिकच दारिद्र्य भोगतो (सांदतें-पूर्ण होतें), परमानंद परमात्म्यानें हें केवढें नवल केलें आहे ! एक खातात, एक नुस्तेंच पाहात राहतात, पण हें अंतर पडण्याचें बीज विवेकांत आहे. विवेक किंवा जाणीव अधिक तेथें भाग्य अधिक. जाणीव कमी म्हणून दारिद्र्य जास्त. प्रवृत्तींत किंवा निवृत्तींत माणसांमाणसांत अंतर दिसतें तें केवळ जाणीव कमी किंवा अधिक म्हणूनच होय. असो. अंतरीं नारायण (जाणीवरूप अंतरात्मा) असल्यावर लक्ष्मीला काय उणें. म्हणून लक्ष्मी ज्याची दासी तो नारायण अंतरीं धरावा (१२–२४). [द० १७, स० ५]

अंतरात्मा देहांत राहून अनेक सुख-दुःखें भोगतो व शेवटीं एकदम शरीर सोडून जातो. तारुण्यांत शक्ति असतांना सुखें भोगतो व म्हातारपणीं शक्तिक्षय झाला कीं दुःखें भोगतो. तीं दुःखें फार दुर्धर असतात. मरणें प्रिय नसल्यामुळें देहत्यागसमयीं हातपाय झाडून प्राण सोडतो. देह व आत्मा यांच्या संगतींत कांहीं सुखोपभोग घेऊन आत्मा अंतकाळीं चरफडत देहत्याग करितो. असा हा दुःखभाक् आहे. एकमेक एकामेकांचे प्राण व्यर्थ घेतांनाही आढळतात. हा आत्मा दोन दिवसांचा भ्रम आहे पण त्यालाच कोणी परब्रह्म मानतात. अनेक दुःखप्रसंग आत्मा (जीव) मानून (गोड करून) घेतो. दुःख पावून चरफडून गेल्याचें काय समाधान आहे ? सुख अल्पकाळ भोगावें तों मागोमाग दुःख आहेच. जन्मापासून कितीतरी दुःखें भोगावीं लागलीं याचा विचार करावा. अनेक जीवांच्या संगतींत अनेक दुःखें प्राप्त होतात, व प्राणी

प्राणिमात्र ॥ ९ ॥ कांहीं आनंद कांहीं खेद । जन्मवरी पडिला संमंध । नाना प्रकारीं विरुद्ध । तडातोडी ॥ १० ॥ निद्राकाळीं ढेकुण पिसा । नाना प्रकारीं करिती वळसा । नाना उपायें वळसा । त्यांस होय ॥ ११ ॥ भोजनकाळीं माशा येती । नाना पदार्थ उंदीर नेती । पुढें त्यांचीहि फजीती । मार्जरें करिती ॥ १२ ॥ उवा चामवा गोंचिड । गांधेलें कानटें उदंड । येकांस येक चर्फड । दोहींकडे ॥ १३ ॥ विंचु सर्प वाग रिसें । सुसरी लांडिगे माणसांस माणसें । परस्परें सुखसंतोषें । येकहि नाहीं ॥ १४ ॥ चौऱ्यांसि लक्ष उत्पत्ती । येकांस येक भक्षिती । नाना पीडा दुखणीं किती । म्हणोनी सांगावें ॥ १५ ॥ ऐसी अंतरात्म्याची करणी । नाना जीव दाटले धरणीं । परस्परें संव्हारणी । येकयेकांची ॥ १६ ॥ अखंड रडती चर्फडिती । विवळ-विवळों प्राण देती । मूर्ख प्राणी त्यास म्हणती । परब्रह्म ॥ १७ ॥ परब्रह्म जाणार नाहीं । कोणास दुःख देणार नाहीं । स्तुति निंदा दोनी नाहीं । परब्रह्मीं ॥ १८ ॥ उदंड शिव्या दिधल्या । तितुक्या अंतरात्म्यास लागल्या । विचार पाहतां प्रत्यया आल्या । यथातथ्य ॥ १९ ॥ धगडीचा बटकीचा लवंडीचा । गधडीचा कुतरीचा वोंगळीचा । ऐसा हिशेब सिव्यांचा । किती म्हणोनि सांगावा ॥ २० ॥ इतुकें परब्रह्मीं लागेना । तेथें कल्पनाचि चालेना । तडातोडीचें ज्ञान मानेना । कोणीयेकासी ॥ २१ ॥ सृष्टीमध्यें सकळ जीव । सकळांस कैचें वैभव । याकारणें ठायाठांव । निर्मिला देवें ॥ २२ ॥ उदंड लोक बाजारींचे । जें जें आलें तें तें वेंचे । उत्तम तितुके भाग्याचे । लोक घेती ॥ २३ ॥ येणेंचि न्यायें अन्नवसन । येणेंचि न्यायें देवतार्चन । येणेंचि न्यायें

दीन होऊन जातात. कांहीं सुख, कांहीं दुःख असा अनुभव जन्मभर येतो, पुष्कळ गोष्टी मनाविरुद्ध होतात, पुष्कळांचे वियोग सोसावे लागतात. निजतांना ढेंकूण, पिसा त्रास (वळसा) देतात, व त्यांनीं त्रास न द्यावा असे उपाय योजावे तर त्यांना त्रास होतो. पानावर बसून जेवतांना माशा सतावतात, घरांतले अनेक पदार्थ उंदीर बिळांत ओढून नेतात, पुढें त्या उंदरांना मांजरें गट्ट करितात. उवा, पांढऱ्या चामवा, गोचीड, गांधिलमाशा, कानटें (सर्प) इ० प्राणी जीवांस परस्पर त्रास देतात. विंचू, सर्प, वाघ, अस्वलें (रिसें), सुसरी, लांडगे व माणसांस माणसें याप्रमाणें प्राणिमात्र एकमेकांस गांजतात, मारतात; परस्पर सुखसंतोषानें राहत नाहींत. ८४ लक्ष कोटी प्राणी पाहा, एकास एक भक्षितात (जीवो जीवस्य जीवनम्). नाना क्लेश व दुखणीं आहेतच. अनंत प्राण्यांची पृथ्वीवर दाटी झाली असून परस्पर एकमेकांचा संहार करितात. अशी ही अंतरात्म्याची करणी आहे ! रडणें, चर्फडणें, विवळून प्राण देणें हें अंतरात्मा करीत व करवीत असतांना त्याला मूढलोक परब्रह्म म्हणतात ! (१–१७). परब्रह्म अचळ आहे, तें कोणाला दुःख देत नाहीं, तेथें निंदास्तुति दोनो पोंचत नाहींत; हजारों प्रकारच्या शिव्या आहेत पण त्या त्याला लागत नाहींत. तेथें कसलीच कल्पना चालत नाहीं. विसंगत ज्ञान कोणालाच मानवत नाहीं. सृष्टींतल्या सर्व जीवांना वैभव कोठचें ? म्हणून देवानें जें केलें आहे तें ठीक, यथायोग्य (ठायाठाय) केलें आहे. बाजारांत सर्वच वस्तु विकायला येतात व सान्याच खपतात. पण त्यांतल्या उत्तम वस्तु सभाग्य लोक घेऊन जातात. याच न्यायानें अन्नवस्त्र, देवतार्चन, ब्रह्मज्ञान प्रारब्धानुसार जीवांना मिळत असतें. आतां

ब्रह्मज्ञान । प्राप्तव्यासारिखें ॥ २४ ॥ अवघेच लोक सुखी असती । संसार गोड करून नेती । महाराजे वैभव भोगिती । तें करंट्यास कैचें ॥ २५ ॥ परंतु अंतीं नाना दुःखें । तेथें होतें सगट सारिखें । पूर्वीं भोगिलीं नाना सुखें । अंतीं दुःख सोसवेना ॥ २६ ॥ कठिण दुःख सोसवेना । प्राण शरीर सोडीना । मृत्युदुःख सगट जना । कासावीस करी ॥ २७ ॥ नाना अवेवहीन जालें । तैसेंचि पाहिजे वर्तलें । प्राणी अंतकाळीं गेलें । कासावीस होउनी ॥ २८ ॥ रूप लावण्य अवघें जातें । शरीरसामर्थ्य अवघें राहतें । कोणी नस्तां मरतें । आपदआपदों ॥ २९ ॥ अंतकाळ दैन्य दीन । सकळिकांस तत्समान । ऐसें चंचळ अवलक्षण । दुःखकारी ॥ ३० ॥ भोगून अभोक्ता म्हणती । हे तों अवघीच फजिती । लोक उगेंच बोलती । पाहिल्याविण ॥ ३१ ॥ अंतकाळ आहे कठिण । शरीर सोडिना प्राण । बराड्यासारिखें लक्षण । अंतकाळीं ॥ ३२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे देहात्मनिरूपणनाम समास षष्ठ ॥ ६ ॥

॥ श्रीराम ॥ मूळीं उदक तीक्ष्ण असतें । नाना वल्लींमध्यें जातें । संगदोषें तैसें होतें । आंब्ल तीक्ष्ण कडवट ॥ १ ॥ आत्मा आत्मपणें असतो । देहसंगें विकारतो । साभिमानें भरीं भरतो । भलतीकडे ॥ २ ॥ बरी संगती सांपडली । जैसी उंसास गोडी आली । विषवल्ली फांपावली । घातकी प्राणी ॥ ३ ॥ अठराभार वनस्पती । गुण सांगावे ते किती । नाना देहांचे संगती । आत्मयास होय ॥ ४ ॥ त्यांमध्यें कोणी भले । ते संतसंगें निवाले । देहाभिमान

मारेंच ससांर गोड करून घेतात व सुखी राहतात. तथापि राजाचें वैभव करंट्याला कोठून मिळणार ? तथापि सर्वांना शेवटचें (मरणाचें) दुःख सारखेंच भोगावें लागतें. तारुण्यांत सुखें भोगलीं असल्यामुळें अखेरचीं हीं दुःखें जड जातात, सुखीनें शरीर सोडून प्राण जात नाहींत, मृत्युदुःख सर्वांनाच क्लेशकारक होतें. रूपलावण्य जातें, शरीरसामर्थ्य क्षीण होतें, अवयव कमीजास्त झाले तर तसेंच सोसावें लागतें, व जवळ कोणीच नसतां खितपून मरावें लागतें. अंतकाळीं सर्वच दीन होतात. असा हा अंतरात्मा (चंचळ) अवलक्षण व दुःखकारक आहे. त्या अंतरात्म्याला लोक 'भोगून अभोक्ता' म्हणतात हें अगदीं चुकीचें आहे, लोक पाहिल्यावांचून बोलतात. अंतकाळ कठीण आहे, प्राण शरीर सोडून जातां जात नाहीं, अंतकाळीं प्राण्यांची आशाळभूत भिकाऱ्यासारखी केविलवाणी स्थिति होते (१८–३२). [द० १७, स० ६]

पाणी मुळांत निर्मळ असतें, पण तें अनेक वेलींमध्यें जाऊन त्यांच्या संगतीनें आंबट, तिखट, कडवट वगैरे होतें; तसा आत्मा आत्मपणानें निर्विकार व निर्मळ आहे, पण तो देहसंगतीनें विकार पावतो व अभिमानाच्या भरीं भरून भलत्याच मार्गाला लागतो. सत्संगती मिळाली म्हणजे उंसाला गोडी यावी तसा भला होतो, व घातक्यांची संगत मिळाली म्हणजे विषवल्ली फोंफावते तसा परमनष्ट होतो. अठराभार वनस्पति आहेत त्यांचे गुण किती सांगावेत ? अनेक देहांच्या संगतीनें आत्माही अनेक विकारांनीं तसाच गजबजतो. त्यांत कोणी भले असतात ते सत्संगतीनें सुख पावतात व देहबुद्धि विवेकानें तोडून पैलपार जातात. येथवर उदकाचा दृष्टांत आत्म्यास दिला पण

सांडून गेले। विवेकबळें ॥ ५ ॥ उदकाचा नाशचि होतो। आत्मा विवेकें निघतो। ऐसा आहे प्रत्यय तो। विवेकें पाहा ॥ ६ ॥ ज्यास स्वहितचि करणें। त्यास किती म्हणोनी सांगणें। हें ज्याचें त्यानें समजणें। सकळ कांहीं ॥ ७ ॥ आपला आपण करी कुडावा। तो आपला मित्र जाणावा। आपला नाश करी तो समजावा। वैरी ऐसा ॥ ८ ॥ आपलें आपण अनहित करावें। त्यास आडवें कोणें निघावें। येकांतीं जाऊन जीवें। मारी आपणासी ॥ ९ ॥ जो आपला आपण घातकी। तो आत्महत्यारा पातकी। याकारणें विवेकी। धन्य साधु ॥ १० ॥ पुण्यवंतां सत्संगती। पापिष्टां असत्संगती। गति आणि अवगती। संगतीयोगें ॥ ११ ॥ उत्तम संगती धरावी। आपली आपण चिंता करावी। अंतरीं बरी विवरावी। बुद्धि जाणत्याची ॥ १२ ॥ इहलोक आणि परलोक। जाणता तो सुखदायक। नेणत्याकरितां अविवेक। प्राप्त होतो ॥ १३ ॥ जाणता देवाचा अंश। नेणता म्हणिजे तो राक्षस। यामध्यें जें विशेष। तें जाणोन घ्यावें ॥ १४ ॥ जाणता तो सकळां मान्य। नेणता होतो अमान्य। जेणें करितां होईजे धन्य। तेंचि घ्यावें ॥ १५ ॥ साक्षपी शाहण्याची संगती। तेणें साक्षपी शाहाणे होती। आळसी मूर्खाची संगती। आळसी मूर्ख ॥ १६ ॥ उत्तम संगतीचें फळ सुख। अधम संगतीचें फळ दुःख। आनंद सांडुनियां शोक। कैसा घ्यावा ॥ १७ ॥ ऐसें हें प्रगटचि दिसे। जनामध्यें उदंड भासे। प्राणिमात्र वर्ततसे। उभययोगें ॥ १८ ॥ येकायोगें सकळ योग। येकायोगें सकळ वियोग। विवेकयोगें सकळ प्रयोग। करीत जावे ॥ १९ ॥

तो अपुरा आहे, कांकीं उदक नाश पावतें पण आत्मा विवेकानें देहबुद्धीच्या आवरणांतून बाहेर पडतो असा अनुभव आहे त्याचा प्रत्यय घेऊन पाहावा (१–६). ज्याला स्वहित करणें आहे त्याला फार सांगणें नको, ज्याचें त्यानें समजून शहाणें व्हावें. जो आपलें आपण रक्षण (कुडावा) करितो तो आपलाच आपण मित्र होतो, व नाश करून घेईल तर तो स्वतःचाच शत्रु समजावा. जो स्वतःचाच नाश करून घ्यायला उद्युक्त झाला त्याला कोण वारील ? तो एकीकडे जाऊन आत्महत्या करीलच. जो आपला आपण घात करितो तो आत्मघातकी व पातकी होय; म्हणून विवेकानें आपला उद्धार करून घेईल तो साधु धन्य होय (७–१०). पुण्यवंतांना सत्संग व पाप्यांना दुःसंग मिळतो, सद्गति व अधोगति यांना कारण संग होय. म्हणून सत्संग धरावा, आपल्या सुटकेची काळजी आपणच करावी व जाणता पुरुष स्वबुद्धीनें कसा तरून जातो याचें मनन करावें. प्रपंचीं अथवा परमार्थीं जाणत्याचा संग सुखकारक होतो व नेणत्याच्या संगतींत अविवेकच वाटीस लागतो. जाणता देवांश व नेणता दैत्यांश समजावा, व यांत श्रेयस्कर तो संग धरावा. जाणता सर्वमान्य होतो, नेणता अमान्य होतो म्हणून ज्या संगतीनें जन्मसाफल्य होतें तीच संगति करावी. उद्यमशील शाहण्यांची संगत केली तर मनुष्य उद्योगी व शाहणा होतो व आळशी मूर्खांची संगत केली तर आळशी व मूर्ख होतो. उत्तम संगतीपासून सुख होतें, अधम संगतीपासून दुःख होतें. आनंद सोडून दुःख व शोक कां पत्करावा ? हें उघड आहे व प्रत्यक्ष दिसतें, दोन्ही प्रकारांनीं प्राणिमात्र वागतात. एकाच्या (विवेकी पुरुषाच्या) संगतीनें सर्व सुखयोग मिळतात व दुसऱ्याच्या (मूर्खांच्या) संगतीनें सर्व कामें फिसकटत जातात, म्हणून विवेक्याच्या मसलतीनें सर्व कर्में (प्रयोग) करीत जावीं (११–१९). अकस्मात्

अवचितें सांकडींत पडिलें । तरी तेथून पाहिजे निघालें । निघोन जातां जालें । परम समाधान ॥ २० ॥ नाना दुर्जनांचा संग । क्षणक्षणा मनभंग । याकारणें कांहीं रंग । राखोन जावें ॥ २१ ॥ शाहाणा यत्न त्याच्या गुणें । पाहों जातां काय उणें । सुखसंतोष भोगणें । नाना श्लाघ्यता ॥ २२ ॥ आतां लोकीं ऐसें आहे। सृष्टीमध्यें वर्तताहे। जो कोणी समजोन पाहे । त्यास घडे ॥ २३ ॥ बहुरत्न वसुंधरा । जाणजाणों विचार करा । समजल्या प्रत्ययो अंतरा-। माजी येतो ॥ २४ ॥ दुर्बळ आणी संपन्न । वेडें आणि व्युत्पन्न । हें अखंड दंडायमान । असतचि असे ॥ २५ ॥ येक भाग्यपुरुष मोडती । येक नवे भाग्यवंत होती । तैसीच विद्या व्युत्पत्ती । होत जाते ॥ २६ ॥ येक भरे येक रितें । रितें मागुतें भरतें । भरतेंही रितें होतें । काळांतरीं ॥ २७ ॥ ऐसी हे सृष्टीची चाली । संपत्ति दुपाराची साउली । वयसा तरी निघोन गेली । हळुहळू ॥ २८ ॥ बाळ तारुण्य आपलें । वृधाप्य प्रचीतीस आलें । ऐसें जाणोन साथक केलें । पाहिजे कोणीयेकें ॥ २९ ॥ देहें जैसें केलें तैसें होतें । यत्न केल्यां कार्य साधतें । तरी मग कष्टावें तें । काय निमित्य ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे जगज्जीवननिरूपणनाम समास सप्तम ॥ ७ ॥

॥ श्रीराम ॥ नाभीपासून उन्मेषवृत्ती । तेचि परा जाणिजे श्रोतीं । ध्वनिरूप पश्यंती । हृदईं वसे ॥ १ ॥ कंठापासून नाद जाला । मध्यमा

संकटांत पडल्यास त्यांतून निघालें पाहिजे म्हणजे समाधानसुख प्राप्त होतें (म्हणून जाणत्याचा संग करावा म्हणजे संकटमुक्ततेचा उपाय सुचतो). अनेक प्रकारच्या दुःसंगतींत क्षणोक्षणीं मनोभंग होऊन दुःख होतें म्हणून आपलें महत्त्व (रंग) राखून वागाव. शाहणा प्रयत्नशील असतो, त्याला कांहीं कमी पडत नाहीं, सुखसंतोष व श्लाघ्यता म्ह० लौकिकांत भलेपण मिळतें. हें पाहील त्याला सर्वत्र दिसेल – ही वसुंधरा (पृथ्वी) बहुरत्ना आहे म्ह० पृथ्वीवर अनेक जाणते व शहाणे लोक असतात, म्हणून जाणत्यांचा विचार करा म्हणजे ह्या म्हणण्याचा अनुभव येईल. ह्या जगांत दुर्बळ व संपन्न, वेडे व शहाणे (व्युत्पन्न, पंडित) असे दोन्ही प्रकारचे लोक असतातच. कांहीं संपन्न लोक धुळीस मिळतात (मोडती) व कांहीं दरिद्री लोक भाग्याला चढतात ; विद्याव्युत्पत्तीचाही असाच प्रकार आहे. एक भरतें, एक रिकामें होतें ; भरतें तेंही कालांतरानें रिकामें होतें असें हें सृष्टीचें चक्र (रहाटगाडगें) सारखें फिरत आहे (कुटुंबें व राष्ट्रें चक्रनेमिक्रमानें उदयास्त पावतात). संपत्ति दुपारची सावली (क्षणभंगुर) आहे, आयुष्य क्षीण होणारें आहे, बाळ तारुण्य वृद्धाप्य इ० अवस्था संपून मृत्यु उभा आहे हें जाणून मनुष्यानें आयुष्य सार्थकीं लावावें. देहानें जें करावें तें होतें, यत्नानें कार्यसिद्धि होते हें जाणत असून मनुष्यानें दुःख कां भोगावें ? (२०–३०). [द० १७, स० ७]

(ह्या समासांत पंचीकरण सांगितलें आहे. अंतःकरणपंचक, प्राणपंचक, ज्ञानेंद्रियपंचक, कर्मेंद्रियपंचक व विषयपंचक मिळून पांचा पंचकांचा सूक्ष्म देह झाला आहे हें पहिल्या २२ ओंव्यांत सांगितलें आहे. प्रथम चार वाणी सांगून मग अंतःकरण, मन, बुद्धि, चित्त व अहंकार मिळून होणाऱ्या अंतःकरणपंचकाचा विचार सांगितला आहे. याप्रमाणें पुढील पंचकांचाही विचार केला आहे. सूक्ष्मभेदाचें कोष्टक पुढें दिलें आहे त्यावरून सूक्ष्मदेहवर्णनाच्या २२ ओंव्या चांगल्या उकलतील.)

वाचा बोलिजे त्याला । उच्चार होतां अक्षराला । वैखरी बोलिजे ॥ २ ॥ नाभिस्थानीं परा वाचा । तोचि ठाव अंतःकरणाचा । अंतःकरणपंचकाचा । निवाडा ऐसा ॥ ३ ॥ निर्विकल्प जें स्फुरण । उगेंच असतां आठवण । तें जाणावें अंतःकरण । जाणती कळा ॥ ४ ॥ अंतःकरण आठवलें । पुढें होय नव्हेसें गमलें । करूं न करूं ऐसें वाटलें । तेंचि मन ॥ ५ ॥ संकल्प विकल्प तेंचि मन । जेणेंकरितां अनुमान । पुढें निश्चयो तो जाण । रूप बुद्धीचें ॥ ६ ॥ करीनचि अथवा न करी । ऐसा निश्चयोचि करी । तेचि बुद्धि हे अंतरीं । विवेकें जाणावी ॥ ७ ॥ जे वस्तूचा निश्चयो केला । पुढें तेचि चिंतूं लागला । तें चित्त बोलिल्या बोला । यथार्थ मानावें ॥ ८ ॥ पुढें कार्याचा अभिमान धरणें । हें कार्य तों अगत्य करणें । ऐसा कार्यास प्रवर्तणें । तोचि अहंकारु ॥ ९ ॥ ऐसें अंतःकरणपंचक । पंचवृत्ती मिळोन येक । कार्यभागें प्रकारपंचक । वेगळाले ॥ १० ॥ जैसे पांचाहि प्राण । कार्यभागें वेगळाले जाण । नाहीं तरी

सूक्ष्मदेहाचीं तत्त्वें

पंच-महाभूतें	आकाशाचें अंतःकरणपंचक	वायूचें प्राणपंचक	तेजाचें ज्ञानेंद्रियपंचक	आपाचें कर्मेंद्रियपंचक	पृथ्वीचें विषयपंचक
आकाश	अंतःकरण प्रथम स्फुरण	व्यान सर्वांगीं	श्रवण शब्द ऐकतो त्याशिवाय बहिरा	वाचा शब्द बोलतो ᳯयाशिवाय जीव मुका	शब्द
वायु	मन संकल्पविकल्प	समान नाभिस्थानीं	त्वचा शीतोष्णादि जाणतो	हस्त पदार्थ उचलतो	स्पर्श
तेज	बुद्धि निश्चयात्मकत	कंठीं	चक्षु रूप पाहतो त्याशिवाय आंधळा	पाद चालतो त्याशिवाय पांगळा	रूप
आप	चित्त चिंतन	अपान गुदस्थानीं	जिव्हा रसास्वाद घेतो	शिश्न मूत्र व रतिभोग त्याशिवाय नपुंसक	रस
पृथ्वी	अहंकार कार्याभिमान	प्राण मुखीं नासिकीं	घ्राण सुगंध दुर्गंध समजतो	गुद मलोत्सर्ग	गंध

नाभिस्थानीं जी प्रथम स्फुरण होते ती परा वाणी, हृदयस्थानीं तीच ध्वनिरूपता पावली कीं पश्यन्ती, कंठीं येऊन नादरूप झाली कीं मध्यमा व जिह्वेवर येऊन उद्गार पावली कीं वैखरी. नाभिस्थानीं परावाणी हेंच अंतःकरणाचें स्थान होय. अंतःकरणांत सहज प्रथम स्फुरण होतें, होय कीं नाहीं — करूं कीं न करूं असें चंचळपण तें मन, करीन अथवा करणार नाहीं असा निश्चय करिते ती बुद्धि, ज्याचा निश्चय केला त्याचें चिंतन करितें तें चित्त व कार्याचा अभिमान धरून कार्या

वायोचें लक्षण । येकचि असे ॥ ११ ॥ सर्वांगीं व्यान नाभीं समान । कंठीं उदान गुदीं अपान । मुखीं नासिकीं प्राण । नेमस्त जाणावा ॥ १२ ॥ बोलिलें हें प्राणपंचक । आतां ज्ञानइंद्रियेंपंचक । श्रोत्र त्वचा चक्षु जिव्हा नासिक । ऐसीं हीं ज्ञानेंद्रियें ॥ १३ ॥ वाचा पाणी पाद शिस्न गुद । हीं कर्मइंद्रियें प्रसिद्ध । शब्द स्पर्श रूप रस गंध । ऐसें हें विषयपंचक ॥ १४ ॥ अंतःकरण प्राण-पंचक । ज्ञानेंद्रियें कर्मेंद्रियें पंचक । पांचवें विषयपंचक । ऐसीं हीं पांच पंचकें ॥ १५ ॥ ऐसे हे पंचविस गुण । मिळोन सूक्ष्म देह जाण । याचा कर्दम बोलिला श्रवण । केलें पाहिजे ॥ १६ ॥ अंतःकरण व्यान श्रवण वाचा । शब्दविषयो आकाशाचा । पुढें विस्तार वायोचा । बोलिला असे ॥ १७ ॥ मन समान त्वचा पाणी । स्पर्श रूप हा पवनीं । ऐसे हे अडाखे साधुनी । कोठा करावा ॥ १८ ॥ बुद्धि उदान नयन चरण । रूपविषयाचें दर्शन । संकेतें बोलिलें मन । घालून पाहिजे ॥ १९ ॥ चित्त अपान जिव्हा शिस्न । रसविषय आप जाण । पुढें ऐका सावधानां । पृथ्वीचें रूप ॥ २० ॥ अहंकार प्राण घ्राण । गुद गंधविषय जाण । ऐसें केलें निरूपण । शास्त्रमतें ॥ २१ ॥ ऐसा हा सूक्ष्म देह । पाहातां होईजे निसंदेह । येथें मन घालुनी पाहे । त्यासीच हें उमजे ॥ २२ ॥ ऐसें सूक्ष्म देह बोलिलें । पुढें स्थूळ निरोपिलें । आकाश पंचगुणें वर्तलें । कैसें स्थूळीं ॥ २३ ॥ काम क्रोध शोक मोहो भय । हा पंचविध आकाशाचा अन्वय । पुढें पंचविध वायो । निरोपिला ॥ २४ ॥ चळण वळण प्रसारण । निरोध आणि आकुंचन । हें पंचविध लक्षण । प्रभंजनाचें ॥ २५ ॥ क्षुधा तृषा आलस्य निद्रा मैथुन । हे तेजाचे पंचविध गुण । आतां पुढें आपलक्षण । निरोपिलें पाहिजे ॥ २६ ॥ शुक्लीत श्रोणीत लाळ मूत्र स्वेद । हा पंचविध आपाचा भेद । पुढें पृथ्वी विशद । केली पाहिजे ॥ २७ ॥ अस्थि मांस त्वचा नाडी रोम । हे पृथ्वीचे पंचविध धर्म । ऐसें स्थूळ देहाचें वर्म । बोलिलें असे ॥ २८ ॥ पृथ्वी आप तेज वायो आकाश । हे पांचाचे पंचविस । ऐसे मिळोन स्थूळ देहास ।

प्रवृत्त होणें हा अहंकार. हें अंतःकरणपंचक. इतर पंचकांचें रूप कोष्टकावरून समजेल. पांचा पंचकांचे पंचवीस गुण मिळून सूक्ष्म देह (१–१६). अंतःकरण, सर्वांगीं राहणारा व्यान वायु, श्रवणदेवता, वाची देवता व शब्द हे पांच आकाशाचे विषय म्ह० धर्म आहेत (१७). मन, समानवायु, त्वचा, हस्त, स्पर्श हे वायूचे विषय (१८). बुद्धि, उदान, चक्षुदेवता, पाददेवता व रूप हे तेजाचे विषय (१९). चित्त, अपान, जिव्हा, शिश्न व रस हे आपाचे विषय (२०) व अहंकार प्राण, घ्राण, गुद व गंध हे पृथ्वीचे विषय (२१). यापुढें स्थूळ देहाचीं तत्त्वें ओंव्या २३ ते २९ पर्यंत सांगितलीं आहेत.

बोलिजेतें ॥ २९ ॥ तिसरा देह कारण अज्ञान । चौथा देह महाकारण ज्ञान । हे च्यारी देह निरसितां विज्ञान । परब्रह्म तें ॥ ३० ॥ विचारें चौदेहावेगळें केलें । मीपण तत्वांसरिसें गेलें । अनन्य आत्मनिवेदन जालें । परब्रह्मीं ॥ ३१ ॥ विवेकें चुकला जन्म मृत्य । नरदेहीं साधिलें महत्कृत्य । भक्तियोगें कृतकृत्य । सार्थक जालें ॥ ३२ ॥ इति श्रीपंचीकरण । केलेंचि करावें विवरण । लोहाचें जालें सुवर्ण । परिसाचेन योगें ॥ ३३ ॥ हाही दृष्टांत घडेना । परिसाचेनी परीस करवेना । शरण जातां साधुजना । साधुच होइजे ॥ ३४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे तत्त्वनिरूपणनाम समास अष्टम ॥ ८ ॥

॥ श्रीराम ॥ स्थूळ सूक्ष्म कारण महाकारण । ऐसे हे चत्वार देह जाण । जागृति स्वप्न सुषुप्ति पूर्ण । तुर्या जाणावी ॥ १ ॥ विश्व तैजस प्राज्ञ । प्रत्यगात्मा हे अभिमान । नेत्रस्थान कंठस्थान हृदयस्थान । मूर्धनी ते ॥ २ ॥ स्थूळभोग प्रविविक्तभोग । आनंदभोग आनंदावभासभोग । ऐसे हे चत्वार

स्थूलदेहांचीं तत्त्वें

आकाशाचीं	वायूचीं	तेजाचीं	आपाचीं	पृथ्वीचीं
काम	चळण	क्षुधा	शुक्र	अस्थि
क्रोध	वळण	तृषा	शोणित	मांस
शोक	प्रसारण	आलस्य	लाळ	त्वचा
मोह	निरोध	निद्रा	मूत्र	नाडी
भय	आकुंचन	मैथुन	स्वेद	रोम

स्थूळ देहाचीं २५ तत्त्वें व सूक्ष्म देहाचीं २५ तत्त्वें सांगितलीं. याशिवाय तिसरा कारणदेह अज्ञान व चौथा महाकारणदेह ज्ञान. या चारी देहांचा निरास झाला, विचारानें देहांहून आत्मा वेगळा आहे असें कळलें व मीपण (अहंकार) तत्त्वांबरोबर गेला म्हणजे जें परब्रह्म उरलें त्याशीं अनन्य होणें हें आत्मनिवेदन होय. या विवेकानें जन्ममृत्यु चुकला, नरदेहाचें सार्थक झालें व परब्रह्मीं अनन्यता म्ह० भक्ति तिच्यायोगें सार्थक झालें. या पंचीकरणाचें वारंवार विवरण करावें. म्हणजे परीसाच्या संगतीनें लोहाचें सुवर्ण होतें त्याप्रमाणें परब्रह्माशीं अनन्यता पावल्यानें जीवाची धन्यता होते, पण हा दृष्टांतही अपुरा आहे. लोखंडाचें सोनें होतें पण परीस होत नाहीं, येथें जीव प्रत्यक्ष परब्रह्मच होतो, संतकृपेनें मुमुक्षु संतच होतो (३०–३४). [द० १७, स० ८]

स्थूळ, सूक्ष्म, कारण व महाकारण हे चार देह होत ; जागृति, स्वप्न, सुषुप्ति व तुर्या ह्या या चार देहांच्या अवस्था होत ; विश्व , तैजस, प्राज्ञ व प्रत्यगात्मा हे या चार देहांचे अभिमानी होत ; नेत्रस्थान, कंठस्थान, हृदयस्थान व मूर्धक (मस्तक) हीं त्यांचीं स्थानें होत ; स्थूळभोग, प्रविविक्तभोग (स्वप्नभोग), आनंदभोग व आनंदावभासभोग हे या

भोग । चौदेहांचे ॥ ३ ॥ अकार उकार मकार । अर्धमात्रा तो ईश्वर । ऐशा मात्रा चत्वार । चौंदेहाच्या ॥ ४ ॥ तमोगुण रजोगुण । सत्वगुण शुद्धसत्वगुण । ऐसे हे चत्वार गुण । चौंदेहाचे ॥ ५ ॥ क्रियाशक्ति द्रव्यशक्ती । इच्छाशक्ति ज्ञानशक्ती । ऐशा चत्वार शक्ती । चौंदेहाच्या ॥ ६ ॥ ऐसीं हीं बत्तिस तत्वें । दोहींचीं पन्नास तत्वें । अवघीं मिळोन ब्यांसि तत्वें । अज्ञान आणी ज्ञान ॥ ७ ॥ ऐसीं हीं तत्वें जाणावीं । जाणोन माइक वोळखावीं । आपण साक्षी निरसावीं । येणें रिती ॥ ८ ॥ साक्षी म्हणिजे ज्ञान । ज्ञानें वोळखावें अज्ञान । ज्ञानाज्ञानाचें निरसन । देहासरिसें ॥ ९ ॥ ब्रह्मांडीं देह कल्पिले । विराट हिरण्यगर्भ बोलिले । तें हें विवेकें निरसलें । आत्मज्ञानें ॥ १० ॥ आत्मानात्मविवेक करितां । सारासारविचार पाहातां । पंचभूतांची माइक वार्ता । प्रचीत आली ॥ ११ ॥ अस्थि मांस त्वचा नाडी रोम । हे पांचही पृथ्वीचे गुणधर्म । प्रत्यक्ष शरीरीं हें वर्म । शोधून पाहावें ॥ १२ ॥ शुक्लीत श्रोणीत लाळ मूत्र स्वेद । हे आपाचे पंचभेद । तत्वें समजोन विशद । करून घ्यावीं ॥ १३ ॥ क्षुधा तृषा आलस्य निद्रा मैथुन । हे पांचहि तेजाचे गुण । या तत्वांचें निरूपण । केलेंचि करावें ॥ १४ ॥ चळण वळण प्रसारण । निरोध आणि आकुंचन । हे पांचहि वायोचे गुण । श्रोतीं जाणावे ॥ १५ ॥ काम क्रोध शोक मोहो भय । हा आकाशाचा परियाय । हें विवरल्यावीण काय । समजों जाणे ॥ १६ ॥ असो ऐसें हें स्थूळ शरीर । पंचवीस तत्वांचा विस्तार । आतां सूक्ष्मदेहाचा विचार । बोलिजेल ॥ १७ ॥ अंतःकरण मन बुद्धि चित्त अहंकार । आकाशपंचकाचा विचार । पुढें वायो निरुत्तर । होऊन ऐका ॥ १८ ॥ व्यान समान उदान । प्राण आणी अपान । ऐसे हे पांचही गुण ।

चार देहांचे चार भोग होत; अकार, उकार, मकार व अर्धमात्रा या त्यांच्या चार मात्रा होत; तमोगुण, रजोगुण, सत्वगुण व शुद्धसत्वगुण हे या चार देहांचे गुण होत; व क्रियाशक्ति, द्रव्यशक्ति, इच्छाशक्ति व ज्ञानशक्ति अशा चार देहांच्या चार शक्ति होत. याप्रमाणें या चार देहांचीं हीं ८ × ४ = ३२ तत्वें झालीं. मागें सांगितलेलीं स्थूळ देहाचीं २५ व सूक्ष्मदेहाचीं २५ मिळून ५० तत्वें होतात. तीं यांत मिळविलीं म्हणजे ३२ + ५० = ८२ तत्वें झालीं, अर्थात् चारी देहांचीं मिळून ८२ तत्वें होतात (नीट हिशेब पाहातां स्थूळाचीं २५ + ८ = ३३, सूक्ष्माचीं २५ + ८ = ३३, कारणाचीं ८ व महाकारणदेहाचीं ८ मिळून ८२ तत्वें होतात). अशीं हीं ८२ तत्वें मायिक आहेत; तीं मायिक आहेत हें ओळखावें, आपण त्याचें साक्षी व्हावें म्हणजे तीं मावळतात. साक्षित्व हें ज्ञान, या ज्ञानानें अज्ञान ओळखावें व ८२ तत्वांबरोबरच त्यांच्याविषयींचें अज्ञान व साक्षित्वरूपानें त्यांचें ज्ञान हीं दोन्हीं निरसून आपलें निःसंगत्व अनुभवावें. विराट, हिरण्यगर्भ, अव्याकृत व मूळमाया असे ब्रह्मांडाचेही चार देह समजुतीसाठीं कल्पिले आहेत. त्यांचेंही विवेकानें निरसन करावें. आत्मानात्मविवेक व सारासारविवेक (हे पूर्वी सांगितले आहेत) पाहून पंचभौतिक पिंडब्रह्मांड